महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

- कथा
- लेख
- कविता
- ललित लेख

Vol : 51 | Issue : 09 | Mumbai | Marathi Monthly | June 2025 | Pages 84 | RNI No. 21352 | Price : Rs. 30/-



## अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन क्लस्टर स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस दलाची पदकप्राप्त कामगिरी




## ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत यवतमाळ येथे भव्य रोजगार मेळावा



## ध्यास पर्यावरण संवर्धनाचा



## दुर्गम भागात विकासाची नवी वाट

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक...

## आता दक्षता पीडीएफ स्वरूपात महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर मोफत उपलब्ध!

**S.B.Collect**

**छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी**

**https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php**

*अथवा*

खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.




**दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त**

**वेबसाईटवर दक्षता मासिक मोफत वाचण्यासाठी : https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/**

अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

**https://www.mahapolice.gov.in/ dakshata-magazine**

YouTube MAHARASHTRA POLICE HEADQUARTERS- DAKSHATA अंतर्गत नव्या यु-ट्युब चॅनलवर ऐका दक्षता मासिकातील दर महिन्याची उत्कृष्ट तपासकथा ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात.

पत्रव्यवहारासाठी पत्ता: महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१,
वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२०४९७०१, email: mpd.dakshata@mahapolice.gov.in

**पोलीस आणि जनता यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये आपणही सहभागी व्हा!**




जून २०२५ । वर्ष ५१ वे । अंक ९ वा

**मार्गदर्शन**
रश्मि शुक्ला
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना**
अपर पोलीस महासंचालक (नि. व स.)

**मुद्रक/ प्रकाशक/ सरसंपादक**
**विजय मनोहर खरात**
सहायक पोलीस महानिरीक्षक

**अंकरचना व अंतर्गत व्यवस्थापन**
**सुरेंद्र बनगे**
कार्यालय अधीक्षक

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
सरसंपादक दक्षता
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४००००१
दूरध्वनी:०२२ २२०४९७०१/२२८३४५११
mpd.dakshata@mahapolice.gov.in

**वितरण व्यवस्था**
वर्गणीसाठी संपर्क
दूरध्वनी : ०२२ २२०४९७०१

**मांडणी, मुद्रण व प्रकाशन**
विजय मनोहर खरात यांनी महाराष्ट्र स्टेट पोलीस वेल्फेअर फंड यांचेकरिता मे. प्रिंट प्लस प्रा. लि. २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस टी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे मुद्रित करून महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१ येथून प्रसिद्ध केले.

संपादक : **विजय मनोहर खरात**
१०२, आर विंग, मोहन पाम्स, चैतन्य विद्यालयाजवळ, शिरगांव, बदलापूर, जि. ठाणे
नागरिकत्व भारतीय

एकूण पृष्ठे ८४

*या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य पोलीस दल सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय...



नमस्कार. जुन्या वाचकांशी असलेले नाते कायम जपत नव्या वाचकांना जोडून घेण्याचे शिवधनुष्य दक्षताने नेहमीच पेलले आहे. या प्रयत्नांना आपलाही मोलाचा प्रतिसाद राहील हीच इच्छा.

११ ते १५ एप्रिल २०२५ दरम्यान पार पडलेल्या पहिल्या अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन क्लस्टर स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस संघातील खेळाडूंनी सुवर्ण व कांस्यपदक प्राप्त केले. तसेच महाराष्ट्र पोलीस दलातील महिला खेळाडू अनुराधा पाटील यांनी ७ ते ११ एप्रिल २०२५ दरम्यान पार पडलेल्या पहिल्या एनटीपीसी खेलो इंडिया राष्ट्रीय रँकिंग महिला आर्चरी स्पर्धा २०२४-२५ मध्ये Senior Recurve Women 70 meter या क्रीडाप्रकारात रौप्य पदक प्राप्त केले. तसेच दिनांक ३० एप्रिल ते ३ मे २०२५ दरम्यान भोपाळ येथे झालेल्या 'तिसऱ्या एनटीपीसी खेलो इंडिया राष्ट्रीय रँकिंग महिला आर्चरी स्पर्धा २०२४-२५'मध्ये Senior Recurve Women Category मध्ये चतुर्थ स्थान प्राप्त केले. या सर्व यशस्वी सहकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन. त्यांच्या कामगिरीचे वृत्तांकन दक्षताच्या माध्यमातून केले आहे.

गडचिरोली जिल्ह्यात २६ एप्रिल २०२५ रोजी कटेझरी-धानोरा-गडचिरोली अशी बस सेवा सुरू करण्यात आली. या बस सुविधेमुळे कटेझरीसह आजूबाजूच्या गावांमधील शालेय विद्यार्थी तसेच आबालवृद्ध व्यक्ती यांचे दैनंदिन जीवन निश्चितच सुखकर होणार असून या दुर्गम परिसरातील स्थानिकांना बाजारपेठ आणि प्रशासकीय दालनांपर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे. याखेरीज जिल्हा पोलीस प्रशासन इतरही अनेक उपक्रम राबवत आहे. याविषयीचे वृत्त अंकात प्रकाशित करत आहोत.

यवतमाळ पोलीस दलातर्फे जिल्ह्यातील ग्रामीण भागात ऑपरेशन प्रस्थान हा उपक्रम दिनांक १७ ते २३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान राबविण्यात आला. या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुणांकरिता रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे वृत्तांकन या अंकाद्वारे प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसेच मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून कार्यान्वित झालेल्या १०० दिवसांचा कृती आराखडा या मोहिमेची अचूक अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयातील माहिती तंत्रज्ञान कक्षाद्वारे विकसित केल्या गेलेल्या CMMS 100 या पोर्टलची माहिती देणारा लेखही अंकात समाविष्ट केलेला आहे.

याव्यतिरिक्त गणित या विषयातील करिअर संधींची माहिती देणारा श्री. सुरेश वांदिले यांचा मार्गदर्शनपर लेख, बेनामी व्यवहार आणि बेनामी संपत्ती हा विषय व त्याचे विविध पैलू उलगडून दाखवणारा श्री. सुधाकर कुलकर्णी यांचा लेख, प्रख्यात संगीतकार राहूल देव बर्मन म्हणजेच आरडी ऊर्फ पंचमदा यांची सांगीतिक सफर विषद करणारा श्री. संजीव देवकर यांचा लेख, या महिन्यात साजऱ्या होत असलेल्या जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आजच्या पर्यावरणविषयक परिस्थितीवर श्रीमती भारती सावंत यांचे भाष्य हे सर्व साहित्य वाचकांना आवडेल असा विश्वास वाटतो.

याशिवाय तपासकथा, पाककृती, शब्दकोडे ही नेहमीची सदरे आहेतच. वाचकवर्ग अंकाचे स्वागत करेल ही अपेक्षा.

**आपला स्नेहांकित,**

**(विजय खरात)**
**सहायक पोलीस महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# सामाजिक भान जपणारे महाराष्ट्र पोलीस



ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत पार पडलेल्या मेळाव्याच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील युवावर्गाला रोजगार संधी उपलब्ध करून देण्यात आल्या असून यामुळे जिल्ह्यातील बेरोजगारीच्या समस्येचे मोठ्या प्रमाणावर निराकरण होईल असा विश्वास वाटतो. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या नियमित कर्तव्याबरोबरच सुराज्याच्या निर्मितीतही महाराष्ट्र पोलीस दल योगदान देत आहे...

दक्षताच्या सर्व वाचकांना सस्नेह नमस्कार.

गडचिरोली जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी पोलीस प्रशासन सातत्यपूर्ण प्रयत्न करत आहे. शिक्षण, आरोग्य, दळणवळण यांसारख्या सुविधा जिल्ह्यात सर्वदूर पोहोचवण्यासाठी अनेक पावले उचलली जात आहेत. या पार्श्वभूमीवर २६ एप्रिल २०२५ रोजी कटेझरी–धानोरा–गडचिरोली अशी बस सेवा सुरू करण्यात आली आहे. यामुळे दुर्गम भागातील नागरिक मुख्य प्रवाहाशी जोडले जात आहेत. या वाहतूक सुविधेमुळे कटेझरीसह आजूबाजूच्या गावांमधील शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक वाटचाल सुकर होईल असा विश्वास आहे. त्याचप्रमाणे गर्भवती माता आणि आजारी वयोवृद्ध यांनादेखील आरोग्य सेवा पुरविणे सहज शक्य होईल अशी आशा आहे. स्थानिक नागरिकांना बाजारपेठ आणि प्रशासकीय दालनांपर्यंत पोहोचणे ही आजवर अशक्यप्राय वाटणारी गोष्ट या बस सुविधेमुळे आता सत्यात उतरली आहे.

यवतमाळमधील बेरोजगार तरुण वाममार्गाच्या दिशेला वळू नये म्हणून यवतमाळ पोलीस प्रशासनाने १७ ते २३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान भव्य रोजगार मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या १२ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. तसेच ७,५२५ बेरोजगारांनी सहभाग नोंदवत सदर मेळाव्याचा लाभ घेतला. जिल्ह्यात राबवण्यात येत असलेल्या ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत पार पडलेल्या या मेळाव्याच्या माध्यमातून जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील युवावर्गाला रोजगार संधी उपलब्ध करून देण्यात आल्या असून यामुळे जिल्ह्यातील बेरोजगारीच्या समस्येचे मोठ्या प्रमाणावर निराकरण होईल असा विश्वास वाटतो. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या नियमित कर्तव्याबरोबरच सुराज्याच्या निर्मितीतही महाराष्ट्र पोलीस दल योगदान देत आहे याचा प्रत्यय देणाऱ्या या घटना नक्कीच अभिमानास्पद आहेत.

दिनांक ११ ते १५ एप्रिल २०२५ या कालावधीदरम्यान कोची, केरळ येथे १ ली अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन क्लस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस बॅडमिंटन क्लस्टर



**पहिल्या अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन क्लस्टर स्पर्धेत बॅडमिंटन व टेबल टेनिस या क्रीडाप्रकारांमध्ये पदक प्राप्त केलेल्या महाराष्ट्र पोलीस बॅडमिंटन क्लस्टर संघातील पोलीस अधिकारी व अंमलदारांना सन्मानित करण्यात आले.**

---

संघातील बॅडमिंटन व टेबल टेनिस या क्रीडाप्रकारांमध्ये खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. सदर स्पर्धेदरम्यान टेबल टेनिस संघातील खेळाडूंनी सुवर्ण व कांस्यपदक प्राप्त कामगिरी केलेली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील महिला आर्चरी खेळाडू अनुराधा पाटील यांनी दिनांक ७ ते ११ एप्रिल २०२५ दरम्यान गुजरात येथे संपन्न झालेल्या '१ ली एनटीपीसी खेलो इंडिया राष्ट्रीय रँकिंग महिला आर्चरी स्पर्धा २०२४-२५'मध्ये Senior Recurve Women 70 meter या क्रीडाप्रकारात रौप्य पदक प्राप्त केले आहे. त्याचप्रमाणे दिनांक ३० एप्रिल २०२५ ते ३ मे २०२५ या कालावधीदरम्यान भोपाळ, मध्यप्रदेश येथे आयोजित करण्यात आलेल्या '३ ऱ्या एनटीपीसी खेलो इंडिया राष्ट्रीय रँकिंग महिला आर्चरी स्पर्धा २०२४-२५'मध्ये Senior Recurve Women Category मध्ये चतुर्थ स्थान प्राप्त करून Top 16 Elimination Round दरम्यान स्पर्धेसाठी त्या पात्र ठरलेल्या आहेत. या यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

५ जून रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिन साजरा होत आहे. आज एकीकडे विकासाच्या वाटेवरून आपण यशस्वी मार्गक्रमण करत असलो तरी त्याचवेळी पर्यावरणाची हानी होत आहे का, याकडेही लक्ष देणे तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमानवाढ, बदलते वातावरण या धोक्याच्या संकेतांमधून वेळीच योग्य बोध घेणे आवश्यक ठरणार आहे. अशा वेळी एक जबाबदार नागरिक म्हणून प्रदूषण टाळण्याच्या आणि पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने आपण सर्वांनी वेळीच योग्य पावले उचलूया.

जयहिंद!

**आपली स्नेहांकित,**

**रश्मि शुक्ला**
**पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# अंतरंग



## पोलीस विशेष





०७. गडचिरोलीच्या दुर्गम भागात पोलिसांच्या साहाय्याने पोहोचत आहे बस सेवा आणि मुक्त विद्यापिठाचे शिक्षण : दुर्गम भागात विकासाची नवी वाट – **नीलोत्पल पोलीस अधीक्षक, गडचिरोली**

११. माननीय मुख्यमंत्र्यांची '१०० दिवसांचा कृती आराखडा' मोहिम : यशस्वी अंमलबजावणीसाठी CMMS 100 पोर्टल विकसित






३१. ऑपरेशन प्रस्थान– एक पाऊल प्रकाशाकडे...रोजगार मेळावा : पोलीस विभागाचे समाजाभिमुख योगदान – **कुमार चिंता, पोलीस अधीक्षक, यवतमाळ**


## पोलीस क्रीडाविशेष





४१. १ ली NTPC Khelo India National Ranking Women Archery Tournament 2024-25 – महाराष्ट्र पोलीस दलाची उल्लेखनीय कामगिरी : आर्चरी संघातील महिला खेळाडूस रौप्य पदक

४३. १ ली अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन क्लस्टर स्पर्धा २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाची उल्लेखनीय कामगिरी : टेबल टेनिस संघास १ सुवर्ण व ४ कांस्य पदके


## नवी दिशा... नवीन संधी





२६. गणिताची गोडी – **सुरेश वांदिले**


## दिनविशेष


३४. ध्यास पर्यावरण संवर्धनाचा – **भारती सावंत**


## कथा





२३. मनकवडी – **सचिन बेंडभर**

४८. मैत्रि निर्मूलति मत्सर: – **रघुनाथ मोहिते**


## लेख





१२. मूल्यशिक्षण : काळाची गरज – **प्रदीप चिखले**

१५. बेनामी व्यवहार व बेनामी संपत्ती – **सुधाकर कुलकर्णी**

३७. शास्त्रीय संगीतातील 'पंचम' – **संजीव देवकर**






४५. विद्यार्थ्यांनी समन्वय साधावा – **रामकृष्ण अघोर**

५२. माणसाने बदनाम केलेला प्राणी: गाढव – **प्रवीण कारखानीस**


## तपासकथा





५६. तिचा काय गुन्हा – **गजाननमोरे, सहा. पोलीस निरीक्षक, हट्टा पोलीस ठाणे, हिंगोली**

६१. बळी – **अमर धंदर, सहा. पोलीस निरीक्षक, तुमसर पोलीस ठाणे, भंडारा**

६६. गुन्ह्यास कारण की... – **जिवन राजगुरू, सहा. पोलीस निरीक्षक, गोंडपिंपरी पोलीस ठाणे, चंद्रपूर**






७१. माझं काय चुकलं? – **गणेश सायकर, पोलीस उपनिरीक्षक, सेवाग्राम पोलीस ठाणे, वर्धा**


## कविता


६५. म्हणून मी नेहमी आनंदी असतो... – **पल्लवी शिंदे**

७०. महेंद्र पंडित – **राज करनुरकर**






## ७६. सोशल मुशाफिरी

## ७९. पाककृती

## ८१. शब्दकोडे



नीलोत्पल
पोलीस अधीक्षक
गडचिरोली

## गडचिरोलीच्या दुर्गम भागात पोलिसांच्या साहाय्याने पोहोचत आहे बस सेवा आणि मुक्त विद्यापिठाचे शिक्षण

# दुर्गम भागात विकासाची नवी वाट

# स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतर कटेझरी-गडचिरोली बस सेवा सुरू



गडचिरोली जिल्हा म्हटला, की डोळ्यासमोर उभा राहतो तो घनदाट जंगलांनी वेढलेला, निसर्गसंपन्न भूभाग. येथे कमलापूरचे हत्ती कॅम्प, विदर्भाची काशी म्हणून प्रसिद्ध असलेले मार्कंडा देवस्थान, तसेच भामरागडजवळील त्रिवेणी संगम यांसारखी अनेक पर्यटनस्थळे आहेत. महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर

गडचिरोलीचा ठसा ठसठशीत असला, तरी दुर्दैवाने गेल्या अनेक दशकांपासून हा जिल्हा माओवादाच्या सावटाखाली अडकलेला आहे. या हिंसक चळवळीमुळे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास कोसो दूर आहे. शिक्षण, आरोग्य, दळणवळण यांसारख्या मूलभूत सुविधा आजही अनेक भागांत पोहोचू शकलेल्या नाहीत. तथापि, पोलीस विभागाचे आणि जिल्हा प्रशासनाचे सातत्यपूर्ण प्रयत्न या परिस्थितीत सकारात्मक बदल घडवण्याच्या दिशेने आशेचा किरण ठरत आहेत.

या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाने पुढाकार घेत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या गडचिरोली आगाराच्या सहकार्याने एक ऐतिहासिक पाऊल उचलले. २६ एप्रिल २०२५ रोजी स्वतंत्र भारताच्या ७८ वर्षांनंतर प्रथमच कटेझरी– धानोरा– गडचिरोली बस सेवा सुरू करण्यात आली. या सेवेचे उद्घाटन धानोरा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जगदीश पांडे यांच्या हस्ते करण्यात आले. पोलीस स्टेशन कटेझरी येथील प्रभारी अधिकारी श्री. अजय भोसले यांनी हिरवा झेंडा दाखवून बस मार्गस्थ केली.

ही बससेवा केवळ एक वाहतूक सुविधा नाही, तर दुर्गम भागातील विकासाची आणि मुख्य प्रवाहाशी जोडणारी एक आश्वासक सुरुवात आहे. आज कटेझरीसह दहा–बारा गावांमधील शालेय विद्यार्थी




शिक्षणासाठी सहज प्रवास करू शकणार आहेत, गर्भवती मातांना, आजारी वृद्धांना आरोग्यसेवेसाठी मदतीचा हात मिळणार आहे, आणि स्थानिकांना बाजारपेठ व प्रशासकीय दालनांपर्यंत पोहोचणे आता स्वप्न राहिले नाही, तर वास्तव बनले आहे.

स्वातंत्र्यानंतर ७८ वर्षांनंतरच्या कटेझरी ते गडचिरोली बस सेवेच्या शुभारंभप्रसंगी मा. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आपल्या एक्स अकाऊंट वरून गडचिरोली पोलीस आणि प्रशासनाचे अभिनंदन करत या उपक्रमाबद्दल म्हटले, की ***‘महाराष्ट्रातील पहिला जिल्हा – विकासाच्या मार्गावर अग्रगण्य असून मौजा कटेझरी ते गडचिरोली बससेवेमुळे १० ते १२ गावांमधील नागरिकांना लाभ होणार असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठीही मोठा फायदा होणार आहे. या अभिनव उपक्रमामुळे पोलीस आणि जनता यांच्यातील संवाद व विश्वास अधिक दृढ होईल. ही बससेवा म्हणजे केवळ एक मार्ग नाही, तर संघर्षातून समृद्धीकडे नेणारा पूल आहे. ही सेवा पोलीस व जनतेमधील विश्वासाचा एक नवा धागा विणते, सहकार्याचे नवे क्षितिज उघडते. गडचिरोली पोलीस दलाच्या या उपक्रमामुळे, दुर्गमतेत अडकलेली विकासाची गंगा आता जनतेच्या दारी पोहोचू लागली आहे. हा केवळ एक बस प्रवास नाही, तर स्वाभिमानाचा, विकासाचा आणि उज्ज्वल भविष्याचा प्रवास आहे.’***

## दुर्गम भागात मुक्त विद्यापीठाचे दालन

शासनाच्या सामाजिक भानाच्या विस्तारात पोलीस विभागाची भूमिका केवळ कायदा व सुव्यवस्था यांपुरती मर्यादित नसून, ती समाजघडणीच्या दिशेने वाटचाल करणारीही आहे.

गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त आणि दुर्गम जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पोलीस दादालोरा खिडकी या उपक्रमाअंतर्गत आज हजारो तरुणांचे भविष्य उजळत आहे. ताडगाव, एटापल्ली, मुरूमगाव, पेंढरी व जिमलगट्टा या पाच दुर्गम ठिकाणी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र स्थापन करण्यात आले. या केंद्रांमधून आतापर्यंत २५२९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून अनेक विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली आहे. पोलीस विभागाकडून या विद्यार्थ्यांना परीक्षा

फी, पुस्तके सर्वकाही मोफत प्रदान केले जाते. आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून दूर गेलेल्या युवक–युवतींसाठी ही योजना आशेचा किरण बनली आहे.

याच उपक्रमाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून, १ एप्रिल २०२५ रोजी गडचिरोली पोलीस दल व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ करिता नोंदणी केलेल्या ३८५ विद्यार्थ्यांकरिता एकदिवसीय कार्यशाळा व पुस्तक वाटप समारंभाचे आयोजन पोलीस मुख्यालयातील एकलव्य सभागृहात करण्यात आले. या कार्यक्रमात ३८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि त्यांना विद्यापीठाच्या बी.ए. प्रथम/द्वितीय/तृतिय वर्ष अभ्यासक्रमासाठी लागणारे पुस्तक संच वाटप करण्यात आले.

**याच उपक्रमाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून, १ एप्रिल २०२५ रोजी गडचिरोली पोलीस दल व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता नोंदणी केलेल्या ३८५ विद्यार्थ्यांकरिता एकदिवसीय कार्यशाळा व पुस्तक वाटप समारंभाचे आयोजन पोलीस मुख्यालयातील एकलव्य सभागृहात करण्यात आले.**

या कार्यशाळेदरम्यान सायबर सुरक्षेवर विशेष मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्ह्यांपासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवावे, याबाबत विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती देण्यात आली आणि सायबर सक्षम होण्याची शपथ विद्यार्थ्यांना दिली गेली.

प्रोजेक्ट उडान अंतर्गत शिक्षणाकरिता सुरू केलेल्या ‘एक गाव, एक वाचनालय’ या उपक्रमाअंतर्गत ७१ सार्वजनिक वाचनालये तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मार्फतीने सुरू केलेली दुर्गम भागातील ०५ अभ्यासकेंद्रे यांच्या माध्यमातून दुर्गम भागातील अंध:कार दूर करण्याचा प्रयत्न पोलीस दल करत आहे.

## गडचिरोली पोलीस दलातर्फे स्पर्धा परीक्षांसाठी टेस्ट सिरीजचे आयोजन

गडचिरोली जिल्हा हा निसर्गसंपन्न असला तरी शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने तो आजही अनेक अडचणींना सामोरा जात आहे. जिल्ह्यातील बहुतांश विद्यार्थी दुर्गम व अतिदुर्गम भागात राहतात. या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन,









आवश्यक संसाधने आणि संधी या सर्वांचा अभाव भासत असल्याने ते स्पर्धा परीक्षांमध्ये मागे पडतात. या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दल आणि यशोरथ स्पर्धा परीक्षा टेस्ट सिरीज, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रोजेक्ट उडान' अंतर्गत एक स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी गडचिरोली पोलीस मुख्यालयातील शहीद पांडू आलम सभागृहात आणि जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन्स/उप पोलीस स्टेशन्स/ पोलीस मदत केंद्र स्तरावर सुरू करण्यात आलेल्या ७१ सार्वजनिक वाचनालयांमध्ये स्पर्धा परीक्षा सराव पेपर घेण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय, स्पर्धा परीक्षांबाबत जागरूकता, आणि आत्मविश्वास निर्माण करणे हा होता.

या उपक्रमात संपूर्ण जिल्ह्यातून एकूण ३४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. भामरागड, एटापल्ली, आणि हेडरी यांसारख्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेषतः छत्तीसगड सीमेलगत नव्याने स्थापन झालेल्या पेनगुंडा पोलीस स्टेशन हद्दीतील १५ विद्यार्थ्यांचा सहभाग उल्लेखनीय होता.

शहीद पांडू आलम सभागृहात परीक्षा देण्यासाठी जमलेल्या ११०० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगण्यात आले की, जिद्द, चिकाटीआणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावरच यश मिळवता येते. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या अभ्यासाची चिकित्सा करत भविष्यातील पोलीस भरती, वनरक्षक भरती, सरळसेवा संयुक्त परीक्षा आणि इतर स्पर्धा परीक्षांसाठी नियोजनबद्ध तयारी करावी.

गडचिरोली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी अधिक संख्येने स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी व्हावे आणि त्यांना योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी गडचिरोली पोलीस सदैव कटिबद्ध आहेत. 'प्रोजेक्ट उडान'सारखे उपक्रम दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत स्पर्धा परीक्षेचे ज्ञान पोहोचवण्याचा आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रेरणादायी प्रयत्न करत आहेत.

या विविध कार्यक्रमांच्या यशस्वितेकरिता श्री. यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक (अभियान), श्री. एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. एम. व्ही. सत्यसाई कार्तिक, अपर पोलीस अधीक्षक अहेरी, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन्स/ उप- पोलीस स्टेशन्स/ पोलीस मदत केंद्रे तसेच नागरी कृती शाखेचे




प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक धनंजय पाटील व चंद्रकांत शेळके, पोलीस मुख्यालयाची संपूर्ण टीम व सर्व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेतले. ■

लेख




प्रा. प्रदीप चिखले
मंचर (पुणे)


# मूल्यशिक्षण : कालाची गरज...




महाराष्ट्र ही साधूसंताची, पुण्यवंतांची भूमी. महाराष्ट्राला नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. थोर पुरुषांच्या कर्तृत्वाने, दातृत्वाने आणि बलिदानाने पावन झालेली ही पुण्यभूमी. आई जिजाऊंच्या स्वप्नातील महाराष्ट्र व राजे शिवबांच्या शौर्यगाथा आजही घरोघरी बोलल्या जातात, नव्हे नव्हे त्या समाजाच्या जडणघडणीमध्ये आचरणात आणल्या जातात. या थोर पुरुषांनी समाज सुधारण्यासाठी अतोनात प्रयत्न केले आणि समाज परिवर्तनासाठी काही

नीतिमूल्ये, सांस्कृतिक परंपरा, मूल्य संवर्धनासाठी काही महत्त्वाच्या भूमिका बजावल्या. आईवडील त्यांच्या मुलांना व आजीआजोबा त्यांच्या नातवंडांना प्रेम, वात्सल्य, परोपकार, सामाजिक बांधिलकी, सत्यवचन, नीतिमत्ता, प्रामाणिकपणा, दानधर्म, क्षमाशीलता इत्यादी मूल्यांच्या गोष्टी सांगतात.

बदलत्या समाजात अनेक नवनवीन तंत्रज्ञान व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध झाले आहे. मनुष्यजीवन सुख आणि समृद्धीने परिपूर्ण झाले आहे. प्रत्येक नागरिकाला लोकशाहीने आपले मत मांडण्याचा अधिकार व स्वातंत्र्य दिले आहे. पैसा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाला आहे. जिथे भरभराट असते, तिथे आपोआपच चैनी, विलासी व भोगवृत्ती जन्माला येते. लहानपणी ऐकलेली एक गोष्ट सर्वांना परिचित असेल. शालेय शिक्षण घेण्याकरिता एका लहान मुलाला आईने शाळेत घातले. शाळा सुटल्यानंतर तो मुलगा शाळेत पडलेल्या लहान–सहान वस्तू गोळा करायचा व त्या घरी घेऊन यायचा. हळूहळू त्याची ही सवय दृढ होत गेली. आईने त्याला केव्हाही अडविले नाही किंवा रागवले नाही. एक दिवस त्या सवयीचे रूपांतर चोरी करण्यात झाले आणि आईला शेवटी पश्चात्ताप करण्याची वेळ आली. त्याला जर तिने सुरुवातीलाच अडवले असते, तर तिच्यावर पश्चात्तापाची वेळच आली नसती आणि एक अट्टल

**काळाच्या ओघात कुटुंबव्यवस्थेत आमूलाग्र बदल होऊन एकत्र कुटुंबपद्धती लोप पावली आहे. त्याची जागा विभक्त कुटुंबव्यवस्थेने घेतलेली दिसते. कुटुंब व समाजात प्रेम, आदर व सहिष्णूता ही मूल्ये संपुष्टात येत चालली आहेत.**

गुन्हेगार तयार झाला नसता.

उच्चशिक्षित समाजात कित्येक वेळेस पिता पुत्र एकत्र दारू पार्टी करताना दिसतात. गरीब कुटुंबातही काही फारसे वेगळे चित्र नाही. दारू पिऊन धिंगाणा घालणारा बाप, नवरा, मुलगा स्वतःच्या संसाराची राखरांगोळी होईपर्यंत इतका अधोगतीस जातो, की तो सम ाजाप्रती आपली काही जबाबदारी असते, काही नैतिक, सामाजिक मूल्ये असतात हे रीतसर विसरतो. आज समाजामध्ये अपप्रवृत्ती, चोरी, गुन्हेगारी, हिंसा, स्वार्थ, भ्रष्टाचार, व्यसनाधीनता व बलात्कार इत्यादी वाईट प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत व ते कमी होण्याचे नावच घेत नाहीत. वरील सर्व बाबींच्या विचारांती आपण हा निष्कर्ष काढू शकतो, की मानवी मूल्यांचा ऱ्हास होत चालला आहे. जन्मजात कोणीही अपप्रवृत्ती घेऊन जन्माला येत नसतो. गुन्हेगारी वर्तन किंवा हिंसक प्रवृत्ती ही अनेक सामाजिक, पर्यावरणीय, आणि वैयक्तिक घटकांच्या परिणामस्वरूप निर्माण होत असते. मुलांच्या वर्तनावर नेहमीच कुटुंबाचा खूप मोठा प्रभाव जाणवतो. मुले अशा कुटुंबात वाढत असतील जिथे हिंसा, गैरव्यवहार किंवा गुन्हेगारी वर्तन प्रचलित आहे, तिथे अशा कृत्यांचे ते अनुकरण करू शकतात. समाजाचा प्रभाव मुलांच्या वर्तनावर पडतो. चांगल्या संगतीत राहिल्यास मुलांना सुसंस्कार मिळतात, तर खराब संगतीमुळे वाईट वर्तन विकसित होऊ शकते.

बाल्यावस्थेत असे वर्तन विकसित होण्यासाठी अनेक घटक कारणीभूत असू शकतात. पालकांचे मुलांकडे होणारे दुर्लक्ष, गैरव्यवहार, असुरक्षिततेचे आणि तणावाचे वातावरण यामुळे त्यांच्यात गुन्हेगारी प्रवृत्ती विकसित होऊ शकतात. सध्या तंत्रज्ञानाचा वाढता वापर, मोबाईल तसेच सोशल मीडिया यांचा अतिवापर होत आहे. तरुण पिढीही तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेली आहे. त्यामुळे तरुणांच्या पदरी निराशा पडते व त्यांची संयमी वृत्ती व विवेकबुद्धी हरपते. आजच्या पिढीमध्ये संवाद कौशल्य हरवत चालले आहे. ताणतणाव व प्रासंगिक आत्महत्यांचे प्रमाणही वाढताना दिसते. काळाच्या ओघात कुटुंबव्यवस्थेत आमूलाग्र बदल होऊन एकत्र कुटुंबपद्धती लोप पावली आहे. त्याची जागा विभक्त कुटुंबव्यवस्थेने घेतलेली दिसते. कौटुंबिक नात्यांबरोबर सामाजिक नात्यांचा विसर पडताना प्रेम, आदर व सहिष्णूता ही मूल्ये संपुष्टात येत चालली आहेत. एखाद्याप्रती त्याग व समर्पणाची भावना कमी होताना

दिसते. सामाजिक व आर्थिक दरी दिवसेंदिवस रुंदावत असताना मूल्यांचा ऱ्हास होऊन मूल्यविरहित समाज उदयास येत चालला आहे. भावनिक तणाव, गैरव्यवहार, डिप्रेशन, किंवा अन्य मानसिक समस्यांमुळे मुलांमधील गैरवर्तन वृद्धिंगत होत आहे. दारू, ड्रग्ज, किंवा अन्य मादक पदार्थांच्या व्यसनांना ते बळी पडत आहेत. आपल्याला गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करायचे असेल, तर विविध उपाययोजना राबवणे आवश्यक आहे. मुलांना प्राथमिक शाळेपासूनच सर्वांगीण शिक्षण देणे क्रमप्राप्त आहे, ज्यात नैतिकता, मूल्ये, आणि सामाजिक जबाबदारी शिकवली जाते. ग्रामीण आणि शहरी भागात चांगल्या शाळा, महाविद्यालये, आणि व्यावसायिक शिक्षण केंद्रांची स्थापना करणे अत्यावश्यक आहे. पालकांना योग्य पालकत्वाच्या तंत्रांची माहिती देणे, प्रेम, समजूत, आणि अनुशासन यांबाबत कुटुंबातील सदस्यांनी मुलांशी नियमितपणे संवाद साधावा आणि त्यांचे विचार ऐकून त्यांना योग्य मार्गदर्शन करावे. मुलांना चांगल्या संगतीत राहण्याचे महत्त्व पटवून द्यावे. मुलांना गुन्हेगारी गट आणि त्यांच्या संगतीपासून दूर ठेवावे. मुलांचे समुपदेशन करून त्यांचे मानसिक आणि भावनिक आरोग्य सुधारण्याचे प्रयत्न करावेत. आवश्यक असेल तर, विविध थेरपीद्वारे त्यांचे वर्तन सुधारण्यास मदत करता येते. गरीब लोकांसाठी आर्थिक मदत, स्वयंपूर्णता योजना, आणि उपजीविकेच्या साधनांची व्यवस्था करावी लागेल. रोजगार निर्मितीचे प्रकल्प आणि कौशल्य विकास कार्यक्रम राबवून बेरोजगारी कमी करता येऊ शकते. कुटुंबांमधील ताणतणाव कमी करण्यासाठी सल्लागार सेवा, आर्थिक मदत, आणि कुटुंब कल्याण योजना राबवणे गरजेचे आहे. समाजातील सदस्यांनी एकत्र येऊन परस्पर सन्मान, एकमेकांविषयी आदर, समाजहित जोपासण्याच्या दृष्टिकोनातून विविध प्रकारचे मूल्यसंवर्धनाचे कार्यक्रम राबवावेत.

व्यसनाधीनतेपासून मुक्त होण्यासाठी व्यसनमुक्ती केंद्रांची स्थापना करणे व मादक पदार्थांचे दुष्परिणाम समजावून सांगणारे जागरूकता कार्यक्रम राबवावेत.

मुलांना आणि तरुणांना सामाजिक सेवांमध्ये सहभागी करून घ्यावे, जेणेकरून त्यांना समाजातील त्यांच्या जबाबदारीची जाणीव होईल. कला, खेळ, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मुले तसेच तरुण पिढीला सहभागी करून घ्यावे. यामुळे त्यांच्यात सकारात्मक ऊर्जा तयार होईल.

काहीवेळा मानसिक आरोग्य समस्यांमुळे गुन्हेगारी वर्तन होत असते. अशा मुलांना समुपदेशन सेवा उपलब्ध कराव्यात व आवश्यकतेनुसार मानसोपचाराद्वारे गुन्हेगारी प्रवृत्तीचे निवारण करावे.

गुन्हेगारी गटांतील सदस्यांना पुनर्वसनाची संधी देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करावे लागेल. आजही वासनेचे बळी ठरणाऱ्या लहान मुली तसेच स्त्रिया यांच्या बाबतीत विचार केला, तर समाजातील नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाल्याचीच उदाहरणे समोर येतात. समाजात बलात्कारासारखे गुन्हे घडू नये यासाठी अश्लील चित्रे तसेच चित्रफिती यांच्यावर बंदी आणली पाहिजे. सामाजिक बंधुत्वाचे मूल्य जोपासण्याचा प्रयत्न सर्वच स्तरावर झाला पाहिजे. स्त्री – पुरुष एकोप्याचे संबंध जोपासले पाहिजेत. परस्त्री ही मातेसमान किंवा बहिणीसमान असते ही भावना प्रत्येकात दृढ करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

मूल्यशिक्षणाने समाजाच्या जडणघडणीत मोठा बदल घडवून आणला जाऊ शकतो. आज समाजात जे काही वाईट प्रकार घडतात, त्यावर पश्चात्ताप करण्याशिवाय काहीही पर्याय नसतो. त्यासाठी शालेय शिक्षणात व उच्चशिक्षणात मूल्यवर्धन करण्यासाठी मूल्यशिक्षणाच्या तासिका असणे आवश्यक आहे. परिणामी मूल्य ही शिकविण्यापेक्षा ती रुजविणे हे जास्त उपयोगात येऊ शकेल. सुसंस्काराने समाज घडतो व शिक्षणाने जीवनाला योग्य दिशा प्राप्त होते. व्यसनमुक्त जीवनाने गुन्हेगारीस हद्दपार करता येते व मूल्य जोपासली जाऊन एक सुसंस्कारी पिढी तयार होण्यास हातभार लागतो. ■

लेख



सुधाकर कुलकर्णी
पुणे

# बेनामी व्यवहार व बेनामी संपत्ती

'ह्युमन बिंग इज वाँटिंग ॲनिमल' अशी एक म्हण इंग्रजीत प्रचलित आहे. हा अधिक पाहिजेचा हव्यास काळ्या पैशाच्या साठवणुकीला कारणीभूत ठरतो. मग हा पैसा साठवण्यासाठी भ्रष्टाचार, बेनामी संपत्ती या वाममार्गांचा अवलंब केला जातो. परंतु २०१६ च्या बेनामी व्यवहार (प्रतिबंधक) सुधारित कायद्यामुळे आता या गोष्टींना चाप बसणार हे नक्की

भ्रष्टाचार हा सर्वच क्षेत्रात होत असल्याचे आपण अनेकदा पाहतो/वाचतो. विशेषत: सरकारी यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकार क्षेत्र तसेच मोठमोठ्या कंपन्या या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार/ लाचखोरी होत असल्याचे प्रामुख्याने दिसून येते. ही समस्या एकट्या भारतापुरती मर्यादित नसून संपूर्ण जगात आहे. (प्रमाण कमी जास्त असू शकते). अशा भ्रष्टाचारातून / लाचखोरीतून निर्माण होणारा हा काळा पैसा वापरूनच बहुतांश बेनामी व्यवहार होत असतात. यासाठी बेनामी व्यवहार म्हणजे नेमके काय हे आधी समजून घेऊ.

बेनामी व्यवहार म्हणजे ज्या व्यवहारात



मालमत्ता (स्थावर तसेच जंगम) खरेदी करतानाचे पेमेंट प्रत्यक्ष खरेदीदाराने न करता अन्य दुसऱ्यानेच केलेले असते. असे बेनामी व्यवहार पुढीलप्रमाणे होतात.

मालमत्तेचा उपभोग पेमेंट करणारा घेणार असतो मात्र संबंधित मालमत्ता दुसऱ्याच्या नावावर असते. अशा व्यवहारातून होणारा अल्पकालीन किंवा दीर्घकालीन होणारा लाभ पेमेंट करणारा घेणार असतो, ज्याच्या नावावर मालमत्ता आहे तो घेत नसतो.

काही व्यवहारात खरेदी केलेली मालमत्ता काल्पनिक/फिक्टीशिअस नावाने घेतली जाते. यासाठी बनावट आधार कार्ड/ पॅन कार्डचा वापर केला जातो.

काही बेनामी व्यवहारात खरेदीदारास आपल्या नावावार झालेल्या व्यवहाराची कल्पना नसते, तर काही वेळा खरेदीदार असा व्यवहार केल्याचे नाकारतो. काही बेनामी व्यवहारात पेमेंट करणारा काल्पनिक असतो किंवा सापडत नाही.

बेनामी व्यवहारात ज्याच्या नावावर व्यवहार केला जातो त्याला बेनामीदार असे म्हणतात, तर ज्याने पेमेंट केले आहे अशास लाभार्थी मालक (बेनिफिशियल ओनर) असे म्हणतात. अशा व्यवहारातून निर्माण झालेल्या संपत्तीस बेनामी संपत्ती असे म्हणतात.

बेनामी व्यवहार प्रामुख्याने कसे होतात हे खालील काही उदाहरणावरून लक्षात येईल.

१) उदा: श्री. क्ष या पाटबंधारे खात्यातील कार्यकारी अभियंत्याने आपल्याकडे असलेल्या काळ्या पैशातून आपल्याला राहण्यासाठी घर

**मालमत्तेचा उपभोग पेमेंट करणारा घेणार असतो मात्र संबंधित मालमत्ता दुसऱ्याच्या नावावर असते. अशा व्यवहारातून होणारा अल्पकालीन किंवा दीर्घकालीन होणारा लाभ पेमेंट करणारा घेणार असतो, ज्याच्या नावावर मालमत्ता आहे तो घेत नसतो.**

विकत घेतले आहे. मात्र ते आपल्या नावावर न घेता आपला बागाईतदार मेव्हणा श्री. य याच्या नावावर घेतले आहे. यामुळे मेव्हण्याची घर घेण्याची क्षमता असल्याचे दिसून येते. इथे सकृतदर्शनी मेव्हण्याने घर घेतल्याचे दिसते, मात्र घराचा वापर स्वत: श्री. क्ष व त्यांचे कुटुंबीय करीत आहेत. इथे श्री. क्ष हे बेनिफिशियल ओनर असून श्री. य हे बेनामीदार आहेत.

२) आपल्या ड्रायव्हरच्या नावाने बँकेत खाते उघडून त्या खात्यात वेळोवेळी रोख रक्कम जमा करणे व हवी तेव्हा काढता यावी यासाठी ड्रायव्हरच्या सह्या असलेले चेकबूक आपल्याकडे ठेवून या खात्याचा वापर आपल्या गरजेनुसार करणे. तसेच त्याच्या नावाने बँकेत लॉकर घेऊन किल्ली आपल्याकडेच ठेवून त्यात रोख रक्कम तसेच मौल्यवान वस्तू ठेवणे/ काढणे, हा सुद्धा एक प्रकारचा बेनामी व्यवहारच आहे. यात ड्रायव्हर बेनामीदार असून संबंधित व्यक्ती बेनिफिशियल ओनर असतो.

३) काही व्यवसाय सुरू करण्यासाठी परमिट काढावे लागते. (उदा: मद्यविक्री/ औषधविक्री) यासाठी लागणारा खर्च आपल्या जवळच्या विश्वासू नातेवाईक/ नोकर/ मित्र याच्या नावाने परमिट घेऊन त्याच्याच नावाने हा व्यवसाय करणे, मात्र यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ आपणच देऊन यातून नफा आपण घेणे इ. अशा व्यवहारात संबंधित नातेवाईक/ नोकर/ मित्र हा बेनामीदार असतो तर आर्थिक पाठबळ देणारा बेनिफिशियल ओनर असतो.

४) मनीम्युल खात्यावरील व्यवहारसुद्धा बेनामी व्यवहारच असतात. यात आपले बँक खाते नकळत दुसऱ्यास वापरण्यासाठी दिले जाते व या खात्यावर जमा होणाऱ्या मोठमोठ्या रकमा पुढे अन्य बँक खात्यात ट्रान्स्फर केल्या जातात. अशी खाती कधी नकळत तर कधी प्रत्येक व्यवहारापोटी मिळणाऱ्या कमिशनसाठी उघडली जातात. या खात्यांचा वापर प्रामुख्याने मनी लॉँड्रींगसाठी केला जातो. यात बँक खातेदार बेनामीदार




असतो, तर या खात्यात रक्कम जमा करून नंतर अन्य खात्यात ट्रान्स्फर करणारा बेनिफिशियल ओनर असतो.

स्वातंत्र्योत्तर काळात भ्रष्टाचार तसेच लाचखोरी वाढत गेली. परिणामी अर्थव्यवस्थेत काळ्या पैशाचे प्रमाण वाढत गेले व त्यातून बेनामी व्यवहार तसेच गुन्हेगारी/ तस्करी यांचे प्रमाण वाढीस लागल्याचे दिसून येते. यामुळे काळ्या पैशाच्या वाढीस लगाम घालण्याची आवश्यकता निर्माण झाली. काळा पैसा हा प्रामुख्याने बेनामी व्यवहारात वापरला जात असल्याचे दिसून आल्याने बेनामी व्यवहारांवर प्रतिबंध आणण्याच्या उद्देशाने बेनामी व्यवहार (प्रतिबंधक) कायदा १९८८ तयार करण्यात आला. भारतीय संसदेत सप्टेंबर १९८८ मध्ये या कायद्याला मान्यता मिळाली. या कायद्यानुसार बेनामी व्यवहार व बेनामी संपत्तीची व्याख्या करण्यात आली.

१९८८ चा हा बेनामी व्यवहार (प्रतिबंधक) कायदा फारसा प्रभावी होत नाही असे दिसून आल्याने हा कायदा आणखी प्रभावी करण्याच्या उद्देशाने २०१६ मध्ये सरकारने बेनामी व्यवहार (प्रतिबंधक) सुधारणा विधेयक २०१६ संसदेत आणून ते मंजूर करून घेतले. नवीन सुधारित कायद्याची व्याप्ती आधीच्या कायद्यापेक्षा वाढली असून १९८८ च्या कायद्यात असणाऱ्या ९ कलमांची संख्या आता ७२ झाली आहे. यामध्ये बेनामी व्यवहारांच्या विविध प्रकारांची व्याख्या केली असून बेनामी संपत्ती जप्तीबाबतची प्रक्रिया सुस्पष्ट केली आहे. या नवीन सुधारित बिलामध्ये गुन्ह्यांची व्याप्ती व शिक्षा वाढविली आहे. यामध्ये बेनामी संपत्ती बाळगणे तसेच दुसऱ्याच्या नावावर ट्रान्स्फर करणे या दोन्हींचाही समावेश आहे. नवीन सुधारित विधेयक ऑगस्ट २०१६ ला संसदेने मंजूर केले असून त्याचे कायद्यात रूपांतर होऊन अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०१६ पासून सुरू झाली आहे. त्यामुळे याआधी झालेल्या बेनामी व्यवहारासाठीची कायदेशीर कार्यवाही १९८८ च्या बेनामी व्यवहार (प्रतिबंधक) कायद्यानुसार होते, तर १ नोव्हेंबर २०१६ नंतर झालेल्या बेनामी व्यवहारासाठीची कायदेशीर कार्यवाही बेनामी व्यवहार (प्रतिबंधक) सुधारित कायदा २०१६ नुसार होते.

**नवीन सुधारित बिलामध्ये गुन्ह्यांची व्याप्ती व शिक्षा वाढविली आहे. यामध्ये बेनामी संपत्ती बाळगणे तसेच दुसऱ्याच्या नावावर ट्रान्स्फर करणे या दोन्हींचाही समावेश आहे. नवीन सुधारित विधेयक ऑगस्ट २०१६ ला संसदेने मंजूर केले असून त्याचे कायद्यात रूपांतर होऊन अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०१६ पासून सुरू झाली आहे.**

कायदेशीर कारावाई खालील प्रमाणे होते

- बेनामी व्यवहार १ नोव्हेंबर २०१६ च्या आधीचा



असेल, तर जास्तीजास्त ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही एकत्र अशी शिक्षा होऊ शकते आणि जर बेनामी व्यवहार १ नोव्हेंबर २०१६ नंतरचा असेल, तर जी कोणी व्यक्ती अशा व्यवहारात दोषी म्हणून सिद्ध होईल अशा एक किंवा एकाहून अधिक (बेनामीदार, बेनामी लाभार्थी तसेच मध्यस्थ) व्यक्तीस किमान एक वर्ष व जास्तीत जास्त ७ वर्षे सश्रम कारावास होऊ शकतो, तसेच सबंधित बेनामी संपत्तीच्या बाजार भावानुसार होणाऱ्या किमतीच्या २५% पर्यंत दंड होऊ शकतो.

- बेनिफिशियल ओनर किंवा त्याच्या वतीने कोणी बेनामीदाराकडे आपल्या बेनामी संपत्तीची कायदेशीर मागणी करू शकत नाही.
- केंद्र सरकार अशी बेनामी संपत्ती जप्त करू शकते.
- बेनामीदार किंवा त्याच्या वतीने कोणी अशी बेनामी संपत्ती बेनिफिशियल ओनर किंवा त्याच्या वतीने अन्य कोणाच्या नावाने ट्रान्स्फर करू शकणार नाही. जर केली, तर अशी ट्रान्स्फर ग्राह्य धरली जाणार नाही.

**व्यक्ती अशा व्यवहारात दोषी म्हणून सिद्ध होईल अशा एक किंवा एकाहून अधिक (बेनामीदार, बेनामी लाभार्थी तसेच मध्यस्थ) व्यक्तीस किमान एक वर्ष व जास्तीत जास्त ७ वर्षे सश्रम कारावास तसेच सबंधित बेनामी संपत्तीच्या बाजार भावानुसार होणाऱ्या किमतीच्या २५% पर्यंत दंड होऊ शकतो.**

- इथे एक लक्षात घेणे आवश्यक आहे, की बेनामी व्यवहार तसेच बेनामी संपत्ती बाबतची कार्यवाही प्राप्तिकर विभागामार्फत केली जाते, तर काळ्या पैशाबाबतची कार्यवाही सक्तवसुली संचलनालय (ईडी), सीमा शुल्क विभाग (कस्टम), पोलीस खाते (ईओडब्ल्यू) तसेच केंद्रीय गुन्हे अनवेक्षण (सीबीआय) यांसारख्या तपास यंत्रणा करतात.

थोडक्यात असे म्हणता येईल, की नवीन बेनामी व्यवहार (प्रतिबंधक) सुधारित कायदा २०१६ ची व्याप्ती आता वाढली असून बेनामी व्यवहार करणे आता टाळलेलेच बरे. अन्यथा बेनामी संपत्ती जप्त तर होईलच, शिवाय तुरुंगवास व दंड ही टाळता येणार नाही. ▪

### माननीय मुख्यमंत्र्यांची ‘१०० दिवसांचा कृती आराखडा’ मोहिम

# यशस्वी अंमलबजावणीसाठी CMMS 100 पोर्टल विकसित




महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून राज्य शासनाच्या प्रादेशिक, शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमार्फत ‘१०० दिवसांचा कृती आराखडा’ ही विशेष मोहीम राबविण्यात आली. ही मोहीम ७ जानेवारी ते १६ एप्रिल २०२५ या कालावधीत यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. या मोहिमेद्वारे विविध योजनांची अंमलबजावणी अधिक जलद गतीने आणि परिणामकारकरित्या करण्यात आली. तसेच, नागरी सेवा वितरण प्रणालीमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता आणि जनहिताचा प्राधान्यक्रम यांवर भर देण्यात आला.

उक्त मोहिमेची अचूक व यशस्वी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, पोलीस महासंचालक कार्यालयातील माहिती तंत्रज्ञान कक्षामार्फत <https://dgphq.in> या संकेतस्थळाच्या अंतर्गत ‘CMMS 100’ हे विशेष पोर्टल विकसित करण्यात आले.

पोलीस महासंचालक कार्यालयातील माहिती तंत्रज्ञान कक्षमधील १) प्रमोद




परशुराम गाडेकर, वरिष्ठ तांत्रिक अधिकारी

२) प्रशांत पांडुरंग हिरगळ, वरिष्ठ तांत्रिक अधिकारी

३) नटराजेश्वर सोमनाथ आंधळकर, वरिष्ठ तांत्रिक अधिकारी

या वरिष्ठ तांत्रिक अधिकाऱ्यांनी 'CMMS 100' हे पोर्टल बनविले आहे.

## वेबसाईटची गरज

१० कलमी कृती आराखड्याच्या अंतर्गत, राज्यातील पोलीस घटक यांच्या कार्यालयीन कामकाजाची माहिती मागवायची होती. त्यासाठी सातत्याने माहिती संकलन, प्रगतीचा आढावा आणि अहवाल सादर करणे आवश्यक होते. सदर प्रक्रिया सुलभ करण्यासाठी ही वेबसाईट बनविण्यात आली.

## पोर्टलची निर्मिती

CMMS 100 पोर्टलची रचना करताना खालील बाबींवर भर देण्यात आला:

**सोपे आणि वापरकर्ता सुलभ इंटरफेस:** प्रत्येक विभागाला आणि कार्यालयाला त्यांचे स्वतंत्र OTP आधारित लॉगिन देण्यात आले आहे. वापरकर्त्यांना सहजतेने माहिती भरता यावी यासाठी पोर्टलचे इंटरफेस अतिशय सोपे ठेवले गेले आहे.

**वर्गवारीत माहिती संकलन:** १० कलमी कृती आराखड्यातील (जसे की स्वच्छता, कार्यालयीन सुविधा, गुंतवणूक प्रोत्साहन इत्यादी) प्रत्येक मुद्द्यासाठी स्वतंत्र विभाग आहे.

**१० कलमी कृती आराखड्याच्या अंतर्गत, राज्यातील पोलीस घटक यांच्या कार्यालयीन कामकाजाची माहिती मागवायची होती. त्यासाठी सातत्याने माहिती संकलन, प्रगतीचा आढावा आणि अहवाल सादर करणे आवश्यक होते. सदर प्रक्रिया सुलभ करण्यासाठी ही वेबसाईट बनविण्यात आली.**

**सुरक्षा आणि गोपनीयता:** पोर्टलमध्ये उच्चस्तरीय डेटा संरक्षण यंत्रणा वापरण्यात आली. तसेच माहितीच्या सुरक्षिततेसाठी सायबर सुरक्षा उपाययोजना लागू करण्यात आल्या.

**डेटा ॲनालिटिक्स:** संकलित माहितीचा उपयोग करून वेळोवेळी प्रगती अहवाल तसेच संबंधित माहितीचे विश्लेषण ग्राफद्वारे करण्यात आले. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्णय घेण्यास मदत झाली.

## माहिती संकलन प्रक्रिया

माहिती संकलनाच्या विविध टप्प्यांवर पोर्टलमार्फत पोलीस घटकांकडून ३१ मार्च, ७ एप्रिल २०२५ व १६ एप्रिल २०२५ या तारखांना खालील दहा मुद्द्यावरील माहिती संकलित करण्यात आली.

१) संकेतस्थळ (Website )

२) स्वच्छता (Cleanliness)

३) जनतेच्या तक्रारींचे निवारण (Grievance Redressal)

४) कार्यालयातील सोयी व सुविधा (Amenities at work place)

५) शासकीय कामातील सुधारणा (Work improvement)

६) AI तंत्रज्ञानाचा वापर (Use of AI Technology)

७) गुंतवणूक प्रसार (Investment promotion)

८) Dial 112

९) इनोव्हेटीव्ह प्रोजेक्ट - १

१०) इनोव्हेटीव्ह प्रोजेक्ट - २

हे टप्पे निश्चित केल्यामुळे काकाजात शिस्तबद्धता आली आणि माहितीच्या अचूकतेत सुधारणा होऊन माहिती वेळेत प्राप्त झाली.

'CMMS100' ही वेबसाईट एक केंद्रीकृत डिजिटल प्रणाली म्हणून काम करते. यात राज्यातील प्रत्येक पोलीस युनिटचा डेटा व्यवस्थितपणे गोळा केला जातो. यामध्ये प्रत्येक घटकाला त्यांनी भरलेला अहवाल, छायाचित्रे आणि दहा-सूत्री कृती आराखड्याशी संबंधित अपलोड केलेली कागदपत्रे त्यांच्या लॉगिन मध्ये दिसतात.

हे पोर्टल User-friendly बनविण्यात आले आहे. तसेच यामध्ये प्रत्येक पोलीस घटकांना OTP बेस्ड लॉगिन दिल्यामुळे संवेदनशील माहितीचे संरक्षण होते.




यामध्ये रिअल-टाइम डॅशबोर्ड व स्वयंचलित अहवाल निर्मिती होते. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी आणि नोडल अधिकाऱ्यांना जिल्हा आणि विभागीय स्तरावर कामगिरीचा मागोवा घेण्यास मदत होते.

**पोर्टल कसे वापरावे याबद्दल प्रशिक्षण देण्यासाठी या टीमने विविध घटकांतील पोलीस नोडल अधिकारी यांच्याशी समन्वय साधला. सतत तांत्रिक साहाय्य प्रदान केले आणि डेटा वेळेवर आणि अचूकपणे सादर करावा याची खात्री करण्यासाठी नियमितपणे पाठपुरावा केला.**

पोर्टल कसे वापरावे याबद्दल प्रशिक्षण देण्यासाठी या टीमने विविध घटकांतील पोलीस नोडल अधिकारी यांच्याशी समन्वय साधला. सतत तांत्रिक साहाय्य प्रदान केले आणि डेटा वेळेवर आणि अचूकपणे सादर करावा याची खात्री करण्यासाठी नियमितपणे पाठपुरावा केला. यामुळे पोलीस घटकांना मुख्यमंत्री १०० दिवस कृती आराखडा याबद्दल करावयाच्या कार्यवाहीबद्दल स्पष्टता आली.

सदरील माहिती प्राप्त झाल्यानंतर शासनाने ठरवलेल्या मूल्यांकनानुसार सर्वोत्कृष्ट तीन परिक्षेत्रे निवडण्यात आली व सदरील माहिती शासनास पाठविण्यात आली.

'CMMS 100' पोर्टलमुळे पोलीस घटकांच्या कार्यालयांमधील कार्यपद्धतींचा अधिक बारकाईने आणि तांत्रिक पद्धतीने मागोवा घेता आला. त्यामुळे माहिती संकलनाची प्रक्रिया अधिक गतिमान झाली.

कार्यालयांच्या कार्यक्षमतेत वाढ झाली.

अहवाल सादरीकरण आणि







निर्णय प्रक्रिया सुलभ झाली.

शासन निर्णयांची अंमलबजावणी पारदर्शकपणे आणि वेळेवर झाली.

उल्लेखनीय बाब म्हणजे या टीमने ६७ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा-२०२४ (AIPDM) मधील Computer Awareness अंतर्गत Event-IV मध्ये Innovative IT Project या स्पर्धेमध्ये देशपातळीवर प्रथम क्रमांकाचा चषक प्राप्त केला आहे. (NCRB's Running Trophy for Empowering Police with Information Technology). आणि विशेष म्हणजे महाराष्ट्र पोलीस दलास या स्पर्धेमध्ये पहिल्यांदाच चषक मिळाला आहे.

माहिती तंत्रज्ञान कक्षामार्फत पोलीस महासंचालक कार्यालय तसेच महाराष्ट्रातील इतर पोलीस घटकांसाठी विविध प्रकारचे प्रकल्प राबविण्यात आले आहेत. यामध्ये,

१) पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस निरीक्षक यांची ऑनलाईन विनंती बदली व पदोन्नती,

२)विधानसभा निवडणूक २०२४ साठी 'Law Order And Crime in Election (LACE),

३) पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह व इतर पदके यांकरिता 'Medal Portal'

**महाराष्ट्र पोलीस दलास या स्पर्धेमध्ये पहिल्यांदाच चषक मिळाला आहे. माहिती तंत्रज्ञान कक्षामार्फत पोलीस महासंचालक कार्यालय तसेच महाराष्ट्रातील इतर पोलीस घटकांसाठी विविध प्रकारचे प्रकल्प राबविण्यात आले आहेत.**

४) पोलीस शिपाई ते सहा. पोलीस उपनिरीक्षक यांच्या सेवाजेष्ठता यादीकरिता 'Gradation Master' सॉफ्टवेअर,

५) Registry Management Software,

६) IPS Officers Database,

७) Library Management Software,

८) Stationary Management Application,

९) Court Case Status Portal

इत्यादी प्रकल्पांची यशस्वीपणे अंमलबजावणी केली आहे.

या 'CMMS 100' पोर्टलची अंमलबजावणी करण्याबाबत श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई, तसेच श्री. मल्लिकार्जून प्रसन्ना, तत्कालीन अपरपोलीसमहासंचालक(प्रशासन), डॉ. श्रीमती. आरती सिंह, तत्कालीन विशेषपोलीसमहानिरीक्षक(प्रशासन) व श्री. बालकृष्ण यादव, पोलीस उप-आयुक्त, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई शहर यांनी मार्गदर्शन केले. ■

कथा



सचिन बेंडभर
पुणे

# मनकवडी

**गावातल्या गोदीबरोबर भांडण झाल्यावर बाबुरावांना पोलीस स्टेशनमधून फोन आल्याने त्यांचे धाबे दणाणले. नक्कीच गोदीने आपली तक्रार केली असणार हे त्यांच्या लक्षात आले. पण पोलीस स्टेशनला गेल्यावर मात्र त्यांना त्यांच्या कल्पनेच्या एकदम विपरीत असा अनुभव आला. तिथे काय घडले? त्याचा त्यांच्या पूर्वीच्या आयुष्याशी कसा संबंध होता?**



नळावर गोदी नाही, असे पाहून बाबूरावांनी तिचा हंडा बाजूला सारून आपली घागर नळाला लावली. गोदीने हे पाहिल्यावर ती पाय आपटत आली. बाबूरावांकडे बघून तिने तोंडाचा पट्टा चालू केला. बघता बघता बाबूरावांच्या सात पिढ्यांचा उद्धार झाल्यावर त्यांचीही सहनशीलता डचमळली अन् त्यांनी तोंड उचकाटले,

''का गं भुंकती कुत्र्यावानी?''

मग त्यांनी घागरीला हात घालून ती खांद्यावर घेईपर्यंत गोदी आपला हंडा नळाच्या कट्ट्यावर आपटून बोंब मारीतच घरला गेली. बाबूराव तोंड बारीक करून घरात घुसले. घागर ठेवली अन् कपडे बदलून त्यांनी कंपनीचा रस्ता धरला. उशीर झाला म्हणून आजही साहेब झापणार, या कल्पनेनेच त्यांचे पाय जड झाले. अखेर चोरपावलाने ते घुसले अन् कामाला लागले. दुपारी बाराच्या ठोक्याला पोलीस स्टेशनमधून फोन आल्यावर साहेबाने बाबूरावाला बोलावून चांगलेच खडसावले.

''बाहेर काय लफडी करायची ती खुशाल करा, पण त्याची पोलीस चौकशी कंपनीत नको. जा, डॉक्टर सर्टिफिकेट देऊन खुशाल आठ दिवस गोंधळ घाला. सुटा!''

खाली मान घालून बाबूराव बाहेर पडले. रोख पन्नास रुपये देऊन डॉक्टर भाडळ्यांकडून सर्टिफिकेट घेतले. रजा अर्जाला जोडून अर्ज साहेबापुढे ठेवून ते बाहेर पडले, पण पोलीस स्टेशनला जायचे, या कल्पनेने त्यांच्या मनावर प्रचंड ताण आला. गोदीने आपल्याविरुद्ध तक्रार केली हे ते जाणून होते, पण या बयेने आपल्यावर काय काय आरोप केले असतील, या विचाराने त्यांच्या पोटात गोळा आला. पाय लटपटू लागले. त्यांनी विचार केला, 'पोलीस स्टेशनला जावे अन् त्यांनी डांबून ठेवले तर? नाही जावे तर संध्याकाळी चाळीत येऊन ओढत फरफटत नेले तर? नाही...' मनाचा हिय्या करून ते स्वतःच निघाले. चाळीतील कुजबूज बाबूरावांच्या बायकोच्या कानावर पडताच, तिने कंपनीत फोन लावला.

''बाबूराव आहेत का? त्यांची बायको बोलतेय.''

**खाली मान घालून बाबूराव बाहेर पडले. रोख पन्नास रुपये देऊन डॉक्टर भाडळ्यांकडून सर्टिफिकेट घेतले. रजा अर्जाला जोडून अर्ज साहेबापुढे ठेवून ते बाहेर पडले, पण पोलीस स्टेशनला जायचे, या कल्पनेने त्यांच्या मनावर प्रचंड ताण आला. गोदीने आपल्याविरुद्ध तक्रार केली हे ते जाणून होते, पण या बयेने आपल्यावर काय काय आरोप केले असतील, या विचाराने त्यांच्या पोटात गोळा आला.**



पलीकडून उत्तर मिळाले,

''मॅडम, पोलीस स्टेशनचं बोलावणं आलं अन् बाबूराव कामातूनच गेले.''

''कामातून गेले? तुम्ही पाहिलं का त्यांना?''

''सॉरी मॅडम, पण दुपारी बारा वाजता ते जुन्या पुलाच्या दिशेने गेलेले पाहिले मी.''

बाबूराव पुलाकडे गेल्याचे कळताच तिच्या मनात नको ती शंका येऊन तिने भोकाड पसरले. तिचा असा गहिवर चालू असताना, बाबूराव हसत हसत घरात घुसले. घरातली गर्दी पांगल्यावर त्यांनी बायकोला सांगायला सुरुवात केली.

''खरं सांगतो मने, पोलीस स्टेशनमध्ये जाताना जाम टरकलो होतो. ही केस एका महिला कॉन्स्टेबलकडे होती. मला पाहताच तिने बसायला खुर्ची दिली. ग्लासभर पाणी पुढे ठेवलं. मला काहीच न विचारता तिनंच जबाब लिहिला, मला वाचून दाखवला व त्यावर माझी सही घेतली आणि मला म्हणाली, 'एका महिलेला तुम्ही शिवीगाळ केली, तिचा हंडा फेकून दिला, तिला दमदाटी केली, असे तक्रार करणाऱ्या महिलेने तुमच्यावर आरोप केलेत. पण त्या महिलेला पोलिसी हिसका दाखवल्यानंतर तिने तुम्हाला अडकविण्यासाठी हे

आरोप केल्याचं कबूल केलंय. तसं तुम्हाला पाहिल्यानंतर तुम्ही यातलं काहीच केलेलं नसणार याची मला खात्री पटली. तुमची तशी हिंमतच होणार नाही. कॉलेजमध्ये असतानाही मुलींकडे वर नजर करून बघण्याचं धाडस तुमच्यात नसणार, खरं ना? चुकून एखादी मुलगी तुमच्या गाडीवर बसली तरी किमान तासाभरात तुम्ही तिची साधी चौकशीसुद्धा केली नसणार. किंवा एखाद्या मुलीने जर तुम्हाला बागेत भेटायला बोलावलं तर तुम्ही पळपुट्यासारखं घर गाठलेलं असावं. मग असा भित्रा प्राणी एका महिलेला दमदाटी कसा काय करील. तुम्ही जाऊ शकता...' खरं सांगतो मने, ती बाई म्हंजी मनकवडीच वाटली बघ.''

''अहो, पोलीसच ते. उडत्या पाखराची पिसं मोजणारे, पण तुम्ही माघारी येताना काय बोललात तिला?''

''काय नाय, जा म्हणाली अन् आलो निघून तसाच.''

''काही म्हणा तुम्ही, पण गड्याच्या जातीला डोकंच कमी. अहो निदान आभार तरी मानायचे का नाय तिचे. उद्या सकाळी जा अन् आभार मानून या तिचे.''

दुसऱ्या दिवशी बाबूराव पोलीस स्टेशनात हजर. दोन्ही हात जोडून त्यांनी मॅडमचे आभार मानले. दबकतच म्हणाले,

''मॅडम, चेहरा पाहून समोरच्या माणसाचा अंदाज घेता येतो हे खरं, पण तुम्ही तर माझी कुंडलीच मांडली समोर.''

मॅडम बाबूरावांकडे बघून हसत बोलल्या,

**''...तुम्हाला पाहिल्यानंतर तुम्ही यातलं काहीच केलेलं नसणार याची मला खात्री पटली. तुमची तशी हिंमतच होणार नाही. कॉलेजमध्ये असतानाही मुलींकडे वर नजर करून बघण्याचं धाडस तुमच्यात नसणार, खरं ना? चुकून एखादी मुलगी तुमच्या गाडीवर बसली तरी किमान तासाभरात तुम्ही तिची साधी चौकशीसुद्धा केली नसणार....''**



''बाब्या, तुझ्या गाडीवर बळेच बसलेली अन् तुझी बागेमध्ये तासभर वाट पाहणारी मीच होते!''

''म्हणजे तू ....!''

कराटे चॅम्पियन स्नेहा मॅडमना बघून बाबूरावांच्या पूर्वस्मृती जाग्या झाल्या. स्वतःच्या बावळटपणाची लाज वाटल्याने मॅडमचे आभार मानून ते तेथून सटकले. वीस वर्षांपूर्वीचे कॉलेज आठवत ते घरी आले. घरी येताच बायकोने विचारले,

''सांगा ना, काय बोलल्या मॅडम?''

बाबूराव नव्या नवरीगत लाजत बायकोला म्हणाले,

''तुझ्याशपथ खरं सांगतो मने, आभार मानले अन् आल्या पावली माघारी फिरलो. पुढचं बोलून काय करायचंय आपल्याला? असतीय एखादी मनकवडी असं म्हणून गप बसायचं म्हजी झालं..!'' ■

# गणिताची गोडी



सुरेश वांदिले
मुंबई

**गणितीय सूत्रांना समजून घेऊन त्यांचा वापर करत वेगवेगळी उत्तरे शोधण्याचे कौशल्य प्राप्त केलेल्या व्यक्ती प्रत्यक्ष जीवनातील अनेक जटील समस्या वस्तुनिष्ठपणे हाताळू शकतात. या समस्या सोडवण्यासाठी अचूक आणि तर्कनिष्ठ उपाय सुचवू शकतात. त्यामुळेच या विषयाच्या विद्यार्थ्यांना जगभरातील विविध क्षेत्रांत अनेक करिअरच्या संधी आहेत.**



मानवी मेंदूचा विश्लेषणात्मक विकास करण्यात आणि त्याला अधिक सक्षम बनवण्यात गणिताची मदत होत असल्याचे स्टॅनफोर्ड विद्यापीठातील संशोधक डॉ. तान्या इव्हान्स यांनी त्यांच्या संशोधनाद्वारे दाखवून दिले.

गणितावर प्रभुत्व मिळवल्यास कोणतीही समस्या सोडवण्याचे कौशल्य अधिकाधिक प्रगत होत असल्याचे अभ्यासकांना दिसून आले आहे. गणितज्ञ जेव्हा समस्या सोडवतात, तेव्हा त्यात स्पष्टता असते. अधिक चांगल्या तऱ्हेच्या कार्यपद्धतीसुद्धा यातून विकसित होतात.

**गणितीय सूत्रांना समजून घेऊन त्यांचा वापर वेगवेगळी उत्तरे शोधण्याचे कौशल्य प्राप्त केलेल्या व्यक्ती प्रत्यक्ष जीवनातील अनेक जटील समस्या वस्तुनिष्ठपणे हाताळू शकतात. या समस्या सोडवण्यासाठी अचूक उपाय सुचवू शकतात.**

गणितीय कौशल्यामुळे विविध समस्या अधिक साकल्याने समजून घेणे सुलभ जाते. विश्वाची रहस्ये शोधून काढण्यासाठी गणितीय सूत्रे आणि सिद्धांत यांचा सर्वाधिक उपयोग झालेला आहे. गणित ही एकमेव वैश्विक भाषा असल्याचे समजले जाते. कोणताही देश– भाषा– प्रांत– संस्कृती यानुसार गणितीय सूत्रे आणि सिद्धांत आणि व्याख्या बदलत नाहीत, त्यामुळे गणितज्ज्ञ कोणत्याही देशात आणि प्रांतात सहजपणे कार्यरत राहू शकतो.




आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा पाया भक्कम करण्यात गणिताने सर्वाधिक महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गणितीय सूत्रांचा वापर करून नवे शोध लावले जात आहेत. चंद्रावरील स्वारीपासून मंगळावर यान उतरवण्यापर्यंत सर्व प्रकारची किमया गणितीय सूत्रे/ प्रमेये/ सिद्धांत यांच्या मदतीनेच मानवास शक्य होऊ शकली. जगातील सर्व उंच इमारतींचा पाया हा गणितीय सिद्धांतांनी सिद्ध केल्यावरच पक्का होऊ शकला. संगणक, विमान वाहतूक, स्कॅनिंग, कोडिंग, सॉफ्टवेअर, कृत्रिम बुद्धिमत्ता आदी क्षेत्रांचा विस्मयकारक विकास हा गणितामुळेच होऊ शकला.

गणितीय सूत्रांना समजून घेऊन त्यांचा वापर वेगवेगळी उत्तरे शोधण्याचे कौशल्य प्राप्त केलेल्या व्यक्ती प्रत्यक्ष जीवनातील अनेक जटील समस्या वस्तुनिष्ठपणे हाताळू शकतात. या समस्या सोडवण्यासाठी अचूक उपाय सुचवू शकतात. त्यामुळेच अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या विषयाकडे वळावे यासाठी जगभरात विशेष प्रयत्न

केले जातात. अमेरिकेत एप्रिल महिना हा गणित जाणिवजागृतीचा महिना म्हणून साजरा केला जातो. गणिताचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन, भारतातही प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी या विषयाकडे वळायला हवे.

## करिअर संधी

गणितावर प्रभुत्व असणाऱ्या व्यक्तीला करिअरच्या विविध संधी उपलब्ध होतात. वित्त (फायनान्स), निर्मिती (मॅन्युफॅक्चरिंग), विमा प्रबंधन (ॲक्चुअरीज), अभियांत्रिकी (इंजिनीअरिंग), तसेच दळणवळण (कम्युनिकेशन), उद्योग व व्यवसाय (बिझिनेस), विज्ञान या क्षेत्रांमध्ये यशस्वी करिअर करण्यासाठी गणितातील प्रभुत्व किंवा उत्तम आकलन महत्त्वाचे ठरते. ही क्षेत्रे परस्परविरोधी दिसत असली तरी त्यांचा पाया गणितीय कौशल्य हाच असतो, हे लक्षात ठेवायला हवे.

## काही महत्त्वाच्या संस्था

### (१) आयआयटी दिल्ली:

डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्स या विभागाने बीटेक ॲण्ड ड्युएल डिग्री इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटिंग (मॅक) हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. जेईई (जॉईंट एंट्रन्स एक्झामिनेशन) ॲडव्हान्स्ड परीक्षेतील गुणांवर आधारित या अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. या अभ्यासक्रमाच्या वैशिष्ट्यपूर्ण विषयघटकांमुळे, हा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना सार्वजनिक

**वित्त (फायनान्स), निर्मिती (मॅन्युफॅक्चरिंग), विमा प्रबंधन (ॲक्चुअरीज), अभियांत्रिकी (इंजिनीअरिंग), तसेच दळणवळण (कम्युनिकेशन), उद्योग व व्यवसाय (बिझिनेस), विज्ञान या क्षेत्रांमध्ये यशस्वी करिअर करण्यासाठी गणितातील प्रभुत्व किंवा उत्तम आकलन महत्त्वाचे ठरते.**

आणि खाजगी क्षेत्रातील अनेक कंपन्यांमध्ये नोकरीच्या उत्तमोत्तम संधी सातत्याने मिळाल्या आहेत.

यामध्ये फायनान्स (वित्त), ॲनॅलिटिक्स (विश्लेषण), कन्सल्टिंग (सल्ला सेवा), क्रिप्टोग्राफी (डिजिटल डेटा सुरक्षितरीत्या पाठवण्याचे तंत्र किंवा भाषा, ज्यामुळे पाठवणारा आणि स्विकारणाराच ही माहिती वाचू अथवा पाहू शकतो) यांवर आधारीत सुरक्षा आणि माहिती तंत्रज्ञान आदी कंपन्यांचा समावेश आहे.

संपर्क–

https://maths.iitd.ac.in/

### (२) आयआयटी गुवाहाटी:

डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्स या विभागाने बीटेक इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटिंग हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. अशा प्रकारचा अभ्यासक्रम सुरू करण्यात, या आयआयटीने आघाडी घेतली आहे.

संपर्क–

https://www.iitg.ac.in

### (३) मुंबई आयआयटी

बीएस इन मॅथेमॅटिक्स हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम करता येतो. या अभ्यासक्रमास दोन पद्धतींनी प्रवेश दिला जातो– (१) जेईई ॲडव्हान्स्डचे गुण. (२) यंदा १२ वी (गणित विषयासह विज्ञान) ची परीक्षा दिलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी, इंडियन नॅशनल मॅथेमॅटिकल ऑलिंपियाडची कनिष्ठ किंवा वरिष्ठ अर्हता प्राप्त केली असेल ते, 'बीएस एन्ट्रन्स एक्झामिनेशन' द्वारे या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळवू शकतात.

संपर्क – math.iitb.ac.in

### (४) आयआयटी इंदोर

बीटेक इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटिंग सायन्स.

संपर्क–

iiti.ac.in

### (५) आयआयटी कानपूर

या संस्थेच्या डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्सने पुढील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

**(१)** बीएस (बॅचलर ऑफ सायन्स) इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड सायंटिफिक कॉम्प्युटेशन

अभ्यासक्रमाचा कालावधी ४ वर्षे.

**(२)** बीएस– एमएस (बॅचलर ऑफ सायन्स– मास्टर ऑफ

सायन्स) इन मॅथेमॅटिक्स.

अभ्यासक्रमाचा कालावधी पाच वर्षे.

संपर्क–

https://www.iitk.ac.in/math/bs-ms

**(६) आयआयटी वाराणसी (बनारस हिंदू विद्यापीठ)**

या संस्थेच्या डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्सने, ड्युएल डिग्री इन मॅथेमॅटिक्स हा अभ्यासक्रम सुरू केला आहे.

कालावधी पाच वर्षांचा.

संस्थेने दिलेल्या माहितीनुसार औद्योगिक जगतात या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम संधी मिळत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वाधिक ओढा या अभ्यासक्रमाकडे दिसून येतो. या अभ्यासक्रमाला जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेतील गुणांवर आधारीत प्रवेश दिला जातो.

संपर्क–

https://www.iitbhu.ac.in/dept/math

**(७) आयआयटी रोपर बीटेक इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटिंग**

संपर्क–

iitpr.ac.in/m

**(८) आयआयटी कानपूर**

या संस्थेद्वारे बीएस एमएस इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड सायंटिफिक

**संस्थेने दिलेल्या माहितीनुसार औद्योगिक जगतात ड्युएल डिग्री इन मॅथेमॅटिक्स या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम संधी मिळत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वाधिक ओढा या अभ्यासक्रमाकडे दिसून येतो.**

कॉम्प्युटिंग हा इंटीग्रेटेड आणि बीएस इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड सायंटिफिक कॉम्प्युटिंग.

संपर्क –

iitk.ac.in/maths

**(९) एनआयटी (नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) सुरत**

या संस्थेच्या डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्स ॲण्ड ह्युमॅनिटीज मार्फत पाच वर्षे कालावधीचा इंटीग्रेटेड एमएस्सी इन मॅथेमॅटिक्स हा अभ्यासक्रम चालवला जातो. प्रवेशासाठी जेईई – मेनचे गुण ग्राह्य धरले जातात.

संपर्क–

https://www.svnit.ac.in

**(१०) एनआयटी रुरकेला**

इंटीग्रेटेड एमएस्सी इन मॅथेमॅटिक्स हा पाच वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम करता येतो.

संपर्क–

https://nitrkl.ac.in/

**(११) एनआयटी आगरताळा**

या संस्थेमध्ये, बीएस, एमएस ड्युएल डिग्री इन मॅथेमॅटिक्स हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. कालावधी पाच वर्षे.

संपर्क–

https://www.nita.ac.in

**(१२) एनआयटी पाटणा**

इंटीग्रेटेड एमएस्सी इन मॅथेमॅटिक्स या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण करता येतो.

संपर्क–

http://www.nitp.ac.in/

**(१३) बेंगळुरु स्थित इंडियन इंस्टिट्यूट ऑफ सायन्स**

येथे बीएस (बॅचलर ऑफ सायन्स – रीसर्च) इन मॅथेमॅटिक्स हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम करता येतो. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी, जेईई मेन/ ॲडव्हान्स्ड परीक्षा आणि आयसर (इंडियन इंस्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रीसर्च) ॲडमिशन टेस्टचे गुण ग्राह्य धरले जातात.

संपर्क– ug.iisc.ac.in/math.

**(१४) कोलकाता स्थित इंडियन स्टॅटिस्टिकल इंस्टिट्यूट**

या संस्थेचा, बॅचलर ऑफ मॅथेमॅटिक्स हा अभ्यासक्रम बेंगळुरू कॅम्पस येथे करता येतो. तीन वर्षे कालावधीच्या या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या प्रत्येक

विद्यार्थ्याला दरमहा पाच हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

संस्थेच्या चाळणी परीक्षेद्वारे निवड केली जाते.

संपर्क–

isical.ac.in/admission

### (१५) इंडियन इंस्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अ‍ॅण्ड रीसर्च

या संस्थेतील बीएस– एमएस या इंटीग्रेटेड अभ्यासक्रमांतर्गत स्पेशलायझेशनसाठी गणित हा विषय निवडता येतो.

संपर्क –

iiser.ac.in

### (१६) नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अ‍ॅण्ड रीसर्च, भुवनेश्वर

या संस्थेतील इंटीग्रेटेड एमएस्सी या अभ्यासक्रमांतर्गत गणित या विषयात स्पेशलायझेशन करता येते.

संपर्क–

niser.ac.in

### (१७) मुंबई विद्यापीठ

‘सेंटर फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्स’ या अभ्यासक्रमांतर्गत गणित विषयात स्पेशलायझेशन करता येते.

संपर्क–cbs.ac.in

**ज्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना, उपरोक्त नमूद संस्थेत काही कारणांमुळे प्रवेश मिळू शकत नाही, त्यांनी निराश न होता दर्जेदार शैक्षणिक संस्थेमधून गणितात बीएस्सी करावे. पुढे विद्यापीठातील, डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्स (गणित विभाग) मधून एम.एस्सी करावे.**

### (१८) चेन्नई मॅथेमॅटिकल इंस्टिट्यूट

या संस्थेत बीएस्सी (ऑनर्स) इन मॅथेमॅटिक्स, बीएस्सी (ऑनर्स) इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड कॉम्प्युटर सायन्स, आणि बीएस्सी (ऑनर्स) इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड फिजिक्स हे प्रत्येकी तीन वर्षे कालावधीचे अभ्यासक्रम करता येतात.

निवड चाळणी परीक्षेद्वारे केली जाते.

### (१९) इंस्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स ॲण्ड ॲप्लिकेशन भुवनेश्वर

या संस्थेत, बीएस्सी (ऑनर्स) इन मॅथेमॅटिक्स ॲण्ड ॲप्लिकेशन हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम करता येतो. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाते. परीक्षेचे एक केंद्र मुंबई येथे आहे.

अर्हता– बारावीमध्ये गणित आणि इंग्रजी विषयांचा अभ्यास केलेला असावा.

या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या १५ प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना, भारत सरकारच्या **‘नॅशनल बोर्ड फॉर हायर मॅथेमॅटिक्स’**मार्फत वार्षिक ६० हजार रुपये एवढी शिष्यवृत्ती दिली जाते.

संपर्क–

https://iomaorissa.ac.in

ज्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना, उपरोक्त नमूद संस्थेत काही कारणांमुळे प्रवेश मिळू शकत नाही, त्यांनी निराश न होता दर्जेदार शैक्षणिक संस्थेमधून गणितात बीएस्सी करावे. पुढे विद्यापीठातील, डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्स (गणित विभाग) मधून एम.एस्सी करावे. या दोन्ही अभ्यासक्रमात उत्तम कामगिरी केल्यास, या विद्यार्थ्यांनाही चांगल्या करिअर संधी उपलब्ध होऊ शकतात. ■

**S.B.Collect**

**छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी**

**https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php**

***अथवा***

खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.



**दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/-**

**वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त**

# ऑपरेशन प्रस्थान- एक पाऊल प्रकाशाकडे...

# रोजगार मेळावा

## पोलीस विभागाचे समाजाभिमुख योगदान



कुमार चिंता
पोलीस अधीक्षक
यवतमाळ

**यवतमाळमधील बेरोजगार तरुण वाममार्गाच्या दिशेला वळू नये म्हणून यवतमाळ पोलीस प्रशानानाने जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रोजगार मेळावा आयोजित केला होता. सदर मेळावा हा १७ ते २३ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान पार पडला. या मेळाव्यात विविध क्षेत्रांमधील १२ नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. तर ७,५२५ बेरोजगारांनी सहभाग नोंदवला**




तरुणाई ही देशाची खरी संपत्ती आहे. सध्याची परिस्थिती पाहता बेरोजगारी ही आजच्या तरुणाईपुढील सर्वात मोठी अडचण आहे. शिकून सवरून रोजगार न मिळाल्यामुळे अनेक तरुण नैराश्यात अडकत आहेत. हेच नैराश्य त्यांना चुकीच्या वाटेवर घेऊन जात आहे. याचा परिणाम म्हणून तरुणाई गुन्हेगारी, व्यसनाधीनता समाजविघातक कृत्ये या वाटेकडे जाण्याची भीती निर्माण होत आहे. त्यामुळे अशा बाबींना आळा घालण्याकरिता वेळीच मदतीचा व



समुपदेशनाचा आधार मिळणे फार महत्त्वाचे ठरते. याच सामाजिक दृष्टिकोन तथा जाणिवेतून यवतमाळ पोलीस दलाने पुढाकार घेत तरुणाईकरिता 'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करून ग्रामीण भागातील तरुणाईला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

यवतमाळ जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या मोठा असल्याने बेरोजगार तरुणाईला सुलभ होईल या दृष्टीने दिनांक १७ ते २३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान जिल्ह्यातील सहा. पोलीस उपविभाग निहाय व यवतमाळ शहरात जिल्हा स्तरावर हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये यवतमाळ उपविभाग– १८७०, पुसद उपविभाग – ११६०, उमरखेड उपविभाग – ९५०, पांढरकवडा उपविभाग – ११७५, वणी उपविभाग – १३२० व जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात – १०५० अशा एकूण ७५२५ युवक व युवतींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

या उपक्रमामध्ये विविध क्षेत्रातील १२ नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. सदर रोजगार मेळाव्यात युवक व युवतींना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या शैक्षणिक योग्यतेनुसार १) Security guard २) Security supervisor ३) Justin foundation nursing assistants and caretakers ४) BPO position ५) Logistics roles at GMR airport Hyderabad ६) Marketing executives ७) Manufacturing roles in the automobile industry ८) In store sales positions अशा प्रकारच्या क्षेत्रांमध्ये रोजगार उपलब्ध होत आहे. नियुक्त झालेल्या तरुण/तरुणींना रोजगाराच्या ठिकाणी संबंधित कंपनीद्वारे १८ हजार ते २५ हजार रुपयांपर्यंतचे मासिक वेतनाचे ऑफर लेटर देण्यात येत आहे.

**यवतमाळ पोलीस दलाने पुढाकार घेत तरुणाईकरिता 'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करून ग्रामीण भागातील तरुणाईला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.**

यवतमाळ पोलीस दलाच्या या पावलामुळे समाजात एक सकारात्मक संदेश गेला, की पोलीस केवळ कायदा राखणारे नाहीत तर समाजघटक म्हणून सुद्धा काम करत आहेत. आयोजित करण्यात आलेला रोजगार मेळावा म्हणजे पोलीस व जनता यांच्यात विश्वासाचा पूल निर्माण करून सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारा ठरला आहे.

सदर रोजगार मेळाव्यामुळे अनेकांना नवी दिशा मिळाली आहे. पर्यायाने आयोजित मेळावा हा बेरोजगार तरुण वर्ग मुख्य प्रवाहात येण्यास मदत होणारा असल्याने त्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

यवतमाळ पोलीस दलाच्या 'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या भव्य सामाजिक उपक्रमामुळे ग्रामीण भागातील तरुणाईला रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.



तरुणाईला पोलीस दलाशी जोडून पोलीस–जनता परस्पर संवाद साधता आला. या उपक्रमाअंतर्गत सुमारे ७५२५ युवक व युवतींसोबत संवाद साधत हा संवाद अधिक दृढ केला आहे. पोलीस भरतीकरिता हजारो अर्ज येतात. परंतु उपलब्ध पदे कमी राहत असल्याने निवड न झालेल्या उमेदवारांना पर्यायी संधी उपलब्ध करून देण्यात आली. शिवाय बेरोजगार तरुणांवर असामाजिक तत्त्वांचा प्रभाव पडू नये याकरिता किंवा ते गुन्हेगारीकडे वळू नयेत यासाठी सकारात्मक दिशेने वळवण्याचा सुंदर प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला आहे.

**या उपक्रमाअंतर्गत सुमारे ७५२५ युवक व युवतींसोबत संवाद साधत हा संवाद अधिक दृढ केला आहे. पोलीस भरतीकरिता हजारो अर्ज येतात. परंतु उपलब्ध पदे कमी राहत असल्याने निवड न झालेल्या उमेदवारांना पर्यायी संधी उपलब्ध करून देण्यात आली.**

यवतमाळ पोलिसांनी राबविलेल्या सामाजिक उपक्रमाचे पाऊल हे केवळ सुरक्षेपुरते मर्यादित नसून राष्ट्राची संपत्ती असणारे तरुणाईला आधार देणारे ठरले आहे. याचा सकारात्मक परिणाम म्हणजे समाज सुरक्षित, सशक्त आणि प्रगतिशील बनणार आहे. तसेच गुन्हेगारीला आळा बसून सकारात्मक ऊर्जा निर्माण होणारा आहे. ■

दिनविशेष



भारती सावंत
नवी मुंबई

# ध्यास पर्यावरण संवर्धनाचा



*लावूया सर्वांनीच झाडे चार टाळू पर्यावरणाचा ऱ्हास*

*चिवचिवती पाखरे त्यावर बांधून घरटी पिलांना खास*

आजच्या घडीला घराघरांत, गावागावांत 'पर्यावरणाचा ऱ्हास होतो, वृक्षारोपण करायला हवे', 'झाडे लावा झाडे जगवा', 'मानवाच्या दुष्कृत्यामुळे त्याला ही शिक्षा मिळाली' अशी बोधवाक्ये ऐकायला मिळत असतात. परंतु पर्यावरणाचा ऱ्हास कोणत्या कारणांमुळे झाला

त्यासाठी वृक्ष लावणे किंवा त्यांची जोपासना करणे ही जबाबदारी घ्यायला कोणीच तयार नसते, किंवा हे आपणच केले आहे हे कोणीही मान्यही करत नाही. ‘झाडे लावा’ असे प्रत्येकाच्या तोंडून ऐकायला मिळते. ‘मी झाडे लावतो’ असे कधी कोणी उच्चारत नाही. याचाच अर्थ जे काम करायचे आहे ते आपण नव्हे, तर इतरांनी करायचे आहे अशी सर्वांची एकमेकांच्याविषयी भावना असते. वृक्षारोपण न केल्याने पाऊसपाण्याचे प्रमाण कमीजास्त झाले आहे. ग्लोबल वॉर्मिंग झाले आहे. अशा भीषण परिस्थितीत वृक्षारोपण होताना फारसे दिसत नाही. परंतु वृक्षतोड मात्र होते. जिकडे पाहावे तिकडे सिमेंट काँक्रीटचे जंगल पाहायला मिळते.

सुधारणांच्या नावाखाली झाडे तोडून पूल, धरणे, इमारती, बंगले यांचे बांधकाम चालू असलेले दिसते. झाडे लावणे हे उद्दिष्ट समोर ठेवून कुणीही काम करताना दिसत नाही. प्रत्येकजण याचा विचार करत असतो की मीच का? सुरूवात दुसऱ्याकडून व्हावी. ‘मी हे करीन’ असे कुणीही बोलताना दिसत नाही.

यामुळेच या पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. निसर्गाची लूट होत आहे आणि मानव फक्त घोषणा देण्यातच आपला वेळ व्यतीत करत आहे. निसर्गाने आपल्याला भरभरून दिले आहे. परंतु आपण आपल्या करणीने त्याचा ऱ्हास केला आहे. मनुष्य नोकरीच्या निमित्ताने शहरात येतो आणि तिथलाच होऊन जातो. परंतु त्याला त्या भागाविषयी, त्या शहराविषयी तितकी आत्मीयता नसते. पैसे कमावणे एवढाच उद्देश असतो, आणि तो मिळाला की त्याला आपले गाव गाठायचे असते. गावातही कोणीही पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करताना दिसत नाही. कारण त्यांना असे वाटते, पगार घेणारे खायला येणार आणि आम्ही त्यांची सोय का करावी? अशा कोत्या प्रवृत्तीमुळे झाडे लावण्याच्या, त्याची नित्य जोपासना करण्याच्या भानगडीत कोणीही पडत नाही हेच सत्य आहे. इतरांनी लावलेली झाडे तोडण्यात त्यांना मर्दुमकी वाटते. प्रत्येक जण आपापला स्वार्थच बघत असतो. जगात काय चालले आहे किंवा बाहेर काय आहे याची कोणालाही पर्वा नसते. आम्ही पैसे फेकून सर्व काही खरेदी करू शकतो ही प्रवृत्ती असल्यामुळे लोकांना पृथ्वीला वाचवण्याचे, पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे कार्य तितकेच महत्त्वाचे आहे हे लक्षात येत नाही.

**सर्वत्र 'पाणी वाचवा' अशी मोहीम चालवली जात असली तरी आपल्या घरातला अनावश्यक वाहणारा पाण्याचा नळ किती जण बंद करतात? तर कोणीच नाही. कारण प्रत्येकाला अपेक्षा असते की दुसऱ्याने नळ बंद करावा. सार्वजनिक ठिकाणी पंखा किंवा लाईटस् चालूच असतात. ते बंद करायचे कष्ट कोणी घेत नाही. कारण प्रत्येकाला असे वाटते की हे लाईट बिल मला थोडेच भरायचे आहे?**

सर्वत्र ‘पाणी वाचवा’ अशी मोहीम चालवली जात असली तरी आपल्या घरातला अनावश्यक वाहणारा पाण्याचा नळ किती जण बंद करतात? तर कोणीच नाही. कारण प्रत्येकाला अपेक्षा असते की दुसऱ्याने नळ बंद करावा. सार्वजनिक ठिकाणी पंखा किंवा लाईटस् चालूच असतात. ते बंद करायचे कष्ट कोणी घेत नाही. कारण प्रत्येकाला असे वाटते की हे लाईट बिल मला थोडेच भरायचे आहे? मी का बंद करू? परंतु हे राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान आहे, हे कोणीही ध्यानात घेत नाही. आज या सोयीसुविधा पैसे देऊन तरी आपल्याला उपलब्ध होत आहेत. परंतु भविष्यात अशी वेळ येईल की पैसे देऊनही आपल्याला या सोयी सुविधा मिळणारच नाही. तेव्हा काय करणार?

आज आपण वीज, पाणी यांची बचत केली, तर भविष्यात पुढच्या पिढीला त्याचा उपभोग घेता येईल. नाहीतर त्यांचे जीवन अंधकारमय होऊन जाईल. वीज, पाणी वाचवले

तर भविष्यातही आपला साठा संपणार नाही. दूरदृष्टी असणाऱ्या शिवरायांनी त्या काळी बांधलेले किल्ले, बुरुज आज आपण मोठ्या अभिमानाने न्याहाळत, मिरवत असतो. मग आपल्या पुढच्या पिढीसाठी आपण काहीतरी करावे किंवा आपण समाजाचे काही देणे लागतो किंवा हे आपले काम आहे, आपले कर्तव्य आहे अशी वृत्ती का असू नये? शिवरायांनी हा विचार केला असता तर आपले हिंदवी स्वराज्य स्थापन झाले असते का?

देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांनी आपले रक्त या मातीवर सांडले नसते तर आजही आपण पारतंत्र्याच्या विळख्यात जखडलेले असतो. अशा विचारांमुळे मानवाची प्रगती न होता अधोगतीच होत आहे. मानवाच्या या हानिकारक कृतीमुळे निसर्गचक्र बदलले आहे. ऋतू, हंगाम बदलले आहेत. मानव रोगराई, महामारी, दारिद्र्य, बेरोजगारी, भूक यांचा सामना करत आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे मानवाला बऱ्याच वेळा फटका बसलेला आहे. जीवित आणि वित्तहानी सुद्धा होत आहे. तरी मानवाचे डोळे अजूनही उघडले नाहीत. कारण आपले म्हणून करणे आणि दुसऱ्यासाठी करणे यातील हा फरक आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे ही आपली जबाबदारी आहे हे ज्या दिवशी मानवाच्या लक्षात येईल त्या दिवशी आपली प्रगती सुरू होईल हेच खरे. पण जेव्हा कळेल तेव्हा वेळ निघून गेलेली असेल असे व्हायला नको. तेव्हा मानवाने आता तरी जागे व्हावे आणि वृक्षारोपण करून पाण्याची बचत करावी आणि जितके पाणी जमिनीत मुरवता येईल तितके झिरपण्यासाठीचे प्रयत्न

**मानवाच्या या हानिकारक कृतीमुळे निसर्गचक्र बदलले आहे. ऋतू, हंगाम बदलले आहेत. मानव रोगराई, महामारी, दारिद्र्य, बेरोजगारी, भूक यांचा सामना करत आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे मानवाला बऱ्याच वेळा फटका बसलेला आहे. जीवित आणि वित्तहानी सुद्धा होत आहे. तरी मानवाचे डोळे अजूनही उघडले नाहीत.**

व्हायला हवेत.

रोज एक तरी झाड लावण्याचा वसा प्रत्येक मानवाने आपल्या मनाशी ठसवायलाच हवा. जागोजागी हिरवळ उगवल्याने मातीची धूपही टाळली जाते आणि पाणीही जमिनीत झिरपले जाते. आपल्या पुढच्या भवितव्याचा आपण आज सखोल विचार करायला हवा. आपल्या आजोबा पणजोबांनी लावलेल्या झाडांची मधुर फळे आपण आज चाखत असतो. तसेच आपण केलेल्या सत्कर्माचे फळ आपल्या मुलांनी, नातवंडांनी खावे म्हणून आपला प्रयत्न यशस्वी करणे हे आपले परम कर्तव्य आहे. समाज हितासाठी ते गरजेचे आहे आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी फायदेशीर आहे. ■

**S.B.Collect**

**छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी**

**https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php**

***अथवा***

खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.



**दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त**



संजीव देवकर
पुणे

# शास्त्रीय संगीतातील ‘पंचम’

भारतीय अभिजात संगीताला अतिशय प्राचीन परंपरा लाभली आहे. कालौघात ग्वाल्हेर, किराणा, जयपूर अशी वैशिष्ट्यपूर्ण घराणी उदयाला आली. भारतात लोकसंगीताचा वसाही प्राचीन आहे. या दोन्ही गोष्टींचा सुरेख संगम पुढे अनेक संगीतकारांनी केला. पंचमदा अर्थात राहुल देव बर्मन हेही याच मांदियाळतले आघाडीचे नाव. त्यांनी अनेक चित्रपटांना संगीत देताना भारतीय शास्त्रीय संगीतातील रागांचा वापर केला.



आर. डी. अर्थात राहूल देव बर्मन हे हिंदी-बंगाली चित्रपटसृष्टीतील एक प्रतिभावंत, बुद्धिमान आणि तितकेच अवलिया संगीतकार! आधुनिक काळातील सर्वाधिक प्रयोगशील संगीतकार म्हणून आर. डी. बर्मन हे हिंदी सिनेसृष्टीत प्रचलित होते आणि आहेत. ७० व ८० च्या दशकात नावीन्यपूर्ण संगीत देत आरडींनी काळाच्या पुढे डोकावणारे संगीत निर्माण केले. ‘संगीतातील ट्रेंडसेटर’ म्हणून ते या क्षेत्रात सुपरिचित आहेत. त्यांच्या संगीतातील ठेका प्रत्येक पिढीला आजही आकर्षित करतो. इतकेच नाही, तर आरडींनी संगीत दिलेल्या गाण्यांचीच सर्वाधिक रीमिक्स झाली आहेत.

प्रत्येक काळातील पिढी बर्मनदांचे संगीत सर्वात अधिक पसंत करत राहिली

आहे. समकालीन संगीतकार सपन-जगमोहन, भप्पी लाहिरी, राजेश रोशन, हेमंत भोसले यांना आरडींच्या लय आणि ठेक्याने भुरळ घातली, तर ९० च्या दशकातील अनु मलिक, जतीन ललित, आनंद-मिलिंद आणि संगीत क्षेत्रातील आजचे आघाडीचे संगीतकार विशाल शेखर, शंकर एहसान लॉय, प्रितम, साजिद-वाजिद इत्यादी संगीतकारांनी राहूल देव बर्मन यांच्या संगीत परंपरेची वाट चोखाळली.

राहूल देव बर्मन यांचा जन्म २७ जून, १९३९ रोजी त्रिपुरा राजघराण्यात झाला. बंगाली परंपरेनुसार त्यांचे 'टुबलू' हे टोपणनाव ठेवण्यात आले. पण चित्रपटनगरीत ते 'पंचम' या नावानेच अधिक प्रसिद्ध झाले. सर्वजण आदराने त्यांना पंचमदा म्हणत. संगीताचा वारसा त्यांच्या घरातच होता. आजोबा नवद्वीपचंद्र देव हे त्रिपुरा घराण्यातील गायक व सतारवादक होते. तर पिता सचिन देव बर्मन यांनी संगीतकार म्हणून हिंदी चित्रपटगीतांचा सुवर्णकाळ गाजविलेला.

त्याच काळात सन १९५५ ते १९६७ दरम्यान आर. डी. यांनी सचिनदांचे सहायक म्हणून काम केले. पंचमदांनी वयाच्या १६ व्या वर्षापासूनच प्यासा ते जुगनू चित्रपटापर्यंतच्या अनेक चित्रपटांमधील सचिनदांनी संगीतबद्ध केलेल्या संगीतरचनांमध्ये मौलिक भूमिका बजावलेली आहे. ज्वेल थीफचे टायटल म्युझिक, आराधनाचे



पार्श्वसंगीत यासोबतच सोलहवां साल, गाईड, तीन देवियाँ, तेरे घर के सामने, नौ दो ग्यारह, जुगनू, मिली आदी चित्रपटांच्या संगीतावर आर. डी. बर्मनदांची छाप दिसून येते. नासिर हुसैन यांच्या तिसरी मंझिल सिनेमापासून पाश्चात्त्य संगीत, पार्श्वसंगीत आणि पंचम हे समीकरण चांगलेच गाजले.

**सुंदर मेलडी आणि ठेक्याची अफलातून समज ही आरडींची भारतीय संगीताला मिळालेली देणगीच होय! भारतीय रागदारी आणि लोकसंगीतात त्यांनी बांधलेल्या कित्येक मनोहारी सुरावटी रसिकांचे कान तृप्त करून टाकतात.**



विनोदी कलाकार मेहमूद यांच्या घरच्या प्रॉडक्शनच्या १९६१ साली प्रदर्शित झालेल्या 'छोटे नवाब' या चित्रपटाद्वारे आर. डी. बर्मन यांनी संगीत यात्रा सुरू केली होती. पुढे अभिजात भारतीय संगीत आणि वेस्टर्न म्युझिक यांचा अनोखा मिलाफ करून आरडींनी स्वतःची एक खास शैली विकसित केली. त्यांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे 'कुछ हटके करने की जरूरत हैं।' पंचमदांनीही कुछ हटके संगीत देत रसिकांना झपाटून टाकले.

सुंदर मेलडी आणि ठेक्याची अफलातून समज ही आरडींची भारतीय संगीताला मिळालेली देणगीच होय! भारतीय रागदारी आणि लोकसंगीतात त्यांनी बांधलेल्या कित्येक मनोहारी सुरावटी रसिकांचे कान तृप्त करून टाकतात. आरडींच्या पाश्चात्त्य संगीताने जसे प्रेक्षकांना वेड लावले, तसेच त्यांच्या भारतीय रागदारी, लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीतावर आधारित गाण्यांनी रसिकांच्या मनावर भुरळ घातली. अमर प्रेम, मंझिल, किनारा, परिचय, इजाजत आदी चित्रपटांमध्ये त्याची प्रचिती येते. 'बिती ना बितायी रैना'(परिचय) हे भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित गीत.



तर किशोरदांनी गायलेले 'ओ माँझी रे (खुशबू) हे बंगाली लोकसंगीत भटियालीवर आधारित गीत.

अगदी छोटे नवाब चित्रपटातील राग मालगुंजीवर आधारलेले घर आजा घिर आये बदरा सावरियां या पहिल्या रचनेपासून ते १९९४ मध्ये आलेल्या '१९४२ अ लव्हस्टोरी' सिनेमातील रवींद्र संगीतातील दिल ने कहा चुपके से पर्यंत पंचमदांनी भारतीय रागदारी जोपासली. या गीताचे वैशिष्ट्य असे, की कोमल गंधारने गीताची सुरुवात करत ७ मात्रांच्या रूपक तालात ते बांधले. पती पत्नी (१९६६) या चित्रपटातील कजरे बदरवा रे हे नायिका नंदावर चित्रित गीत राग भैरवीचा परिपाठ आहे. या दोन्ही गाण्यांत एक समानता होती, ती म्हणजे पाऊस. तिसरी मंझिल सिनेमानंतर राहूल देव बर्मनदा यांनी पाश्चात्त्य संगीताचा पुरस्कार केला असला, तरी अभिजात भारतीय संगीतात तयार केलेल्या त्यांच्या रचना हटकेच होत्या.

पंचमदांनी एकाच गीतात दोन किंवा तीन रागांचे अप्रतिम मिश्रण केलेले दिसते. जसे की मितवा बोले मीठे बोल यात रागेश्री व हेमंत रागांचे मिश्रण तर पिया बावरी (खूबसूरत) या गीतात खमाज रागासोबत बिहाग आहे. रैना बीती जाए शाम न आये हे तोडी व खमाज रागावर आधारित गीत होते. तर कमोद-मल्हार-वृंदावनी रागांच्या मिश्रणातून बनलेले गोरी तेरी पैंजनियाँ (मेहबूबा) हे गाणे उपशास्त्रीय आहे. ए री पवन (बेमिसाल) या गीतात पहाडी, यमन आणि खमाज ह्या तीन रागांचा सुंदर मिलाफ आहे.

> **पंचमदांनी एकाच गीतात दोन किंवा तीन रागांचे अप्रतिम मिश्रण केलेले दिसते. जसे की 'मितवा बोले मीठे बोल' यात रागेश्री व हेमंत रागांचे मिश्रण तर 'पिया बावरी' (खूबसूरत) या गीतात खमाज रागासोबत बिहाग आहे.**

पंचमदांचा सगळ्यात लाडका राग खमाज! या रागात त्यांनी अनेक गाणी संगीतबद्ध केलीत. दिग्दर्शक शक्ति सामंत यांच्या अमरप्रेम (१९७०) सिनेमातील 'रैना बीती जाए शाम न आये' या तोडी व खमाज रागावर आधारित गीतात पंचमदांनी तोडी थाटाचेही मिश्रण केले आहे. मुखड्यातील पहिली ओळ रैना बीती जाए शाम न आये आणि गाण्याच्या सुरुवातीचे संगीत व प्रत्येक कडव्यानंतर वाजणाऱ्या संगीतात तोडीचा प्रयोग आहे, तर 'नींदियाऽऽ ना आये' ही मुखड्याची दुसरी ओळ व सर्व अंतरे खमाज रागात रचले आहेत. याच चित्रपटातील कुछ तो लोग कहेंगे आणि बडा नटखट है रे किशन कन्हैया ही गाणी खमाज रागावरच बेतलेली आहेत. मांज- खमाज रागावरील बडी देर से मेघा बरसे (नमकीन) हे आणखीन एक गाणे.

खमाज रागावरील आयो कहा से घनश्याम हे बुड्ढा मिल गया (१९७१) सिनेमातील एक आशयगीत. सिनेमात जेव्हा जेव्हा खून होतो, तेव्हा तेव्हा पडद्यावर ओम प्रकाश हे गाणे गाताना दिसतो. खमाज रागावरीलच चोरी चोरी चुपके चुपके (आप की कसम- १९७४) हे नायिका मुमताजवर चित्रित गीत प्रचंड लोकप्रिय झाले होते. याच चित्रपटातील जिंदगी के सफर में गुजर जाते है जो मकाम हे किशोर कुमार यांनी गायलेले व बिहाग रागावर आधारित गीत प्रचंड

गाजले होते. चिंगारी कोई भडके हे ललित रागावर बेतले आहे.

गुलजार आणि राहूल देव बर्मन हा एक विलक्षण संयोग! या जोडीने वर्षानुवर्षे रसिकांना अनेक अर्थपूर्ण आणि भावपूर्ण उत्तमोत्तम गाणी दिली. परिचय सिनेमातील ‘सा रे के सा रे गा मा को लेकर’ ही संगीतातील मूलभूत ७ स्वरांची ओळख करून देणारी सरगम आहे. ‘आँधी’ चित्रपटातील राग यमन मध्ये बांधलेले इस मोड से जाते है आणि नंद रागाने सुरुवात करणारे तेरे बीना ज़िंदगी से कोई शिकवा ही गाणी पंचमदांवर पाश्चिमात्त्य संगीतकार असा आरोप करणाऱ्यांना सणसणीत चपराक आहे.

पुनर्जन्मावर आधारित दिग्दर्शक शक्ति सामंत यांच्या मेहबूबा (१९७६) सिनेमातील शिवरंजनी रागातील मेरे नैना सावन भादो आणि जमुना किनारे आजा हे मारू बिहाग रागावर बेतलेले गाणे.

**कवी गुलजार यांच्या ‘किनारा’ चित्रपटातही अब के न सावन बरसे, नाम गुम जायेगा, मीठे बोल बोले आणि जाने क्या सोचकर नहीं गुजरा ही सारी शास्त्रीय संगीतावर आधारित गाणी होती.**

शर्म आता है मगर (पडोसन– राग बिहाग) खाली हाथ शाम आयी थी (पिलू राग–इजाजत), हमे तुमसे प्यार कितना (राग भैरवी–कुदरत), रोज रोज डाली डाली क्या लिखता भँवरा (अंगूर– राग यमन कल्याण), ये क्या हुआ (अमरप्रेम), सावन के झूले पडे (राग पहाडी–जुर्माना), रिमझिम गिरे सावन (पिलू राग–मंझिल), रोज रोज आँखो तले (जीवा–राग किरवानी), जाने क्या बात हैं (राग पहाडी–सनी) ही आणि अशी कित्येक गाणी शास्त्रीय संगीताची जाण असलेल्या रसिकांसाठी मेजवानी आहे.




कवी गुलजार यांच्या ‘किनारा’ चित्रपटातही अब के न सावन बरसे, नाम गुम जायेगा, मीठे बोल बोले आणि जाने क्या सोचकर नहीं गुजरा ही सारी शास्त्रीय संगीतावर आधारित गाणी होती. त्याच्या व्यतिरिक्त ‘नमकीन’ चित्रपटातील उत्तर प्रदेश लोकसंगीतावर आधारित ऐसा लगा कोई सुरमा आणि पहाडी गाण्याच्या शैलीतील राह पे रहते हैं, मध्यपूर्वेतील लोकसंगीतावर आधारित रक्कासा मेरा नाम (द ग्रेट गॅम्बलर) ही काही गाण्यांची उदाहरणे आहेत. जवळपास २९१ चित्रपटांना संगीत देताना राहूल देव बर्मन यांनी पाश्चिमात्त्य संगीताबरोबरच अस्सल भारतीय रागांवरील उत्तमोत्तम सुरावटींमध्ये रसिक श्रोत्यांना मोहून टाकले.

भारतीय संगीत पटलावरील अशा या ‘जादुई पंचम’ अर्थात संगीतकार राहूल देव बर्मनदा यांना २७ जून या जन्मदिनानिमित्त विनम्र अभिवादन. ■

## १ ली NTPC Khelo India National Ranking Women Archery Tournament २०२४–२५ : महाराष्ट्र पोलीस दलाची उल्लेखनीय कामगिरी

# आर्चरी संघातील महिला खेळाडूस रौप्य पदक

एन टी पी सी खेलो इंडिया नॅशनल रॅंकिंग विमेन आर्चरी टूर्नामेंट ही ७ ते ११ एप्रिल २०२५ या काळात गुजरात येथे पार पडली. सदर स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस दलात मुंबई शहर येथे पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असणाऱ्या अनुराधा पाटील यांनी रौप्य पदक पटकावले आहे. पुढील वर्षी होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय तसेच वर्ल्ड कप स्पर्धेच्या निवड चाचणी करीता सर्व आंतरराष्ट्रीय तसेच वर्ल्ड कप स्पर्धेच्या निवड चाचणी करीता त्या पात्र ठरल्या आहेत.






दिनांक ०७ ते ११ एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये गुजरात येथे १ ली NTPC Khelo India National Women Archery Tournament 2024-25 संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील महिला आर्चरी संघातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला. त्यांना रौप्य पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

गुजरात येथे झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस दलातील महिला पोलीस अधिकारी महिला पोलीस उपनिरीक्षक अनुराधा पाटील, मुंबई शहर या खेळाडूंनी Seniour Recurve women 70 meter या क्रीडा प्रकारात रौप्य पदक प्राप्त केले आहे.

तसेच 3rd NTPC Khelo India National Women Archery Tournament २०२५ भोपाळ, मध्य प्रदेश येथे दि. ३० ते ०३ एप्रिल २०२५ रोजी दरम्यान आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत All India Police Sports Control Board, New Delhi या संघात स्थान मिळवून महिला पोलीस उपनिरीक्षक अनुराधा पाटील यांनी Seniour Recurve women मध्ये चतुर्थ स्थान प्राप्त करून अंतिम Top 16 Elimination Round साठी त्या पात्र ठरल्या आहेत.

त्याचप्रमाणे आगामी वर्षात होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय तसेच वर्ल्ड कप स्पर्धेच्या निवड चाचणी करीता 625 Quality Score प्राप्त करून या वर्षात होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय निवड चाचणी देण्यासाठी पात्र ठरलेल्या आहेत.

**राष्ट्रीय स्पर्धेत** All India Police Sports Control Board, New Delhi **या संघात स्थान मिळवून महिला पोलीस उपनिरीक्षक अनुराधा पाटील यांनी** Seniour Recurve women **मध्ये चतुर्थ स्थान प्राप्त करून अंतिम** Top 16 **एश्ळाळपरींळेप र्ठेपव साठी त्या पात्र ठरल्या आहेत. आगामी वर्षात होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय तसेच वर्ल्ड कप स्पर्धेच्या निवड चाचणी करीता ६२५** Quality Score **प्राप्त करून या वर्षात होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय निवड चाचणी देण्यासाठी पात्र ठरलेल्या आहेत.**

महाराष्ट्र पोलीस विमेन आर्चरी संघास श्रीमती. रश्मि शुक्ला, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. डॉ. मल्लीकार्जुन प्रसन्ना, अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन) म. रा. मुंबई, श्रीमती. डॉ. आरती सिंग, विशेष पोलीस महानिरीक्षक, (प्रशासन), म.रा., मुंबई, श्री. प्रविण शिखरे, पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक (नि.वे.) पोलीस महासंचालक, कार्यालय मुंबई, सहायक क्रीडा अधिकारी श्री. संतोष कांबळे, महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा संकुल घाटकोपर, मुंबई यांनी वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांच्यामधील उणिवा दूर करून खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहील असे वातावरण तयार केले. अशा केलेल्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव उज्ज्वल करून उल्लेखनिय कामगिरी करत आहेत. ■

## १ ली अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन क्लस्टर स्पर्धा २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाची उल्लेखनीय कामगिरी

# टेबल टेनिस संघास १ सुवर्ण व ४ कांस्य पदके



दिनांक ११ ते १५ एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये कोची, केरळ येथे १ ली अखिल भारतीय पोलीस बॅडमिंटन क्लस्टर स्पर्धा २०२४–२५ संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस बॅडमिंटन, टेबल टेनिस (पुरुष व महिला) संघाने सहभाग नोंदवला. खालील नमूद संघांना पुढीलप्रमाणे १ सुवर्ण पदक (मिश्र डबल) व ४ कांस्य पदके (मिश्र डबल/ओपन मिश्र डबल/सिंगल) आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रकारे पदक प्राप्त कामगिरी केलेल्या खेळाडूंच्या नावांची यादी.

## टेबल टेनिस स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | नेमणूक | प्रकार | कामगिरी |
|---|---|---|---|---|
| १ | संजय तुंगार, अपर पोलीस अधीक्षक | ला. प्र. वि. नांदेड | टेबल टेनिस (मिश्र डबल) | सुवर्ण पदक |
| २ | पोलीस उपनिरीक्षक शैलेश शिंदे | मुंबई शहर | टेबल टेनिस (४०+ डबल) | कांस्य पदक |
| ३ | पोलीस अंमलदार हर्षदीप खोब्रागडे | नागपूर शहर | | |
| ४ | पोलीस अंमलदार गौसखान पठाण | परभणी | टेबल टेनिस (ओपन मिश्र डबल) | कांस्य पदक |
| ५ | पोलीस अंमलदार सुषमा लोखंडे | नांदेड | | |
| ६ | पोलीस अंमलदार अभिनव वाघाडे | वाशिम | टेबल टेनिस (ओपन मिश्र डबल) | कांस्य पदक |
| ७ | पोलीस अंमलदार भाग्यश्री मेसरे | अकोला | | |
| ८ | पोलीस अंमलदार मिलिंद लोणे | नांदेड | टेबल टेनिस (५०+ सिंगल) | कांस्य पदक |

महाराष्ट्र पोलीस बॅडमिंटन क्लस्टर संघास श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, डॉ.श्री.मल्लीकार्जुन प्रसन्ना, अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन), म.रा., मुंबई, डॉ. श्रीमती आरती सिंग, विशेष पोलीस महानिरीक्षक, (प्रशासन), म.रा., मुंबई, श्री. प्रविण शिखरे, पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक (नि.वे.) पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई, सहा. क्रीडा अधिकारी श्री. संतोष कांबळे, महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा संकुल घाटकोपर, मुंबई यांनी वेळोवेळी प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांच्यामधील उणिवा दूर करून खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहील असे वातावरण तयार केले. अशा केलेल्या प्रयत्नांमुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडू राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव उज्ज्वल करून उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. ■

**त्यांच्यामधील उणिवा दूर करून खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहील असे वातावरण तयार केले. अशा केलेल्या प्रयत्नांमुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडू राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव उज्ज्वल होत आहे.**



रामकृष्ण अघोर
सोलापूर

# विद्यार्थ्यांनी समन्वय साधावा

आजकाल विद्यार्थी आणि त्यांचे पालक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करताना दिसतात. पण या स्पर्धेमागे धावताना आपल्या अंगी त्यासाठीचा आवश्यक गूण आहे का हे तपासले जात नाही. परिणामी गंभीर परिणामांना सामोरे जावे लागते. हा सगळा समतोल कसा साधायचा यावर भाष्य केले आहे.



आजच्या काळात शिक्षणाला फार महत्त्व आहे असे वारंवार सांगितले जाते. त्यामुळे आज शिक्षक व पालक मुलांना 'शिकत राहा' असे सांगत आहेत. मात्र जर आपण विद्यार्थ्यांकडे पाहिले तर आपल्याला असे आढळून येते, की विद्यार्थी शिक्षणाच्या बाबतीत उदासीन आहेत.

पंचवीस-तीस वर्षांपासूनचा काळ जर

विचारात घेतला, तर शिक्षणातला किती महत्त्व होते हे ध्यानात येते. एस. एस. सी. परीक्षेत सत्तर ते ऐंशी टक्के मार्क मिळाले, की त्या श्रेणीचे कौतुक व्हायचे. तसेच ग्रॅज्युएट परीक्षा द्वितीय श्रेणीत पास झाले की ऑनर्स म्हणून सर्वत्र कौतुक होत असे.

आज जसजसे प्राथमिक शिक्षण पूर्ण करून जेव्हा विद्यार्थी हायस्कूलमध्ये प्रवेश करतो, तसतसे त्यांना दहावीच्या नवीन एस. एस. सी. परीक्षेची एक प्रकारची भीती दाखविली जाते. त्या परिक्षेत ९५ टक्के मार्क्स मिळूनही मुले उदासीन आहेत. मुलांसाठी पालक तर शर्थीचे प्रयत्न करतात. त्यांच्यासाठी कर्ज काढून शाळा, शिकवण्या यांच्यावर खर्च करतात. त्यांची क्षमता, कल यांपेक्षा स्पर्धेचा विचार अधिक असतो. याचा विचार करता मुलांनी फक्त अभ्यासाकडेच लक्ष द्यावे यासाठी प्रयत्न केले जातात. पण यातून मार्ग काढायचा असेल, तर त्याला कोणत्या खेळाची आवड आहे? त्याला कोणत्या कलेची आवड





आहे? याचा विचार होणे आवश्यक आहे. आजकाल वाढत्या स्पर्धेमुळे

**प्राथमिक शिक्षण पूर्ण करून जेव्हा विद्यार्थी हायस्कूलमध्ये प्रवेश करतो, तसतसे त्यांना दहावीच्या नवीन एस. एस. सी. परीक्षेची एक प्रकारची भीती दाखविली जाते. त्या परिक्षेत ९५ टक्के मार्क्स मिळूनही मुले उदासीन आहेत. मुलांसाठी पालक तर शर्थीचे प्रयत्न करतात. पण यात त्यांची क्षमता, कल यांपेक्षा स्पर्धेचा विचार अधिक असतो.**

मुला-मुलींना मैदानी खेळ खेळण्यास वेळ मिळत नाही. किंबहुना त्यांनी मैदानी खेळ खेळावेत अशा प्रकारचे वातावरणदेखील तयार केले जात नाही. याविषयी एक छोटी कथा आहे. एका गावात एका शाळेमध्ये तीन मुली शिकत होत्या. अगदी पहिलीपासून त्या अभ्यासात बेताच्याच होत्या. वास्तविक पाहता त्या शाळेमध्ये विविध गुणदर्शन होत असे. म्हणजे चित्रकला, गाणी, नृत्य ह्या कलेमध्ये तर खेळामध्ये विटी-दांडू पासून ते क्रिकेटपर्यंत सर्व प्रकारच्या खेळांचा सराव मुलींकडून करून घेतला जात असे. मात्र ही संधी ती शाळा फक्त हुशार मुलींनाच उपलब्ध करून देत असे. तसेच त्या तीन मुली अतिसामान्य होत्या, म्हणून सतत त्यांच्याकडून अभ्यासच करून घेतला जात असे. शाळा सुटल्यावर देखील त्या तिन्ही मुलींची उजळणी करून घेतली जाई. असे असले, तरी त्या तिघींचेही लक्ष अभ्यासात लागत नव्हते. त्यांच्या लक्षातदेखील राहात नसे. यांचे काय करावे असा प्रश्न शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासमोर उभा राहिला.

एके दिवशी शिक्षणाधिकारी त्या शाळेत आले. त्यांनी शाळेची संपूर्ण तपासणी केली तेव्हा त्या तीन मुलींची प्रगती झाली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी त्यांच्या मानसिक अवस्थेबद्दल जाणून



घेतले. त्यांना शिक्षक व पालक यांच्या परवानगीने शहरात आणले. तेथे त्यांना खेळण्याची संधी दिली. तसेच नाच, गाणे, चित्रकला इत्यादी कलांच्या अविष्कारास त्यांना मुभा दिली. त्यांना असा अनुभव आला, की तिन्ही मुली मैदानी खेळ उत्तम खेळत असून प्रत्येकीच्या अंगात कुठली ना कुठली कला आहे. त्यातील एका मुलीला नृत्य करायला येत होते, दुसरीला तिचा आवाज चांगला असल्याने गाणे म्हणणे आवडत होते, तर तिसरीला चित्रकला उत्तम येत होती. तसेच त्या तिघी क्रिकेट, टेबल टनिस, व्हॉलीबॉल, फूटबॉल उत्तम रितीने खेळत होत्या. खेळाबरोबर त्यांचे अभ्यासात पाठांतर करून घेतले आणि खरोखरच त्या तिघींनी अभ्यासातील कौशल्य दाखवून दिले. शिक्षणाधिकाऱ्यांच्या लक्षात आले, की मुलींना अभ्यासाबरोबर कला, क्रीडा यांचीदेखील गरज आहे आणि तसे त्यांनी शाळेला कळवले. शाळेने तशी संधी देताच त्या तिन्ही मुली हुशार म्हणून गणल्या जाऊ लागल्या.

**शिक्षणाबरोबर मुलांना कला आणि क्रिडा यांची जोड दिल्यास शाळेतील अशा अनेक मुला-मुलींचे व्यक्तिमत्त्व खुलून येण्यास वाव मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. शिक्षणाचा जर विचार केला तर इयत्ता दहावीच्या गुणांवर मुले कोणत्या क्षेत्रात शिकायचे याचा निर्णय घेत असतात.**

थोडक्यात या सर्व गोष्टींचा विचार करता आज मुलांमध्ये अभ्यास, शिक्षण यांविषयी उदासीनता आली आहे. त्यांच्यात अभ्यासाच्या व्यतिरिक्त काहीतरी करून दाखविण्याची धडपड आहे. ज्याप्रमाणे आपल्या जेवणामध्ये फक्त पोळी व भात या व्यतिरिक्त काहीतरी असावे असे वाटत असते. भाजी, आमटी, चटणी, कोशिंबीर, पापड, लोणचे इत्यादी पदार्थ असतील तर जेवण रुचकर होते. जेवायला मजा येते, त्याप्रमाणे शिक्षणाबरोबर मुलांना कला आणि क्रिडा यांची जोड दिल्यास शाळेतील अशा अनेक मुला–मुलींचे व्यक्तिमत्त्व खुलून येण्यास वाव मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. शिक्षणाचा जर विचार केला तर इयत्ता दहावीच्या गुणांवर मुले कोणत्या क्षेत्रात शिकायचे याचा निर्णय घेत असतात. बहुतेक मुले ही डॉक्टर व इंजिनियर या क्षेत्रांचा विचार करतात. पण शिक्षण क्षेत्रावर किती ओझे लादायचे हे ज्याचे त्याने ठरवावे. यासाठी मुलांनी शिक्षणाबरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळामध्ये कौशल्य पणाला लावावे. आपल्याजवळ असणाऱ्या कलेचा विकास करून शिक्षण क्षेत्रावरील ओझे कमी करावे.

जागतिक ऑलिम्पिक स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी अनेकवेळा सुवर्ण पदक, कांस्यपदक इत्यादी पदके मिळवून देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. यावरून खेळाला किती महत्त्व आहे हे लक्षात यावे. साहजिकच विद्यार्थ्यांनी शिक्षणाविषयी निराश न होता त्याच्या जोडीला कला व क्रीडा यांचा समन्वय साधावा. यामुळे वैयक्तिक शिक्षण क्षेत्राची आणि देशाची प्रगती निश्चितच होईल. ■

कथा

# मैत्रि निर्मूलति मत्सरः




रघुनाथ मोहिते
मुंबई


ही कथा आहे जंगलातल्या पाच जिवलग मित्रांची. वाघ, कोल्हा, हरीण, माकड आणि पांढरा हत्ती असे पाच प्राणी एकमेकांचे जीवश्च कंठश्च मित्र होते. मात्र एका संकटाने त्यांच्यातल्या मैत्रीला ओहोटी लागेल अशी परिस्थिती निर्माण झाली. त्यांचे पुढे काय झाले? मैत्री कायम राहिली का? की जिवंत राहण्यासाठी त्यांना आपल्याच मैत्रीचा बळी द्यावा लागला?



अनेक गंमतीदार कल्पित कथा तुम्ही वाचल्या असतील. अशीच ही एक गंमतीदार, अद्‌भुत कल्पित कथा. ही कथा आहे 'वा.को.ह.मा.ह.'ची!

आता तुमच्या मनात नक्कीच शंका निर्माण झाली असेल, ती म्हणजे हे 'वा. को.ह.मा.ह' कोण? तर हे आहेत प्राणी. होय, जंगलातील प्राणी. वाघ, कोल्हा, हरीण, माकड आणि पांढरा हत्ती. आता जंगल म्हणजे तेथे इतर प्राणी–पशू–पक्षी हेही असणार. एकमेकांचे वैरी! भूक लागली की, शिकार करून स्वतःची भूक

शमविणारे प्राणी. पण हे पाच प्राणी होते ना, ते मात्र वेगळेच होते बरे का! आता तुमच्या मनात दुसरी शंका निर्माण झाली असेल. ती म्हणजे जंगलातल्या इतर प्राण्यांपेक्षा यांच्यात वेगळेपण होते ते कसले? तर हे प्राणी जरी हिंस्र असले तरी ते एकमेकांशी कधीच वैर करीत नव्हते. एकमेकांची त्यांनी कधीच हिंसा केली नव्हती. पाचही प्राणी अत्यंत जिवलग मित्र होते. आहे ना आश्चर्यचकीत करणारे वेगळेपण? तर अशाच या वाघ, कोल्हा, हरीण, माकड आणि हत्तीची ही कथा...

मुलांनो, तुम्ही दररोज शाळेत जाता. जाता ना ? मग त्या शाळेत इतरही मुले–मुली येतात ना? नक्कीच येत असतील. त्यापैकी जी मुले–मुली तुमच्या वर्गात बसतात त्यांची आणि तुमची मैत्री जमते ना? अगदी तशीच या पाच प्राण्यांची जिवलग मैत्री जमली होती. जंगलातील एका तलावाच्या काठावर हे पाचही प्राणी दररोज सकाळी पाणी पिण्यासाठी येत असत. त्यांची पाणी पिण्याची वेळ आणि तलावाच्या काठावरची जागाही ठरलेली. ठरलेल्या वेळेत ठरलेल्या जागेवर एकत्र जमायचे. तलावातले पाणी प्यायचे. पाणी पिताना अबोलपणे एकमेकांकडे नजरानजर, नजरमुबारक करायचे. पाणी पिऊन झाले की, त्यांच्या त्यांच्या दिनक्रमाला निघून जायचे.

वाघ, त्याचे सावज शोधायला. कोल्हा, पोटासाठी उपजीविका शोधायला. हरीण, अतिशय लुसलुशीत, टवटवीत कोवळे गवत शोधायला. हत्ती, त्याच्या आवडीचा चारा शोधायला, आणि माकड, झाडावरची ताजी फळे तोडून खायला. दिवसभर पोटपूजा झाली, की रात्री वाघ त्याच्या गुहेत झोपायचा. कोल्हा, एखाद्या कातळशिळेच्या आडोशाला झोपायचा. हरीण, त्यांच्या कळपात थांबायचे. आणि माकड दाट पाने



**पण त्या जंगलात एक तलाव होता. तलावाच्या तळाशी एक नैसर्गिक झरा होता. त्या झऱ्यातून सतत पाणी पाझरत असे. त्या झऱ्याच्या पाण्यावर जंगलातील प्राणी तहान भागवत असत.**

असलेल्या झाडाच्या फांदीवरच विसावा घ्यायचे.

दिवस उगवला, की पुन्हा नित्यनियमाने ते सारेजण पाणी पिण्यासाठी त्या ठरलेल्या तलावाच्या काठी जमायचे. त्यांच्या नित्याच्या दिनचर्येमुळे त्यांची जिवलग मैत्री जडली होती. मैत्री इतकी घट्ट होती, की पाणी पिताना ते अबोलपणे एकमेकांकडे नजरानजर, नजरमुबारक करायचे म्हणजे एकमेकांची ते हजेरीच लावीत असत. जर कुणी दिसला नाही, तर आलेले सर्वजण हजर न झालेल्याची वाट पहात असत. तो कुणी येईपर्यंत पाणी न पिता थांबत असत. तो आला, की सर्वजण पाणी पित आणि तेथून निघून जात असत

एके वर्षी, न भूतो असे अघटित घडले. अहो, त्या वर्षी त्या जंगलावर पाऊसच पडला नाही! आता तुम्हाला ठाऊकच असेल, की जेथे पाऊस नाही तेथे पाणी नाही. सजीव प्राणिमात्रांचे जीवन हे पाण्यावरच अवलंबून असते. पण त्या वर्षी पाऊसच पडला नाही! मग पाऊस न पडल्याने जंगलातील धबधबे, वाहाळ, नद्या–नाले कोरडे पडतीलच ना? होय, धबधबे, वाहाळ, नद्या–नाले कोरडेठाक पडले होते. पावसाळ्याचे दिवस संपले, हिवाळा संपला, उन्हाळा सुरू झाला. दुदैवाने पाण्याच्या अभावाने जंगलावर कोरडे दुर्भिक्ष कोसळले होते. पण त्या जंगलात एक तलाव होता. तलावाच्या तळाशी एक नैसर्गिक झरा होता. त्या झऱ्यातून सतत पाणी पाझरत असे. त्या झऱ्याच्या पाण्यावर जंगलातील प्राणी तहान भागवत असत. रात्रभर पाझरणाऱ्या झऱ्यामुळे तेथे पिण्या इतके पाणी साठत असे. जंगलातील इतर भूचर जनावरे पहाटे पहाटे तेथे जाऊन तलावातील पाणी जिभेने

पिऊन बिळात लपून राहात. पक्षी चोचीभर पाणी पिऊन भुर्रकन उडून जात असत. कडक उन्हामुळे झऱ्याचे पाणी आटत असे. तलावाचे डबके झाले होते. अखेर जंगलातील अनेक प्राणी ते जंगल सोडून इतरत्र गेले. 'वा.को.ह.मा.ह' मात्र जंगल सोडून गेले नाहीत, तर ते मैत्रीच्या ओढ्याने नित्यनियमाने दिवसा ठरलेल्या वेळी तलावाच्या काठावर भेटत असत आणि असेल तितके डबक्यातले पाणी पिऊन तहान शमवीत असत.

जंगलातील इतर प्राणी जंगल सोडून गेल्यामुळे वाघाची, कोल्ह्याची सावजाविना उपासमार होऊ लागली होती. लुसलुशीत, कोवळ्या, टवटवीत गवताऐवजी सुकलेले गवत खाण्याची वेळ हरणावर आली होती. झाडावर ताजी फळे नसल्याने माकडाचीही उपासमार होत होती. तीच गत हत्तीची! ही सारी झाडेझुडपे वाळलेली, तर त्याला आवडते खाद्य कुठून मिळणार? उपासमारीमुळे वाघाची डरकाळी शमली होती. कोल्ह्याची कोल्हेकुई शमली होती. हरणाची लटपट थांबली होती. माकडाचा भुभुःकार शमला होता. हत्तीचे चित्कारणे थांबले होते.

एके दिवशी ठरलेल्या वेळेवर ते सर्वजण तलावाकाठी जमले होते. पाहतात तो काय? रात्रभर जे काही पाणी त्या डबक्यात साचले होते ते इतर प्राणी पिऊन गेले होते. आता ओंजळभरही पाणी त्या डबक्यात शिल्लक नव्हते. जे काही पाणी होते त्याने जेमतेम एकाचीच तहान शमली असती. मग इतर मित्रांचे काय? सारे जण साचलेल्या पाण्याकडे एकटक पहात होते. मैत्री भावनेमुळे कुणाच्या मनात सुद्धा येत नव्हते, की आपण ते पाणी प्यावे. वाघ, कोल्हा, हरण, माकड त्या डबऱ्याच्या भोवती संभ्रमावस्थेत उभे होते. पांढरा हत्तीही तेथे आला होता. पण तो मात्र दुरूनच हे सारे न्याहाळत होता. तहानेने सारेच व्याकूळ झालेले होते.



**वाघाचा क्रूरपणा आणि कोल्ह्याचा लबाडपणा तुम्ही ऐकून असालच. त्यांच्या स्वभावातील वैरभाव, हिंस्रपणा उफाळून आला होता. वाघ आव आणून गुरगुरायला लागला होता. लबाड कोल्हा वाघाला साथ देऊ लागला होता.**

वाघ : ''मित्रांनो, मी तीन दिवस उपाशी आहे. माझ्या पोटात आगेचा भडका उठतो आहे. मी पिऊ का हे थोडं पाणी?''

कोल्हा : ''अरे, मी तर वणवण भटकतोय, कुणीच दिसत नाही? खूप तहान लागली आहे. मी पिऊ का हे थोडं पाणी?''

हरीण : ''मी तर पळून पळून दमले आहे. वाळलेले गवत खाऊन भूक शमत नाही. मी पिऊ का हे थोडं पाणी?''

माकड : ''अरे, या झाडावरून त्या झाडावर उड्डाण करून करून माझ्या पायाचे तुकडे पडलेत. झाडावर एकही फळ सापडत नाही. मी पिऊ का हे थोडं पाणी?''

अवसान गळून गेल्याने बिचारे 'मला, मला,' करत एकमेकांशी वादविवाद करू लागले होते. हत्ती तसा शांत, बुद्धिमान. सर्वांची दयनीय परिस्थिती पाहून त्याच्या डोळ्यांत पाणी दाटून आले होते. इवल्या डोळ्यांनी तो ते सारे पाहत होता. सुपाएवढ्या कानाने साऱ्यांचे बोलणे ऐकत होता. लांब सोंड करून तो सर्वांना, 'शांत राहा. धीर धरा,' असा इशारा करत होता. पण प्राण कंठाशी आल्याने कोण बरे धैर्याने सहनशीलता पाळणार? सारेजण धीर सोडून पाणी पिण्यासाठी पुढे पुढे सरसावले.

वाघाचा क्रूरपणा आणि कोल्ह्याचा लबाडपणा तुम्ही ऐकून असालच. त्यांच्या स्वभावातील वैरभाव, हिंस्रपणा उफाळून आला होता. वाघ आव आणून गुरगुरायला लागला होता. लबाड कोल्हा वाघाला साथ देऊ लागला होता. बिचारे

हरीण आणि माकड मात्र गुपचूप. कारण ते जाणून होते की जर ते पुढे सरसावले तर उपाशी असलेला वाघ आणि कोल्हा आयते सावज म्हणून त्यांचे लचके तोडल्याशिवाय राहणार नव्हते. तरीही जीव मुठीत घेऊन पाण्यासाठी ते धक्काबुक्की करीत होते. वाघ आणि कोल्हा त्यांना त्या डबक्याजवळ पोहोचू देत नव्हते. आपली फसगत होते आहे हे त्यांनी ओळखले. पण करणार काय! बळी तो कान पिळी.

वाघाचा आणि कोल्ह्याचा आततायीपणा पाहून पांढरा हत्ती जोराने चित्कारला. त्याबरोबर हरीण आणि माकडाच्या जिवात जीव आला. ते मदतीसाठी पांढऱ्या हत्तीच्या जवळ धावले. मैत्रीच्या भावनेने वाघ आणि कोल्हाही हत्तीच्या जवळ गेले होते.

पांढरा हत्ती : ''अरे मित्रांनो, प्रतीक्षा प्रवर्तति लाभः। मैत्रि निर्मूलति मत्सरः। असे भांडता कशाला? थोडी प्रतीक्षा कराल तर त्या झऱ्याचे पाणी साचणारच आहे. झरा हे निसर्गाचं वरदान आहे. तुम्ही असे भांडून एकमेकातला मत्सर का जागा करता? आपण मित्र आहोत ना? मग आपली मैत्रीच आपल्यातील मत्सराचं निर्मूलन करील. पण थोडा वेळ थांबा. आपल्याला सर्वांनाच पाणी प्यायला मिळेल. थोडा धीर ठेवा.''

वाघ : ''अहो गजराज, किती दिवस झाले जंगलात पाणीच नाही. पाणी नसल्याने अनेक प्राण्यांनी जंगल सोडलं आहे. मग सावजाशिवाय आम्ही या जंगलात जगायचं तरी कसं?''

कोल्हा : ''वाघोबा सत्य सांगताहेत. धीर धरा... धीर धरा... पण कधीपर्यंत? अशीच उपासमार करायची?''

हरीण : ''गजराज, तुम्ही बुद्धिवंत



**बुद्धिमान असलेल्या पांढऱ्या हत्तीच्या मनोगताप्रमाणे सर्व मित्र एकत्र जमले आणि पाऊस लवकर पडावा म्हणून त्यांनी वरुणराजाला विनंती केली. वरुण राजाने त्या पाचही प्राणी मित्रांचे ऐकले आणि कोण आश्चर्य!**

आहात. तुम्ही सांगता म्हणून धीर धरू. पाणी प्यायला मिळेलही. पण जंगलातल्या प्राण्यांच्या भविष्याचं काय?''

माकड : ''होय, होय. हरणाबाई योग्य बोलताहेत. पाणी असेल तरच जंगल वसेल. जंगल वसलं तरच आपल्यासारख्या प्राण्यांना जीवन जगता येईल. गजराजजी, काही तरी उपाय करा हो.

पांढरा हत्ती : ''तुम्ही प्राणी असूनही सहिष्णू आहात. इतर प्राणिमात्रांच्या जीवनाचाही तुम्ही विचार करता आहात. आपण जंगलातले प्राणी असलो म्हणून काय झालं? आपण सजीव आहोत ना? चला, पाऊस पडावा म्हणून आपण सारेजण वरुणराजाला विनवणी करूया...''

मुलांनो, बुद्धिमान असलेल्या पांढऱ्या हत्तीच्या मनोगताप्रमाणे सर्व मित्र एकत्र जमले आणि पाऊस लवकर पडावा म्हणून त्यांनी वरुणराजाला विनंती केली. वरुण राजाने त्या पाचही प्राणी मित्रांचे ऐकले आणि कोण आश्चर्य! अहो, आकाशात ढग जमा झाले. संपूर्ण जंगलात सर सर पाऊस बरसला. जंगलाला संजीवनी प्राप्त झाली. नद्यानाले पाण्याने दुथडी भरून वाहू लागले. तलाव भरून ओसंडून वाहू लागले. झाडाझुडपांनी कात टाकली. जंगल सोडून गेलेले सर्व प्राणिमात्र पुन्हा जंगलात परतले आणि सर्वजण मैत्री भावनेने वागू लागले. आहे ना अद्‌भुत गोष्ट?

***मैत्रि निर्मूलति मत्सरः।***

***प्रतीक्षा प्रवर्तति लाभः।।***

लेख



प्रवीण कारखानीस

## माणसाने बदनाम केलेला प्राणी:

# गाढव



माणसाने एखादे विशेषण दिले की ती त्या व्यक्तीची वा प्राण्याची ओळख बनते. अमुक एक प्राणी हुशार किंवा अमुक एखादी व्यक्ती बिंडोक म्हणजे लावलेले हुशार किंवा बिंडोक ही बिरुदावली हीच त्या व्यक्ती वा प्राण्याची ओळख बनते अशा वेळी त्यातल्या चांगल्या गुणांकडे कानाडोळा केला जातो. गाढव या प्राण्याच्या बाबतही असेच काहीसे आहे. गाढव या प्राण्याचे ओझी वाहण्या व्यतिरिक्तही अनेक उपयोग होऊ शकतात. ते कोणते याची माहिती सदर लेखात दिली आहे.

गाढव म्हणजे उकिरडा फुंकत फिरणारा आणि प्रसंगी लाथा झाडणारा लंबकर्ण प्राणी अशी या चतुष्पाद प्राण्याची नाहक बदनामी केलीय ती माणसांनीच. निव्वळ निर्बुद्धपणाचे प्रतीक म्हणून बिचाऱ्या गाढवाकडेच बोट दाखवले जाते. शेक्सपियरच्या 'मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकातल्या क्रुएल्टी, दाय नेम इज शायलॉक' म्हणजे 'निर्दयपणा, तुझे नाव शायलॉक!' वाक्याच्या धर्तीवर 'स्ट्युपिडिटी, दाय नेम इज डाँकी' असेही कुणी म्हणू शकेल. इसापनीतीत जंगली गाढवासाठी 'ॲस' असा वेगळा शब्द वापरला गेला असला तरी मूर्खपणा हाच त्या प्राण्याचा स्वभावधर्म असल्याचे दाखवले आहे. आपल्याकडे संस्कृत भाषेतही

गाढवाचा उपहास करणारी, त्याला कमी लेखणारी अनेक वचने आहेत. ‘उष्ट्राणाम् च गृहे लग्नम्, गर्दभाः शान्तिपाठकाः, परस्परान् प्रशंसन्ति, अहोरूपम् अहो ध्वनिः’ अर्थात, उंटाच्या लग्नात पौरोहित्य करायचा मान गाढवाला मिळाला, तर गाढव उंटाच्या रूपाची आणि त्याबदल्यात उंट गाढवाच्या आवाजाची स्तुती का नाही करणार? येनकेन प्रकारेण प्रसिद्धी मिळवण्यासाठी एखादी व्यक्ती रासभरोहण करायला म्हणजे गाढवावर स्वार व्हायला देखील मागेपुढे पाहत नाही. अशाही अर्थाचे वचन तुम्हाला आठवत असेलच. एखाद्याची निंदा नालस्ती करायला लोक त्याची गाढवावरून धिंड काढतात, हेदेखील गाढव या प्राण्याला आपण किती नीच लेखतो याचेच निदर्शक नाही काय? आपल्या पंचांगकर्त्यांनी देखील पृथ्वीच्या सूर्याभोवतीच्या भ्रमण मार्गात जे कुठले नक्षत्र गाढव हे वाहन घेऊन येते, त्या वर्षी पाऊस कमी पडणार असल्याचे दुश्चिन्ह असते, असेच तर म्हटले आहे! गाढव हे दिवसभर राखेत लोळले तरी ते कुणी भस्मचर्चित ऋषीमुनी होत नाही, या अर्थाचा तुकोबारायांच्या अभंगाचा चरण आहे. ‘राम राम न म्हणे त्याचा गाढव माता – पिता’ असेही त्यांनी एका अभंगात म्हटले आहे. कुणी एखादा ब्रह्मचर्य पालन करणारा महाभाग, कधीकाळी कामातुर होऊन एखाद्या गाढवीशी समागम करायला निघाला, तर तो त्या गाढवीच्या लाथा खाऊन आणि आपले ब्रह्मचर्य गमावून कसा बदनाम होतो याचा दृष्टांत देत तुकोबाराय म्हणतात, ‘एक ब्रह्मचारी गाढवो झोम्बतां, हाणोनिया लातो पळाले ते। गाढवही गेले, ब्रह्मचर्य गेले, तोंड काळे झाले, जगामाजी...’ आणि याची अनेक उदाहरणे सहज शोधता येतील. मराठी भाषेत ‘गाढवाला गुळाची चव काय?’ हा वाक्प्रचार रुढ करून आपल्या पूर्वजांनी गाढवाला केवळ मूर्खच नव्हे तर अरसिक देखील ठरवून टाकले आहे. चंदनाची लाकडे वाहणाऱ्या गाढवाला आपण किती मौल्यवान वस्तूचा भार आपल्या पाठीवरुन वाहून नेतोय तेही कळत नाही इतके ते मूर्ख असते. तसेच शास्त्रवचने पाठ असलेले परंतु शास्त्राचा अर्थ न जाणणारे पढतमूर्ख अर्थात गाढव असतात, या आशयाचे सुभाषित वाचल्याचे मला स्मरते! ‘गाढवापुढे वाचली गीता आणि कालचा गोंधळ बरा होता’ किंवा ‘गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ’ अथवा ‘अडला हरी गाढवाचे पाय धरी’ हे वाक्प्रचार तर सुपरिचित आहेत. गाडीला गाढव जुंपून, गाढवासमोर गाजर लावलेली काठी बांधताच ते गाढव गाजर खाण्याच्या उद्देश्याने पुढे पुढे जात राहते आणि गाडी पुढे पुढे खेचली जाते, ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहेच. ‘गाजर दाखवणे’ हा वाक्प्रचार त्यातूनच तर रूढ झाला. एखाद्या व्यक्तीकडून आपले काम साध्य करून घ्यायचे असेल तर ती व्यक्ती मूर्ख आहे हे माहीत असूनही त्या व्यक्तीची तारीफ करणाऱ्याला हिंदी भाषेत, ‘मतलब के लिये गधे को भी बाप बनानेवाला’ असे म्हणतात. ‘वक्त आया बाँका तो गधे को कहो काका’ अशीही एक म्हण प्रचलित आहे. ‘खेत खा गया गधा और मारा गया कुम्हार’ किंवा ‘गधे को खिलाया तो उस में क्या पाप और क्या पुण्य?’ अथवा ‘गिरे गधेपर से और गुस्सा निकाल रहे’ अशी वाक्ये हिंदीत प्रायः वापरली जातात. एखाद्या रूपवान मुलाचे एखाद्या कुरूप मुलीवर प्रेम जडले तर त्याचे समर्थन करणारा त्या मुलीची बरोबरी गाढवीच्या रंगरूपाशी करून जेव्हा म्हणतो, ‘दिल लगा गधी से, तो परी क्या चीज है?’ तेव्हा तो गाढवी ही कुरूपच असते, असेच गृहीत धरत असतो. एकंदरीत, गाढव या लंबकर्ण प्राण्याला आजवर माणसाकडून नेहमीच तुच्छतेची वागणूक दिली गेली आहे. गाढव म्हणजे आपल्या भक्कम पाठीवरून बिनतक्रार ओझे वाहणारा प्राणी, द बीस्ट ऑफ बर्डन अशीच त्याची जगभर ओळख आहे ! आपण जेव्हा एखादा अडाणी, अक्कलशून्य माणूस ढ आहे असे म्हणतो, तेव्हा तो गाढव आहे असेच तर आपल्याला सुचवायचे असते. आयुष्याच्या ज्या

**एकंदरीत, गाढव या लंबकर्ण प्राण्याला आजवर माणसाकडून नेहमीच तुच्छतेची वागणूक दिली गेली आहे. गाढव म्हणजे आपल्या भक्कम पाठीवरून बिनतक्रार ओझे वाहणारा प्राणी, द बीस्ट ऑफ बर्डन अशीच त्याची जगभर ओळख आहे !**

काळात अनेकांच्या हातून कळत नकळत मूर्खपणाच्या गोष्टी घडत असतात, त्या काळाला गद्धे पंचविशी म्हटले जाते. इफ् ए डॉन्की ब्रेज अ‍ॅट यू, डोन्ट ब्रे अ‍ॅट हिम् अर्थात गाढव तुमच्याकडे पाहत ओरडले म्हणून तुम्ही त्या ओरडण्याची नक्कल करत त्या गाढवावर ओरडू नका, ते व्यर्थ आहे असा सल्ला देणारे इंग्रजी वचन सुपरिचित आहेच. इव्हन इफ् द डॉन्की ईटस् द मेलन, इट रिमेन्स ए डॉन्की अशीही एक म्हण आहे म्हणजे गाढव भले कलिंगड खाऊ लागले तरी त्यामुळे त्याचा गाढवपणा तिळमात्र कमी होत नाही, हेच यातून सूचित केले जाते!

अलीकडेच चीनमधल्या शास्त्रज्ञांनी गाढव या प्राण्याच्या कातडीखाली असलेल्या काही सूक्ष्म पेशींवर संशोधन करून त्यांच्यापासून एक अशा प्रकारचे औषध बनवले आहे, जे रक्तातली घटकद्रव्ये संतुलित ठेवते आणि झोप गाढ लागायला मदत करते, तसेच शरीरातली मरगळ दूर करते इतकेच नव्हे तर कर्करोग होण्याची शक्यता बव्हंशी कमी करते असा त्यांचा दावा आहे. त्या औषधाचे इंग्रजी नाव 'एजिआओ' आहे. रक्तवर्धक टॉनिक्स, औषधी पेये मद्यार्क, निवडक सौन्दर्यप्रसाधने, चेहरा तजेल करणारी मलमे यांमध्येही त्याचा कमीअधिक प्रमाणात वापर होतो. त्यामुळेच की काय, आज अनेक देशांमधून चीनमध्ये मोठ्या प्रमाणात गाढवे निर्यात केली जात आहेत. अशा बाबतीत पाकिस्तान आघाडीवर नसेल तरच नवल!

केवळ चीनमध्ये गाढवे निर्यात करण्याच्या उद्देश्याने पाकिस्तानने गाढवांची पैदास करून त्यांचे भरणपोषण करण्यासाठी मोठमोठे प्रकल्प सुरू केले आहेत.

पाकिस्तानात आजवर कराची शहरात गाढव गाडीवरून फळे आणि भाज्या विकणारे पाहायला मिळत होते. गाढव निर्यातीच्या धोरणामुळे अशा फेरीवाल्यांची संख्या यापुढे कमी होत जाईल. पाकिस्तानातल्या सिंध प्रांतात अनेक ठिकाणी गाढव

> **चीनमधल्या शास्त्रज्ञांनी गाढव या प्राण्याच्या कातडीखाली असलेल्या काही सूक्ष्म पेशींवर संशोधन करून त्यांच्यापासून एक अशा प्रकारचे औषध बनवले आहे, जे रक्तातली घटकद्रव्ये संतुलित ठेवते आणि झोप गाढ लागायला मदत करते.**

गाड्यांच्या शर्यती पाहण्यासाठी लोकांची झुंबड उडत असे. त्याही लवकरच इतिहासजमा झाल्यास नवल वाटायला नको. गाढविणीचे वाटीभर दूध सलग तीन दिवस सकाळी प्राशन केले तर डांग्या खोकला निघून जातो, असे आपल्याकडे अनेकजण सांगत असतात. गाढवी आणि घोडा यांच्या समागमातून जन्मलेला प्राणी म्हणजे खेचर. डोंगराळ भागात सामान वाहून न्यायला अन्य कुठल्याही प्राण्यांपेक्षा खेचरे उपयोगी असल्याने त्यांचा वापर लष्कर आणि गिर्यारोहक हे नेहमीच करत असतात. त्यांच्यासाठी तो अतिशय उपयुक्त पशू आहे.

आज उपलब्ध असलेल्या गर्दभगणनेनुसार आफ्रिका खंडातल्या इथिओपिया या सर्वाधिक गरीब देशात गाढवांची संख्या सर्वाधिक म्हणजे ७४ लाख आहे. चीन दुसऱ्या क्रमांकावर असून चीनमध्ये ६० लाख गाढवे आहेत. त्या पाठोपाठ पाकिस्तान असून तिथे ५० लाख गाढवे आहेत तर मेक्सिकोमध्ये ३२ लाख, इराणमध्ये १६ लाख आणि अफगाणिस्तानात १४ लाख गाढवे आहेत. क्षेत्रफळाच्या दृष्टीने आपल्या एखाद्या जिल्ह्याच्या आकाराचा असलेल्या बुर्किना फासो या उत्तरपश्चिमी आफ्रिकी देशात देखील तब्बल ११ लाख गाढवे आहेत. याउलट, १४० कोटी जनसंख्या असलेल्या खंडप्राय भारतात मात्र गाढवांची संख्या अवघी ३ लाख इतकी नगण्य असल्याचे स्पष्ट झाले आणि ही संख्या दिवसेंदिवस घटतच चालली आहे ही नक्कीच चिंतेची बाब आहे. अद्यापही आपल्याकडच्या कित्येक गरीब आणि कष्टाळू लोकांचा उदरनिर्वाह याच मेहनती प्राण्यांवर पिढ्यान् पिढ्या अवलंबून आहे. कुणी या गाढवांच्या पाठीवर वजनदार दगडांपासून बनवलेली जाती आणि पाटे वरवंटे लादून तर कुणी वेताच्या मोठमोठ्या टोपल्यांचे डोंगर रचून विक्रीसाठी गावोगावी फिरत असतात अथवा कुणी रेती, विटा, वाळू, माती यांची ने–आण करण्यासाठी गाढवांचा उपयोग करून घेत असतात. महाराष्ट्रात

पुणे जिल्ह्यातील जेजुरी आणि जुन्नर, नांदेड जिल्ह्यातील माळेगाव, अहमदनगर जिल्ह्यातील मढी–पाथर्डी या आणि अशा काही गावांमध्ये प्रतिवर्षी गाढवांचा मोठा बाजार भरत असतो.

गाढव हा प्राणी दीर्घायुषी आहे. घोडा सर्वसाधारणपणे वीस पंचवीस वर्षे जगतो तर गाढव पन्नास वर्षे तरी जगते. उभ्या आयुष्यात मेलेले गाढव पाहिल्याचे मला आठवत नाही असे जॉर्ज ऑरवेल याने लिहून ठेवले. इंग्रजी भाषेत कर्तृत्त्वशून्य व्यक्तीने आयुष्याची वाया घालवलेली वर्षे ही 'डाँकी इयर्स' मानली जातात.

इंग्लंडमध्ये गाढवे फारशी नाहीत. त्यामुळे एखाद्या जत्रेत गाढव असले तर ते पाहायला लहान थोर सगळेच गर्दी करतात. इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्याजवळच्या आईल ऑफ वाईट (Isle of wight) या इवल्याशा बेटावर डाँकीज सँच्युरी आहे. ज्या गाढवांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्या मालकांनी झटकून टाकल्याने ती निराश्रित झालेली असतात, अशा गाढवांचे अन्नपाण्याशिवाय हाल होऊ नयेत म्हणून त्यांना आश्रय देऊन त्यांचे जीवन सुसह्य करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम इथे सुरू असतो. इंग्लंडमध्ये डेव्होनजवळ सिडमथ या गावी डॉ.एलिझाबेथस्वेंडसनयामहिलेनेअशा उपक्रमाची रुजवात १९६९ सालीच केली होती. त्या ठिकाणी जखमी, आजारी, मरणासन्न गाढवे आणून ती त्या गाढवांवर औषधोपचार करत असे. तिच्या या उपक्रमाला इथल्या प्राणिप्रिय इंग्रजांनी चांगला प्रतिसाद दिला. आज ती हयात नसली तरी तिच्यापासून प्रेरणा घेऊन अनेकांनी असा उपक्रम बर्मिंगहॅम, मॅन्चेस्टर, डर्बीशायर या ठिकाणी सुरू ठेवला आहे. अनेकांना आठवत असेल, की काही वर्षांपूर्वी पश्चिम महाराष्ट्रात पर्जन्यवृष्टीमुळे आलेल्या पुरात वाहून जाऊन मरणासन्न झालेल्या गाढवांचे प्राण वाचविण्यासाठी स्थानिक जनतेच्या बरोबरीने इंग्लंडमधल्या अशा संस्थांचे काही कार्यकर्ते प्रयत्नांची शर्थ करत होते.

> **गाढव हा प्राणी दीर्घायुषी आहे. घोडा सर्वसाधारणपणे वीस पंचवीस वर्षे जगतो तर गाढव पन्नास वर्षे तरी जगते. उभ्या आयुष्यात मेलेले गाढव पाहिल्याचे मला आठवत नाही असे जॉर्ज ऑरवेल याने लिहून ठेवले**

त्यावेळी शंभराहून अधिक गाढवांचे प्राण वाचवण्यात त्यांना यशही आले होते! संतशिरोमणी एकनाथ महाराज यांच्या एका शिष्याने मेलेल्या गाढवाच्या शरीरात प्राण फुंकून त्याला जिवंत केल्याची कथा अनेकांना ठाऊक असेल. त्यामुळे मृत्यूच्या उंबरठ्यावर असलेल्या गाढवांवर औषधोपचार करून त्यांना नवजीवन देणारी ही मंडळीदेखील खऱ्या अर्थाने संतप्रवृत्तीचीच म्हणायला हवीत. सर्वस्वी उपेक्षितांचे जिणे जगणाऱ्या या बदनाम गाढवप्राण्यांची एवढी सेवा करणाऱ्या अशा लोकांना सलामच करायला हवा!

गाढवाला राष्ट्रीय प्राण्यासम दर्जा आणि सन्मान देणारे एक इवलेसे बेट इंग्लिश खाडीत आहे. या बेटाला त्याच्या सर्व अंतर्गत व्यवहारांसाठी संपूर्ण स्वायत्तता असली, तरी संरक्षण आणि परराष्ट्र व्यवहार या बाबतीत ते इंग्लंडच्या आधिपत्याखाली आहे. गेर्नसे असे या बेटाचे नाव आहे. इंग्लंडपासून दूर मात्र फ्रान्सच्या किनाऱ्यापासून ते जवळ आहे. फ्रेंच राज्यक्रांतीचा एक जनक व्हिक्टर ह्युगो हा एकेकाळी विजनवासात असताना याच बेटावर राहत होता. इंग्लिश आणि फ्रेंच बोलणारे लोक या बेटावर गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात. या बेटावर 'सेंट पीटर पोर्ट' या त्याच्या राजधानीच्या शहरात अगदी भर बाजारातल्या चौकात चक्क गाढवाचा पुतळा उभारण्यात आलेला आहे.

एकंदरीत, गाढव या प्राण्यांना विनाकारण बेअक्कल प्राणी ठरवून त्यांची हेटाळणी करणारे लोक या जगात असंख्य असले तरी गाढवांची कदर करणारे, त्यांची काळजी घेणारे आणि त्यांना सन्मानाचे जीवन जगण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी धडपडणारे थोडेफार लोकही याच जगात आहेत, हेही नसे थोडके. ■



गजानन मोरे
सहा. पोलीस निरीक्षक
हट्टा पोलीस ठाणे,
हिंगोली

# तिचा काय गुन्हा

**कोणतीही चूक न करता शिक्षा सोसणारी माणसे म्हणजे गतिमंद, मतिमंद वर्गात मोडणाऱ्या व्यक्ती. दुर्दैवाने आजही या वर्गाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन दूषितच आहे. त्यामुळे अनेकदा या व्यक्तींच्या बाबतीत घडणाऱ्या अपराधाविरुद्ध दाद मागितली जात नाही. जनीच्या बाबतीतही असेच काहीसे घडले होते. तिचा असा काय गुन्हा होता, ज्यामुळे तिच्यावर झालेल्या अन्यायाची तक्रार करण्याचा जन्मसिद्ध अधिकार हिरावून घेतला गेला होता?**



ऑक्टोबर महिना असूनही बाहेर आकाशात मळभ दाटून आले होते. साल होते २०२१. कोरोना साथीची महाभयानक अशी दुसरी लाट ओसरून काहीशी थंडावली होती. माणसांचे भय मात्र अजूनही म्हणावे तितके कमी झाले नव्हते. त्या लाटेने दिलेला तडाखाच इतका जबरदस्त होता की ही गोष्ट साहजिकही होती. पण त्यातूनही बाहेर पडून हळूहळू गावातले व्यवहार मार्गी लागायला सुरुवात झालेली होती. हे एका परीने चांगलेच चिन्ह होते.



**आकाश सरोदे**
पोलीस उपनिरीक्षक
हट्टा पोलीस ठाणे,
हिंगोली



**इम्रान कादरी**
पोलीस अंमलदार
हट्टा पोलीस ठाणे,
हिंगोली



**सुरेखा बेले**
महिला पोलीस
अंमलदार
हट्टा पोलीस ठाणे,
हिंगोली



**शेषराव लाखाडे**
पोलीस अंमलदार
हट्टा पोलीस ठाणे,
हिंगोली

हिंगोली जिल्ह्यातील हट्टा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणारे ते लहानसे गाव होते. खरेतर वाडीच. पन्नासएक उंबऱ्यांची. गावात बहुतेकांची घरे भावकीतलीच. अगदी कधी घरातले मीठमिरची संपले असेल तर हक्काने शेजारी जाऊन आणणारी.

अठ्ठावीस वर्षांची जनी याच वाडीत राहात असे. डोक्याने जरा अधू असलेली ही पोर म्हणजे आईबापाच्या जिवाला घोर होता. अर्थात त्यांच्या दृष्टीने ती पोर असली तरी वय आणि अंगकाठी तिचे तारुण्यच दाखवत असे. मध्यम बांध्याची आणि दिसायला गोरीगोमटी. तिच्या गालांची हाडे वर आलेली होती, त्यातून चेहऱ्याला एक प्रकारची मोहक गोलाई प्राप्त झाली होती. क्वचित केसांची एखादी चुकार बट तिच्या कपाळावर येऊन जाई. अशावेळी ती अजूनच आकर्षक दिसत असे. देवाने तिला बुद्धी देताना कंजूषपणा केला असला तरी तिच्या पदरी रूपाचे दान मात्र व्यवस्थित दिले होते.

जनीचे घर चांगले खातेपिते होते. त्यामुळे ती काही न करता नुसती बसून राहिली तरी घरच्यांचे



**रात्री साडेआठची वेळ होती. जनी तिच्या खोलीत एकटीच बसली होती. तिचा हा रोजचा कार्यक्रम होता. वहिनीने जेवायला बोलवेपर्यंत ती अशीच थांबून राहात असे. तेवढ्यात खोलीच्या मागच्या दाराच्या बाजूने काहीतरी करकरल्यासारखा आवाज आला.**

फार बिघडत नसे. नसते एखाद्याकडे कसली हुनर, पण पोट तर असतेच ना सगळ्यांना! भरल्या गाडीला चिपाडाचे ओझे होत नाही तसे खाणाऱ्या दहा तोंडात तिचे अजून एक तोंड. तिने खावे, प्यावे अन ओसरीत किंवा पडवीत नाहीतर तिच्या खोलीत निवांत बसून राहावे. वेळ पडल्यास आणि जमत असल्यास घरातलेच एखादे सोपेसे काम करावे आणि दोन घास खाऊन शांतपणे आयुष्य व्यतीत करावे अशीच घरच्यांची धारणा होती. त्यात काही अडचण नव्हती.

पण सरळ वाहणारी नदीपण कधीतरी मार्ग बदलतेच, तसेच जनीच्या आयुष्यात झाले. त्या दिवशी आपले आयुष्य असे काही वळण घेईल याची तिला काडीइतकीही कल्पना नव्हती.

रात्री साडेआठची वेळ होती. जनी तिच्या खोलीत एकटीच बसली होती. तिचा हा रोजचा कार्यक्रम होता. वहिनीने जेवायला बोलवेपर्यंत ती अशीच थांबून राहात असे. तेवढ्यात खोलीच्या मागच्या दाराच्या बाजूने काहीतरी करकरल्यासारखा आवाज आला. बाहेर नीरव शांतता होती. त्या पार्श्वभूमीवर हा आवाज आणि त्यापाठोपाठ कुणीतरी जोरजोरात श्वास घेत असल्याचा आवाज.

दार उघडले गेल्याने बाहेरच्या गार हवेची झुळूक आत आली. त्यापाठोपाठ त्या आत आलेल्या

व्यक्तीची चाहूल. तो जो कुणी होता त्याला धाप लागली असावी. त्याच्या श्वासोच्छवासाचा आवाज जनीला स्पष्ट ऐकू येत होता. ती घाबरली. भीतीने तिच्या तोंडातून शब्द फुटेना. इतक्यात मागून तो आला आणि तिला त्याने स्पर्श केला. नकोसा वाटणारा स्पर्श... जनी ओरडू लागली. पण तिचे काहीएक चालले नाही.

***

हट्टा पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेले सहायक पोलीस निरीक्षक गजानन मोरे यांचा फोन वाजला. स्क्रीनवर अनोळखी क्रमांक दिसला. कुणाचा फोन असेल याचा विचार करत त्यांनी फोन कानाला लावला.

''हॅलो...''

''नमस्कार साहेब. मी पाचकंदील एरियातून बोलतोय. मी पोलीसमित्र आहे. माझं नाव चंदर. आमच्या इथे एक मोठा राडा झालाय, पण हे लोक पोलिसांकडे जायला तयार नाहीयेत.''

''म्हणजे काय? नक्की झालंय तरी काय?''

''इथल्या वाडीत एक बाई आहे, डोक्याने थोडी अधू आहे. थोड्या वेळापूर्वी त्यांच्या भावकीतल्याच एका बाप्याने तिच्यावर हात टाकला, ते पण तिच्या घरात घुसून. त्याला तिच्या भावानं रंगेहाथ पकडलं. भावजयीनं पण पाहिलं. पण आता हे मॅटर ते पोलिसांत रिपोर्ट करायला तयार नाहीयेत, गुपचूप मिटवून टाकायला पाहताहेत.''

''अस्सं? एक काम करा, मला नाव, पत्ता, लोकेशन वगैरे डिटेल्स पाठवा लगेच. मी पाहतो काय करायचं ते.''

''जी साहेब. जयहिंद.''

''जयहिंद. आणि धन्यवाद.''

फोन ठेवल्यावर साहेब विचार



**''इथल्या वाडीत एक बाई आहे, डोक्याने थोडी अधू आहे. थोड्या वेळापूर्वी त्यांच्या भावकीतल्याच एका बाप्याने तिच्यावर हात टाकला, ते पण तिच्या घरात घुसून. त्याला तिच्या भावानं रंगेहाथ पकडलं. ...''**

करू लागले, गावातले लोक पोलिसांची मदत घ्यायला का तयार नाहीत? काय असेल त्यांच्या मनात. पोलिसांबद्दल जनतेला विश्वास वाटावा म्हणून आपण सगळेच इतकं झटतो, तरी हे असं कशामुळे? त्यांच्या मनात येऊन गेले. अर्थात प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहिल्याशिवाय आणि तिथली परिस्थिती समजून घेतल्याखेरीज सत्य समोर येणार नव्हते. त्यांनी ताबडतोब आपल्या पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक आकाश सरोदे, पोलीस अंमलदार इम्रान कादरी, आणि महिला पोलीस अंमलदार सुरेखा बेले यांना बोलवून घेऊन या प्रकरणाची हकीगत थोडक्यात सांगितली. त्यानंतर त्यांनी पोलीस अंमलदार शेषराव लाखाडे यांना बोलावले,

''लाखाडे, गाडी काढा आपल्याला पाचकंदील साईडला जायचं आहे...''

''होय साहेब. लगेच काढतो.''

पोलीस पथक वेगाने घटनास्थळाकडे निघाले. अंतर फार नव्हते तरी प्रत्येक क्षण उत्कंठा वाढवणारा होता. पीडितेची मानसिक अवस्था लक्षात घेता लवकरात लवकर प्रकरणाचा तपास होणे गरजेचे होते.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी बघितले तर तिथे बऱ्यापैकी सामसूम होती. जणू काही घडलेच नव्हते. पोलीस जनीच्या घरी पोहोचले त्यावेळी जनीचा तिशीचा भाऊच त्यांच्यासमोर आला.

''इथे मगाशी जो काय प्रकार घडला...'' साहेबांनी बोलायला सुरुवात केली. तोच त्यांचे बोलणे अर्धवट तोडत जनीचा भाऊ प्रताप म्हणाला,

''काय घडलं इथे? काही

घडलं नाही. तुम्ही कोणाले भेटायले आलात?''

''हे बघा, असं घाबरू नका. तुमच्या इथे मगाशी तुमच्या बहिणीच्या बाबतीत काय प्रकार घडला ते आमच्या कानावर आलंय. तुम्ही सगळं सविस्तर काय ते सांगा, म्हणजे आपल्याला कंप्लेंट दाखल करून घेता येईल.''

''कसली कम्प्लेंट साहेब? उगाच आमाले त्रास देऊ नका. काय घडलेलंच नाही तर काय सांगायचं तुमाले? मले तर हे बी कळून ऱ्हायलं नाही की तुम्ही कशाबद्दल बोलताय.''

आता मात्र हद्दच झाली. जनीचा भाऊ सरळसरळ वेड पांघरून पेडगावला जात होता. पण तूर्तास त्याच्या कलाने घेणे गरजेचे होते.

पोलीस पथक घराच्या बाहेर आले. तिथे एकदोघे जण घुटमळत होते. त्यांच्यातल्या एकाला त्यांनी बाजूला घेतले.

''साहेब, मले काय माहीत नाही.''

''मग इथे कशापाई आला आहेस? तुला सगळं माहिती आहे. बोल. या जनीच्या घरचे लोक तोंड उघडायला का तयार नाहीत?''

तो इकडेतिकडे बघत कानोसा घेत हळू आवाजात म्हणाला, ''आता ते कसं हाय साहेब, अवघड जागेचं दुखणं म्हणतात तशातली गत आहे. ज्यानं हे कांड केलंय तो यांच्या भावकीतलाच आहे. त्याच्यामुळे हे त्याच्या विरोधात नाय जानार बघा.''

''ठीक आहे. पण आपण केस मिटवून टाकू. तो कुठे आहे ते तर सांगा.''

तो माणूस अविश्वासाने बघत राहिला. त्याच्या मनात चाललेली



**''...तुम्ही इथे गाव बैठक बोलावली. मग भावकीच्या विरोधात जायला नको, आपापसात वादविवाद नकोत म्हणून सगळ्यांनी गप्प बसायचं असं ठरवलं. एवढं सगळं करत असताना एकदाही पोलिसांना विश्वासात घ्यावं किंवा सांगावं असं वाटलं नाही तुम्हाला?...''**

चलबिचल पोलिसांना जाणवली.

''हे बघा, प्रकरण आपसात मिटवायचं तर आरोपी समोर असायला तर हवा ना!''

एवढ्यात साहेबांचा फोन वाजला. समोरून पोलीस मित्रच बोलत होता. त्याने आरोपी गुन्हा करून कुठे लपून बसला आहे याची माहिती साहेबांना दिली. पोलीस पथकाने त्वरित हालचाल करून आरोपी विकी याला ताब्यात घेतले.

विकीला ताब्यात घेतल्यानंतर पोलीस सर्वप्रथम जनीच्या घरी आले. विकीला त्यांनी तिच्या भावासमोरच आणले.

''हाच होता ना, ज्याला तुम्ही मगाशी रंगेहाथ पकडलं होतं? नंतर हा तुम्हाला चकवून पळून गेला. तुम्ही इथे गाव बैठक बोलावली. मग भावकीच्या विरोधात जायला नको, आपापसात वादविवाद नकोत म्हणून सगळ्यांनी गप्प बसायचं असं ठरवलं. एवढं सगळं करत असताना एकदाही पोलिसांना विश्वासात घ्यावं असं किंवा सांगावं असं वाटलं नाही तुम्हाला? निदान तुमच्या बहिणीच्या बाबतीत जे काय झालं तिला न्याय मिळावा असं सुद्धा नाही वाटलं??'' बोलता बोलता साहेबांचा आवाज चढला. तरीदेखील तिच्या घरचे ढिम्मच! आता मात्र साहेबांचाही संयम हळूहळू सुटू लागला.

''हे बघा, अजूनही नीट सांगतोय... तुम्ही कंप्लेंट नोंदवा. आरोपी आमच्या ताब्यात आहे. आमच्याकडे ही गोष्ट घडली असं सांगणारे साक्षीदारही आहेत. तुम्ही आम्हाला या बाबतीत सहकार्य नाही केलंत, तर तुम्हालाही आम्ही या गुन्ह्यात आरोपीला साथ दिल्याच्या आरोपावरून ताब्यात घेऊ शकतो.''

ते न राहवून बोलले.

ही मात्रा मात्र बरोबर लागू पडली. जनीचा भाऊ सुनील याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले.

''नाही साहेब, असं करू नका. साधीभोळी बहीण आहे माझी. नुसती वयाने वाढली आहे, समज कमीच आहे. तुम्ही मला अटक केलीत तर तिला फार जड जाईल. पण खरं ते सांगतो, फिर्याद नोंदवून भावकीचं वैर पत्करायची हिंमत नव्हती आमची, म्हणून मी हे मॅटर पोलीस स्टेशनला रिपोर्ट करायला तयार नव्हतो.''

''मग आता एक काम करा. यातनं बाहेर पडायचं असेल तर पोलीस स्टेशनला येऊन फिर्याद दाखल करा ताबडतोब.''

दुसरीकडे घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा करण्यात आला. आतल्या खोलीत जनी बसलेली होती. भेदरलेली, काहीशी साशंक. पोलिसांना पाहून तर तिचे अवसान अजूनच गळाले. शेवटी पोलिसांनी तिच्या भावाला विश्वासात घेऊन तिला वैद्यकीय तपासणीसाठी तयार व्हायला सांगितले. महिला पोलीस अंमलदार बेले मॅडम तिला तपासणीसाठी घेऊन गेल्या. आरोपी विकी याचीदेखील वैद्यकीय तपासणी करण्यात आली. आरोपीच्या शरीरावर नखांनी ओरबाडल्याच्या काही खुणा होत्या. त्यांची वैद्यकीय तपासणी केली असता जनीनेच त्याला ओरबाडल्याचे निष्पन्न झाले. त्याचप्रमाणे जनीच्या वैद्यकीय तपासणीचा अहवालही पॉझिटिव्ह आला. त्यानुसार तिच्यावर अतिप्रसंग झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपी आणि पीडित यांनी गुन्हा करतेवेळी परिधान केलेले कपडेही जप्त केले. सर्व जप्त मुद्देमाल मा. संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे



**आतल्या खोलीत जनी बसलेली होती. भेदरलेली, काहीशी साशंक. पोलिसांना पाहून तर तिचे अवसान अजूनच गळाले. शेवटी पोलिसांनी तिच्या भावाला विश्वासात घेऊन तिला वैद्यकीय तपासणीसाठी तयार व्हायला सांगितले.**

तपासणीसाठी पाठवण्यात आला. साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. महत्त्वाच्या साक्षीदारांचा सीआरपीसी १६४ नुसार जबाब नोंदवण्यात आला. तपास पूर्ण करून आरोपींच्या विरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

समोर आलेले सर्व साक्षीपुरावे तपासल्यानंतर आणि दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर मा. न्यायालयाने आरोपीला भा. दं. वि. कलम ३५४ अन्वये ५ वर्षे सश्रम कारावास आणि १०० रु. दंड आणि भा. दं. वि. कलम ४५२ अन्वये ५ वर्षे सश्रम कारावास आणि १०० रु. दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास हिंगोली येथील हट्टा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक गजानन मोरे, पोलीस उपनिरीक्षक आकाश सरोदे, पोलीस अंमलदार इम्रान कादरी, महिला पोलीस अंमलदार सुरेखा बेले व पोलीस अंमलदार शेषराव लाखाडे यांनी उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■

***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# बळी



अमर धंदर
सहा. पोलीस निरीक्षक
तुमसर पोलीस ठाणे
जिल्हा भंडारा

**भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यात एक शेतकरी कुटुंबात एक घटना घडली. बळी नामक शेतकरी नेमका कशाचा बळी ठरला होता? काय घडले होते नेमके त्या दिवशी बळीच्या घरात? पोलिसांनी कसा तपास केला या संपूर्ण प्रकरणाचा?**



हिवाळ्याचे दिवस सुरू झाले होते. नोव्हेंबर महिना संपायला अवघे १० दिवस शिल्लक उरले होते. सूर्यास्तानंतर वातावरणातला गारवा वाढायला लागला होता. अंधाराचे साम्राज्य जसे वाढू लागले तसतसे हा गारवा अधिकच वाढीस लागे. पण शेतात दिवसभर कामाने दमणाऱ्या तिशीच्या दरम्यान असलेल्या– बळी आणि त्याच्या कुटुंबाला मात्र हा गारवा सुखद वाटे. रोज घाम गाळून घरी यायचे, येताना वाटेतच जिथे शेतासाठी पाण्याची व्यवस्था केली होती तिथे स्वच्छ हात धुवायचे आणि मगच घराची वाट धरायची हा बळीचा रोजचा नेमच होता. तसाच तो २० नोव्हेंबरलाही रोजची कामे उरकून तो हात धुण्यासाठी गेला. त्यावेळी तिथे असलेला अंधार हा रोजच्यापेक्षा


**महादेव आचरेकर**
पोलीस निरीक्षक
तुमसर पोलीस ठाणे
जिल्हा भंडारा


**मार्कंड डोरले**
पोलीस अंमलदार
तुमसर पोलीस ठाणे
जिल्हा भंडारा


**विशाल खंगार**
कोर्ट पैरवी
जिल्हा भंडारा

अधिक आहे असे उगाच त्याला वाटून गेले. त्याला आता कधी एकदा घरी पोहोचतो असे झाले होते. तरणाबांड गडी आता झपझप पावले उचलत होता. शेताची कामे उरकताना त्याला वेळेचे भान उरले नव्हते.

तर दुसरीकडे बायजाबाई आपल्या नवऱ्याची– बळीची– आतुरतेने वाट बघत होती. त्याला घरी पोहोचायला आज रोजच्यापेक्षा बराच उशीर झाला होता. रोज ७–७.१५ पर्यंत परतणारा बळी, आज ८ वाजत आले तरी लांबपर्यंत कुठेही त्याचा मागमूसही नव्हता. त्यात काही दिवसांपूर्वी घडलेल्या घटनेमुळे ती अधिकच काळजीत पडली. काय करावे हे तिला सुचेना. ती आपली एकसारखी डोक्यावरचा खाली येणारा पदर सावरत अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत होती. तिला ते भांडण आठवले तरी एवढ्या थंडीतही दरदरून घाम येत होता. तो घाम पुसत ती आतुरतेने बळीच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. तो आल्याची चाहुल लागताच तिच्या जिवात जीव आला. आता ती जागेवरून उठली आणि मागच्या बाजूला संध्याकाळच्या स्वयंपाकाच्या आणि पूजेच्या तयारीला लागली. बळी आत आल्यावर त्याच्याकडे न बघताच तिने तोंड उघडले.

''काय ओ, केवढा उशीर केला? मी कधीची वाट बगून राहीले.''

''आता काय करणार? कामाच्या गडबडित धेनातच नाही येऊन राहीलं. कामच करत राहीलो.''



काही दिवसांपूर्वी घडलेल्या घटनेमुळे बायजाबाई अधिकच काळजीत पडली. काय करावे हे तिला सुचेना. ती आपली एकसारखी डोक्यावरचा खाली येणारा पदर सावरत अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत होती. तिला ते भांडण आठवले तरी एवढ्या थंडीतही दरदरून घाम येत होता.

''एकतर ते भांडण, ते बोलणं आठवून मले कापरं भरून राहीलं आनि तुमी असा उशीर केल्यावर मग काय?'' मान वेळावत बायजा बोलली.

''तुले काय धाड भरून राहिली घाबरायले? आगं मी हाय ना. मग...'' तिच्या वेळावणाऱ्या मानेकडे बघून न बघितल्यासारखे करत बळी म्हणाला.

''तुमी तर आहातच हो, पण तुमाले त्यांचा स्वभाव माहीत आहे ना, कसा आहे ते?''

''त्याच्या तोंडात दम आहे निस्ता. करणार काय नाय. मी आज नाही ओळखत त्याले. ल्हान असल्यापासून असंच आहे ते भैताड.''

''त्यांचं काय सांगता येतं का? एक तर डोक्यात राग घालून घ्यायची सवय आहे त्यांले. आई सांगून राहील्या मले मागे. ते काय बी असू दे, तुम्ही वेळेवर घरला परतत जा, म्हंजे बरं.''

''बरं बाई... काम झाल्याझाल्या लगेच घराकडे यायला निघत जातो मी. खुश?''

''इथे भीतीनं थरकाप उडतोय आनि तुमाले थट्टा सुचते? करा, थट्टा करा अजून माजी.'' लटक्या रागाने बायजा म्हणाली.

''आता तुले या बोलण्यातपन थट्टा वाटून राहीली, तर काय बोलणार यावर?''

''बरं, चला, तुमी पूजा आरती करून घ्या. मी तोपर्यंत जेवणाचं बगून घेते. त्या मारुतीरायाला म्हणावं अशीच कृपा असू दे आमच्यावर, आमच्या शेताभातावर.''

''असणारच आहे, तो बगतोय वरून सगळं. आपण एवढी मेहनत घेतो त्याकडे आपला मारुतीराया कानाडोळा करणार आहे व्हय?''

''सगळ्यात चेष्टा सुचून राहिली तुमाले.''

''आता याच्यात कसली थट्टा करून राहीलो मी सांग तरी...''

''जाऊ दे मले बोलायचंच नाही. मी जाते आत.''

आता मात्र बळी मनोभावे हनुमंताची पूजा करू लागला. पूजा आणि हनुमान चालीसा पठन या गोष्टी यथासांग झाल्यावर 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी' ही आरती सुरू करण्याआधी त्याने बायजाला हाक मारली. पण बायजा मात्र आत स्वयंपाक करण्यात गुंग होती. तिचे लक्ष नव्हते. काही वेळ गेला नि तेवढ्यात तिला बाहेरच्या बाजूला काहीतरी पडण्याचा, एका कानठळ्या बसवणाऱ्या किंकाळीचा आवाज ऐकू आला. हातातले काम अर्धवट टाकून ती आवाजाच्या दिशेने धावत आली. तिला वाटणारी भीती अखेर खरी ठरली. तिने त्या अंधारात हातात कुऱ्हाड धरलेला एक माणूस तिथे उभा असल्याचे बघितले. ती घाईघाईने बळीकडे आली. त्याला उठवण्याचा प्रयत्न करत असतनाच त्या व्यक्तीने तिच्यावरही हातातली कुऱ्हाड उगारली. तिला काही कळण्याच्या, समजण्याच्या आत त्या उंचपुऱ्या व्यक्तीने हातातल्या त्याच कुऱ्हाडीने बायजावर वार केले. बळी आणि बायजा यांची चिमुरडी अनुष्का हे सगळे भेदरलेल्या डोळ्याने बघत होती. आता हे आपल्यालाही मारणार या भीतीने लहानगी अनुष्का धावतच तिथे जवळच राहणाऱ्या आपल्या मावशीकडे पळत गेली. ती गेली त्यावेळी तिथे बाहेर 'मंडली' हा लोकसंगीताचा कार्यक्रम रंगात आला होता.

''अनुष्का, तू इथे? आणि ताई भाऊजी कुठे आहेत?''

''त्यांनी मारलं.'' मावशीने विचारलेल्या प्रश्नावर अनुष्का रडत म्हणाली.

''मारलं? कोणी? कुठे?''

तिच्या या प्रश्नावर अनुष्काने सगळा प्रकार मावशीला सांगितला.



> तिला बाहेरच्या बाजूला काहीतरी पडण्याचा, एका कानठळ्या बसवणाऱ्या किंकाळीचा आवाज ऐकू आला. हातातले काम अर्धवट टाकून ती आवाजाच्या दिशेने धावत आली. तिला वाटणारी भीती अखेर खरी ठरली. त्या अंधारात हातात कुऱ्हाड धरलेला एक माणूस तिथे उभा असल्याचे तिने बघितले.

अनुष्काबरोबर मावशी त्यांच्या घरापाशी आली. समोरचे दृष्य बघताच मावशीची पावले जागीच थबकली.

तिने सर्वप्रथम अनुष्काला सावरले. समोरचे ते दृष्य बघून त्या चिमुरडीच्या मनावर किती आघात झाला असेल याची कल्पना तिला आली. तिने लगेच आजूबाजूच्या लोकांची मदत घेत आवश्यक त्या सर्व गोष्टी तातडीने केल्या.

***

तुमसर पोलीस ठाण्यात पोलिसाना एक फोन आला. हा फोन तुमसरच्या रुग्णालयातून आला होता. रुग्णालयातून मिळालेल्या माहितीनुसार तुमसर पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक अमर धंदर हे तातडीने घटनास्थळाच्या दिशेने रवाना झाले. दरम्यानच्या काळात पोलिसांनी तिथे फॉरेन्सिक चमूलाही पाचारण केले होते. घटनास्थळी जाताच त्यांना बायजा आणि बळी यांना रुग्णालयात नेल्याचे समजले. पोलिसांनी घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. घटनास्थळावरून त्यांनी एक कुऱ्हाड, जमिनीवर पडलेले रक्ताचे नमुने हस्तगत केले. आता पोलिसांनी आपला मोर्चा रुग्णालयाच्या दिशेने वळवला. डॉक्टरांनी बळीला मृत घोषित केल्याचे पोलिसांना समजले. धंदर साहेबांनी बळीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. त्यावेळी त्याच्या मृत शरीराचा इन्क्वेस्ट पंचानामाही पोलिसांनी केला. तातडीने करायच्या उपाययोजना करून साहेब आता बायजाकडे वळले.

''कसं वाटतंय तुम्हाला? बरं वाटतंय?'' रुग्णालयात बेडवर झोपलेल्या बायजाची साहेबांनी विचारपूस केली. साहेबांच्या या

प्रश्नाला बायजाने हात वर हलवून बरे असल्याची खूण केली.

''काय झालं होतं नेमकं? कोणी केलं हे सगळं?''

''त्याईले धरा साहेब... त्याईले सोडू नका.''

''हे बघा, तुम्ही जेवढं व्यवस्थित सांगाल तेवढा आम्हाला त्या व्यक्तीचा शोध पटकन घेता येईल. हे सगळं ज्यानी केलंय त्याला तुम्ही ओळखता?''

''हे काय विचारून राहीले साहेब तुमी? अहो मी वहिनी आहे त्यांची. त्यांनी आम्हाला मारताना जराही विचार केला नाही.''

''म्हणजे?''

''म्हणजे अहो साहेब, दुसरा तिसरा कोणी परका माणूस नाहीये. माझा धाकटा दीर आहे.''

''पण त्यांनी हे असं करण्यामागचं कारण?''

''त्यांनी स्वत: दिलेली धमकी खरी केली शेवटी.'' म्हणत बायजाने तोंडाला पदर लावला.

''धमकी?''

''आमच्या ह्यांच्यात आणि भावोजींमध्ये वाद चालू होते. जमीनीवरून. सारखा कोणतातरी वाद उकरून काढायचा आणि शेवटी गाडी जमीनीवर येऊन थांबायची.''

''ओके. तुम्ही काही काळजी करू नका. त्यांनी केलेल्या गोष्टीचं फळ त्यांना नक्की मिळणार.''

पोलीस रुग्णालयातून बाहेर पडले. त्यांनी आता तुमसर पोलीस ठाण्याची वाट पकडली. थोड्याच वेळात पोलिसांचा ताफा ठाण्याच्या आवारात शिरला. ठाण्याच्या प्रवेशद्वारापाशी ठेवलेल्या एका बाकावर एक माणूस खाली मान घालून बसलेला होता. त्याच्या कपड्यांवर रक्ताचे डाग होते. साहेबांसमोर असलेल्या पोलीस अंमलदार मार्कंड डोरले यांचे त्याकडे लक्ष गेले. त्यांनी त्याकडे साहेबांचेही लक्ष वेधले. ती व्यक्ती म्हणजे आदिनाथ असल्याचे त्यांनी साहेबांना सांगितले. साहेब त्या माणसासमोर उभे राहिले.

''हं... आदिनाथ ना तू?''

''हो.''

''का मारलं बळी आणि बायजाला?''

''काय करणार साहेब अजून दुसरं? बऱ्याबोलानं मागितल्यावर देत नव्हता माझा हिस्सा. दादागिरी करायचा माझ्यावर.''

''मोठा भाऊ आणि भावजय होते ना ते तुझे?''

''पण म्हणून काय मले सारखं शिकवत रहायचं? मले बी कळतं माजं भलंबुरं.''

''पण म्हणून काय जीवावर उठायचं त्यांच्या?''

मग काय? मले सवय आहे जरा प्यायची, पण त्यामुळे घरात कोणाले काईच त्रास नाही. कोणाले तरास नको म्हणून मी रात्री उशिरा येऊन राहतो.''

''बरं, पण त्यावेळी नेमकं काय घडलं असं?''

''आता काय सांगणार तुमाले? अहो साहेब वहिनीले कितींदा सांगितलं तरी तिले मागेच चुल मांडायची असायची. त्याचा सगळा धूर आमच्या घरात यायचा. मले ठाऊक आहे मी त्या जागेवर हक्क सांगू न्हाई म्हणून त्या दोगांचा डाव होता. काल सकाळीपण असंच होऊन राहिलं. मले राग आला म्हणून मी चुल टाकली तोडून. तर लागले मलेच शिकवायले. तेव्हाच ठरवलं हे लई होऊन राहिलं. आता काय ते एकदाचं होऊनच जाऊ दे. मले माहिती होतं का ते दोगं संध्याकाळच्या टाईमाले मारुतीरायाची पूजा करतात ते.''

''मग... पुढे?''

''गेलो मागल्या बाजूने. जाताना कुऱ्हाड घेऊन गेलो तर तो पूजाच करत होता. त्याच्या डोक्यावर कुऱ्हाड मारली. लई मारलं त्याला. नंतर वहिनी आली. तिच्या डोक्यातही मारली कुऱ्हाड. तिथून निगालो ते इथेच येऊन थांबलो.''

पोलिसांनी आदिनाथकडून गुन्हा करतानाचे त्याच्या अंगावर असलेले कपडे हस्तगत केले. संकलित केलेल्या गोष्टी तपासणीसाठी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवल्या. अपेक्षेप्रमाणे प्रयोगशाळेचा अहवाल हा पोलिसांनी केलेल्या तपासाला पुष्टी देणारा होता. तसेच पोलिसांनी आदिनाथविरोधात पूर्वी केलेल्या कारवायांचाही उल्लेख केला. पोलिसांनी मा. न्यायालयात त्याच्या

विरोधात दोषारोपपत्र सादर केले.

समोर आलेले सर्व साक्षीपुरावे तसेच दोन्ही बाजू ऐकून घेतल्यनंतर मा. न्यायालयाने आदिनाथला भा. दं. वि. कलम ३०२ व कलम ३२४ अन्वये दोषी ठरवले मा. न्यायालयाने त्याला कलम ३०२ अन्वये आजीवन सश्रम कारावास आणि २,००० रुपये दंड तर कलम ३२४ नुसार २ वर्षे सश्रम कारावास व १,००० रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास तुमसर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या महादेव आचरेकर यांच्या मार्गदर्शनानुसार तुमसर पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक अमर धंदर, पोलीस अंमलदार मार्कंड डोरले व विशाल खंगार(कोर्ट पैरवी) यांनी अतिशय कौशल्याने व मेहनतीने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

## कविता

# म्हणून मी नेहमी आनंदी असतो...



**पल्लवी शिंदे**
**जुन्नर**

**मी भुतकाळ चघळत नाही, ना मी भविष्याची चिंता करतो
मी वर्तमानात जगतो, म्हणून मी नेहमी आनंदी असतो**

**मी कुणाकडुन काडीची अपेक्षा करत नाही, मी कुणाबद्दल राग मनात धरत नाही
मी लगेच सगळ्यांना माफ करतो, म्हणून मी नेहमी आनंदी असतो**

**मी कसलाच हव्यास आणि लोभ करत नाही, बकरी सारखा मी दिवसभर चरत नाही
मी समाधानी राहुन फक्त दोन वेळाच खातो, म्हणून मी नेहमी आनंदी असतो**

**मी हायफाय राहण्यासाठी धडपडत नाही
आपुलकीची आणि मैत्रीची किम्मत नसणाऱ्यासाठी कधीच दुःखाने तडफडत नाही
साधं राहुन आपल्या माणसांत सुखानं रमतो, म्हणून मी नेहमी आनंदी असतो**

**कोण काय बोलतं ह्याचा मी कधीच विचार करत नाही,
कोणी काहीही बोलल तरी पुन्हा मी ते स्मरत नाही
माझे जीवन स्वछंदी आहे ते मी मजेत जगतो, म्हणून मी नेहमी आनंदी असतो**

**मला ना पदाचा ना ज्ञानाचा अहंकार कधी मला तुच्छतेचा विचार कधी
मनाला नाही भावला पाय जमिनीवर ठेऊन प्रसंगी अनवाणी चालतो, म्हणून मी नेहमी आनंदी असतो**

**जगायला काहीच भौतिक सुख लागत नाही म्हणून मी गर्वाने कधीच वागत नाही
सगळ्यांशी प्रेमाने आदराने आपुलकीने वागतो, म्हणून मी नेहमी आनंदी असतो**

**जन्म शाश्वत आहे तसा मृत्यू देखील शाश्वत आहे ही जाणीव आहे
माझ्यातही दोष आहेत आणि काहीतरी नक्कीच उणीव आहे
माझे दोष मी रोजच पाहुन सुधारण्याचा प्रयत्न करतो, म्हणून मी नेहमी आनंदी असतो**

# गुन्ह्यास कारण की...





जिवन राजगुरू
सहा. पोलीस निरीक्षक
गोंडपिंपरी पोलीस ठाणे
जिल्हा चंद्रपूर


चंद्रपूर जिल्ह्यातील मौजे दरूर गावात भररस्त्यात सकाळी घडलेल्या घटनेने तेथे हजर असलेल्या लोकांच्या जिवाचा थरकाप उडाला. एका संशयी व्यक्तीने केलेले ते कृत्य बघून लोकांचा नात्यावरचा विश्वास उडावा, अशीच ती घटना होती. काय केले होते त्या व्यक्तीने नेमके? गोंडपिंपरी पोलिसांनी कशी तत्परतेने तपास करून उकल केली या गुन्ह्याची?



चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंपरी येथील मौजे दरूर गावात ऑगस्ट महिन्यात पावसाने दीर्घ काळानंतर थोडीशी विश्रांती घेतली होती. सकाळची वेळ असल्यामुळे गावात व्यवहार, दैनंदिन गोष्टी हे तसे अजूनही मंदगतीनेच सुरू होते. यावेळी साठीच्या आसपास वय असणारे महिपती बऱ्याच दिवसांनी त्यांच्या घराजवळ असलेल्या पानाच्या ठेल्यावर आले. पानवाल्याला त्यांनी त्यांचे लाडके पान तयार करायला सांगितले. हे



**प्रेमदास चव्हाण**
पोलीस अंमलदार
गोंडपिंपरी पोलीस ठाणे
जिल्हा चंद्रपूर



**शामराव कुलगमकर**
पोलीस अंमलदार
गोंडपिंपरी पोलीस ठाणे
जिल्हा चंद्रपूर



**विलास कोवे**
पोलीस अंमलदार
गोंडपिंपरी पोलीस ठाणे
जिल्हा चंद्रपूर

सगळे सुरू असताना त्यांचा भाचा जितेंद्र त्यांच्यासमोर आला. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव काहीतरी वेगळेच भासत होते.

''जितेंद्रराव, सुमन वहिनींच्या बाबतीत काय झालं ते कळलं मला. लई वंगाळ झालं बघा.'' पण पानवाल्याच्या बोलण्याकडे जितेंद्रचे लक्षच नव्हते. तो महिपतीरावांकडे एकटक बघत होता. त्याचे डोळे जणू आग ओकत होते. नाकपुड्या फुरफुरत होत्या. एवढा वेळ पाठीमागे असलेला हात त्याने पुढे आणला आणि... कोणी कल्पनाही केली नसेल असे काहीतरी भयंकर घडले. एक जीवघेणी किंकाळी आसमंत भेदून गेली. तेथून थोड्या लांब अंतरावर भांडी घासत असलेली महिपतीरावांची सून ती किंकाळी ऐकून आवाजाच्या दिशेने पळत आली.

***

थोड्या वेळाने गोंडपिंपरी पोलीस ठाण्यातला फोन खणाणला. कर्तव्यावर असलेल्या अंमलदारांनी फोन उचलला.

''नमस्कार, गोंडपिंपरी पोलीस ठाणे. बोला, कोण बोलताय?''

''मी गावचा पोलीस पाटील बोलतोय साहेब.''

''बोला. काय झालं? एवढ्या सकाळी सकाळी फोन केलात.''

''साहेब, अहो... इकडे गावात



> मिळालेल्या माहितीनुसार सहा. पोलीस निरीक्षक जिवन राजगुरू हे पोलीस अंमलदार शामराव कुलगम कर यांच्यासह तातडीने घटनास्थळाकडे रवाना झाले. तोपर्यंत साठीच्या आसपास असणाऱ्या महिपतीरावांना रुग्णालयात नेण्यात आले.

एक मॅटर झालाय.

''काय झालं?''

अंमलदारांच्या या प्रश्नावर पोलीस पाटलांनी दिलेली माहिती समजताच त्यांनी तातडीने फोन ठेवला आणि गांभीर्य ओळखून वरिष्ठांना याबाबत माहिती दिली. अंमलदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार सहा. पोलीस निरीक्षक जिवन राजगुरू हे पोलीस अंमलदार शामराव कुलगमकर यांच्यासह तातडीने घटनास्थळाकडे रवाना झाले. तोपर्यंत साठीच्या आसपास असणाऱ्या महिपतीरावांना रुग्णालयात नेण्यात आले होते. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. शेवटी काळाने घात केलाच. रुग्णालयाच्या वाटेवरच महिपतीरावांची प्राणज्योत म ालवल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. त्यांचे पोट, डाव्या हाताचा तळवा इत्यादी ठिकाणी वार करण्यात आले होते.

पोलिसांनी घटनास्थळाचा २ पंचांसमक्ष पंचनामा केला. घटनास्थळाची छायाचित्रेही घेण्यात आली. घटनास्थळावरून पांढऱ्या रंगाचा पाईप आणि रक्ताचे नमुने हस्तगत करण्यात आले. तसेच पोलिसांनी महिपती यांनी परिधान केलेले कपडे आणि संपादित केलेल्या इतर गोष्टी वैद्यकीय तपासणीसाठी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडे पाठवल्या. पोलिसांनी तातडीने महिपतीरावांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. त्यानंतर त्यांनी घटनास्थळी जवळपासच्या परिसरात असलेल्या माणसांकडे घटनेसंदर्भात विचारपूस केली.

''इथे नेमकं काय घडलंय सांगू शकता?''

''होय साहेब, महिपतीराव आले

होते आज सकाळी माझ्या ठेल्यावर नेहमीप्रमाणे.''

''तुम्हाला कधी काही विचित्र किंवा त्यांच्या वागण्यात वेगळेपणा असं काही जाणवलं? किंवा त्यांच्या आजूबाजूला कुठली संशयास्पद व्यक्ती आहे असं काही दिसलं?''

''नाही बा! तसं काही नाही. सकाळी नमस्कार वगैरे केला आणि नेहमीचं पान लावायला सांगितलं. पान करता करता थोड्या गप्पा झाल्या बा आमच्या.''

''पण मग हे सगळं कोणी केलं? तुम्ही ओळखता त्या व्यक्तीला?''

''हो तर. सगळेच ओळखतात त्याला. जितेंद्र नाव आहे त्याचं. त्याची बायको कॅन्सरनी गेली ना मागे. आता.. ज्यानी मारलं तो त्यांचा नातेवाईक होता ना!''

''काय? पण मग त्यानी का केलं असेल असं? तुम्ही काही सांगू शकता त्याबद्दल?''

''नाही ना. तो आला आणि आल्याआल्या सुरूच केलं. महिपतीरावांची सून तिथे घराबाहेर भांडी घासत बसली होती. हा सर्व प्रकार बघून ती बी आली ना धावत. तिला येताना बघून हा गडी पसार.''

''बरं, तो कुठल्या बाजूने गेला ते बघितलं का तुम्ही?'' राजगुरू साहेबांनी विचारले.

''अहो तो तिकडे गेला. समोरच्या बाजूनी. जितेंद्रनी केलेला प्रकार बघून आम्हाला आधी त्यांना हॉस्पिटलला न्यावं लागलं. त्यामुळे तो नंतर पुढे कुठे गेला ते काय ठावं नाई बा.''

''ठीक आहे.''

घटनेतील प्रत्यक्ष साक्षीदारांचे सीआरपीसी १६४ प्रमाणे जबाब पोलिसांनी नोंदवून घेतले आणि त्याबरहुकूम लगेच पुढचा तपास सुरू ठेवला. जितेंद्रला तातडीने पकडणे आवश्यक होते. गुप्त



घटनेतील प्रत्यक्ष साक्षीदारांचे सीआरपीसी १६४ प्रमाणे जबाब पोलिसांनी नोंदवून घेतले आणि त्याबरहुकूम लगेच पुढचा तपास सुरूठेवला. जितेंद्रला तातडीने पकडणे आवश्यक होते. गुप्त बातमीदारांमार्फत पोलिसांना जितेंद्रचा ठावठिकाणा समजला.

बातमीदारांमार्फत पोलिसांना जितेंद्रचा ठावठिकाणा समजला. पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याला घेऊन पोलिसांची जीप गोंडपिंपरी पोलीस ठाण्याच्या आवारात आली. पूर्ण रस्ता जितेंद्र भुईकडे नजर ठेवून होता. काही वर्षांपूर्वी घडलेली एक यातना देणारी घटना त्याला सारखी आठवत होती. जणूकाही अगदी कालपरवा घडल्यासारखी. तो स्वत:च्याच विचारात गर्क झाला होता. त्याला आपण पोलीस ठाण्याच्या आवारात आलो आहोत हेही कळत नव्हते. एखाद्या यंत्राप्रमाणे तो पोलिसांमागून चालत होता. पोलिसांनी त्याचे कपडे जप्त केले. जप्त केलेले कपडेही पोलिसांनी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवले.

''जितेंद्र... बोल आता का मारलंस तू तुझ्या मावशीच्या मिस्टरांना?''

राजगुरू साहेबांच्या या प्रश्नाचा जितेंद्रवर कोणताही परिणाम झाला नव्हता. सुरुवातीपासूनची जमिनीवरची नजर तसूभरही हलली नाही.

''साहेब काय बोलतात ते कळलं नाही का तुला?'' पोलीस अंमलदार विलास कोवे यांनी विचारले.

''कोवे, एक मिनीट...'' साहेबांनी हात वर करून त्यांना गप्प राहण्याची सूचना केली.

''हे बघ जितेंद्र, तुझी काही सुटका नाही यातून. तू जेवढा गप्प बसशील तेवढं तुझंच नुकसान आहे. त्यामुळे पटकन सांगून टाक.''

साहेबांच्या बोलण्यावर त्याने एकदा साहेबांकडे हसून बघितले. त्याच्या हसण्यात एक खिन्नता होती.

''अरे बोल! हे बघ तुला चाकू भोसकताना काही जणांनी बघितलं

आहे. त्यामुळे तू यातून सहीसलामत बाहेर पडू शकणार नाही हे तर नक्की.''

''इथे कोणाला बाहेर पडायचं आहे? बाहेर पडायचं असतं तर हे कधी केलंच नसतं''

''म्हणजे?''

''हं'' दीर्घ उसासा सोडत तो पुढे म्हणाला,

''मला सांगा सुमनच्या माघारी मी जिवंत राहून करू तरी काय?''

''सुमन?''

''माजी बायको. तीच तर खाल्ली या हणम्यानं– माझ्या काकानं.'' जितेंद्रने आपले तोंड दोन्ही गुडघ्यांमध्ये खुपसले.

''नीट सांग काय ते. असं कोड्यात बोलू नको. तुझी निरर्थक कोडी सोडवण्यासाठी ना आमच्याकडे रिकामा वेळ आहे ना आम्हाला उत्साह आहे. त्यामुळे काय ते व्यवस्थित सांगायचं.''

''आता काय बोलणार आन् काय सांगणार साहेब? आपलेच दात आन् आपलेच ओठ म्हणतात ना त्यातली गत आहे हे सगळं म्हणजे.''

''तुला आत्ता म्हणालो ना कोड्यात नाही बोलायचं म्हणून तरी परत तेच. नीट सांग काय ते नाहीतर...'' साहेबांनी दरडावले.

''सुमनला कॅन्सर झाला होता. आम्ही आमच्याकडून सगळे उपचार करत होतो. हळूहळू ती बाहेर पडतही होती. पण हा बाबा तिला बघायला तिची विचारपूस करायला म्हणून आला आणि त्यानी डाव साधला. नक्की जादूटोणा केला असणार.तो येऊन गेल्यावर सुमनचं वागणं, बोलणं बदलूनच गेलं एकदम. कुठले कुठले अंगारे काय आणायची, बारीक आवाजात कुठले कुठले मंत्र पुटपुटायची, कधीही अंघोळच काय करायची...



पुरती वश झाली होती त्याला. मी खूप समजावलं तिला 'असं करू नकोस म्हणून' पण तिनं साफ दुर्लक्ष केलं तेव्हा. याचा व्हायचा तोच परिणाम झाला. सुमन मला सोडून गेली कायमची. तेव्हाच ठरवलं याचा बदला घ्यायचा. ज्या माणसाच्या जादूटोण्यामुळे माझी सुमन मला सोडून गेली त्याला ढगात पाठवायचं

मी कित्येकदा विचारलंपण तिला. तर म्हणायची ''मी लवकर बरं व्हावं, तुम्हाला कोणाला फार त्रास न होता यासाठी करते.'' त्यावरून आमच्यात वादही झाले. तिने नंतर डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्या घेणं बंद केलं होतं हे मला तिच्या गादीपाशी सापडलेल्या रॅपरवरून समजलं.''

''पण रॅपर बघितल्यावर असं करण्यामागचं कारण नाही विचारलं?''

''विचारलं, पण धड उत्तर देईल तर ना... पुरती वश झाली होती त्याला. मी खूप समजावलं तिला 'असं करू नकोस म्हणून' पण तिनं साफ दुर्लक्ष केलं तेव्हा. याचा व्हायचा तोच परिणाम झाला. सुमन मला सोडून गेली कायमची. तेव्हाच ठरवलं याचा बदला घ्यायचा. ज्या माणसाच्या जादूटोण्यामुळे माझी सुमन मला सोडून गेली त्याला ढगात पाठवून याचा बदला घ्यायचा म्हणून. मग मोका मिळण्याची वाट बघत बसलो. आणि त्या दिवशी मला संधी मिळाली. पानाच्या ठेल्याकडे माझं लक्ष गेलं तर हा बाबा तिथेच उभा. गेलो घरात, चाकू घेतला, गेलो त्याच्या समोर आणि मारलं त्याला.''

''अरे, पण तू पाहिलं होतं का त्यांना असं काही विचित्र गोष्टी करताना?''

''नाही. बघायला कशायला हवं? कळतं ना आपल्याला. आपण जिला ओळखतो ती व्यक्ती जर वेगळं वागायला बोलायला लागली तर त्याचा संबंध कशाशी आहे हे समजतं साहेब. माझी सुमन अशी तासन्तास देवपूजा, मंत्रपठण करणाऱ्यातली मुळीच नव्हती. पण तो आला आणि ही... बघावं, तेव्हा तोंडाने काहीतरी पुटपुटणं सुरूच.

कळतं ना साहेब.''

थोड्याच दिवसांनी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडून अहवाल आला. या अहवालानुसार घटनास्थळी हस्तगत केलेल्या पांढऱ्या रंगाच्या पाईपवर असलेले रक्ताचे डाग, जितेंद्रच्या जप्त केलेल्या कपड्यांवरील रक्ताचे डाग हे महिपतरावांच्या रक्ताशी साधर्म्य साधणारे होते. पोलिसांनी जितेंद्रविरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. समोर आलेले साक्षीपुरावे तसेच दोन्ही बाजू ऐकून घेत मा. न्यायालयाने जितेंद्रला भादंवि कलम ३०२ प्रमाणे दोषी ठरवून आजीवन सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंपरी पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक जीवन राजगुरू, प्रेमदास चव्हाण, पोलीस अंमलदार शामराव कुलगमकर व विलास कोवे यांनी अतिशय तत्परतेने व चपळाईने पूर्ण केला आहे. ■

***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# कविता

## महेंद्र पंडित

**श्रम, सचोटी, करुणा ही मूल्ये आत्मसात करूनी**
**शैक्षणिक ध्यास धरुनी उमटला ठसा आपल्या नेतृत्वगुणांनी**

**देशसेवेच्या आवडीतून श्रमाचा चढवूनी कप्प्यावर कप्पा**
**नागरी सेवा परीक्षेतील यशाने गाठला परिवर्तनकारी टप्पा**

**अपवादात्मक नेतृत्वाची धोरणात्मक विचारसरणी**
**बुद्धिमत्ता सार्वजनिक सेवेतील वचनबद्धतेची पर्वणी**

**विविध पैलूंशी जुळवून संघटित गुन्हेगारीला आळा घालून**
**पोलीस आणि जनतेतला विश्वास सहकार्य वाढवून**

**जबाबदारीच्या खोल भावनातून असंख्य कामगिरी नेहल्या पूर्णत्वाला**
**नाविन्यपूर्ण पोलिसिंग पद्धतीने प्रत्येक क्षणी न्यायासाठी लढला**

**महिला हक्कांचे समर्थक तुम्ही तंत्रज्ञानावर दृढ विश्वास**
**धैर्य नवोपक्रमाचा ज्वलंत सार गुन्हेगारी मुक्ततेचा करुनी स्वप्न ध्यास**

**असे हे आदर्श नेतृत्व वाचन प्रवास सेवा कार्यात**
**उत्तुंग उभारी घेऊ दे जीवनातल्या प्रत्येक यशात**

**शिस्तबद्ध महामेरूचा लाभला आम्हाला सुवर्ण सहवास**
**उदयोन्मुख होऊन शुभेच्छा देतो आपल्या क्षितिजा एवढ्या कार्यास**

**राज करनुरकर**
**महाराष्ट्र पोलीस**
**कोल्हापूर**

तपासकथा

# माझं काय चुकलं?



गणेश सायकर
पोलीस उपनिरीक्षक
सेवाग्राम पोलीस ठाणे
जिल्हा वर्धा

वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम येथे मार्च, २०२१ मध्ये लहानग्या रुक्सानाच्या बाबतीत जे घडले ते केवळ अनाकलनीय होते. तिने विचारलेला एक प्रश्न आणि बस... पुढे जे काही झाले ते अंगावर काटा आणणारे होते. त्या वेळी 'माझं काय चुकलं?' हाच प्रश्न तिच्या अबोध मनात आला असणार. नेमके काय घडले होते? सेवाग्राम पोलिसांनी कसे पकडले आरोपीला?



वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम आणि आसपासच्या परिसरात मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात ऊन वाढायला लागले होते. सकाळी उन्हे वाढायच्या आत गॅस शेगडीशी संबंधित सगळी कामे पूर्ण करण्याची कसरत बरकत कायम करत असे. यंदाही हा शिरस्ता तिने कायम ठेवला होता. त्या दिवशी मात्र आदल्या दिवशीच्या जागरणामुळे तिला थोडीशी ग्लानी आली होती. शिवाय ती झोपेतून उठली, त्यावेळी सगळे अंग ठणकत होते. पण आलेली मरगळ दूर करणे तिला भाग होते. तिने निग्रहाने कामाला सुरुवात केली. त्याचवेळी घरातल्या दुसऱ्या खोलीत असलेल्या खाटेवर अस्ताव्यस्त पसरलेला शाहीद मात्र ओरडत होता.

''या अल्ला! सर फूट रहा है






**रामेश्वर नागरे**
पोलीस अंमलदार
सेवाग्राम पोलीस ठाणे
जिल्हा वर्धा

**जयेश डांगे**
पोलीस अंमलदार
कोर्ट पैरवी
जिल्हा वर्धा


मेरा। रहम कर।'' हे बोलताना तो हाताने स्वतःचे डोके बडवत होता.

''अरे बरकत, नींबू पानी दे दे जल्दी।''

बरकतने मात्र या हाकेकडे साफ दुर्लक्ष करून स्वतःचे काम तसेच पुढे सुरू ठेवले.

''अरे मर गयी क्या? सुनाई नही देता? नींबू पानी दे दे जल्दी।'' शाहीद पुन्हा एकदा करवादला. शेवटी एकदाचे तिने त्याच्यासमोर लिंबू पाण्याचा ग्लास धरला.

''पिता काय को इतना? पिके घर आके चिलमचिल्ली करता रहता है। हम दोनो का नहीं तो अपने बेटों का तो खयाल कर।''

''अब तू सिखाएगी मुझे? तुझे अभी दिखाता हूं।''

''हाँ.. हाँ.. यही तो करते आये हो। हाथ उठाने के सिवा कुछ आता है तुम्हे? अंदर गॅस कभी भी बंद हो सकता है। कितनी बार बोला है तुम्हे, जाके सिलेंडर ले के आओ। लेकीन वो तेरे कानो मे घुसताच नही।''

''बोला ना, तेरे को, अपनी जुबान बंद रखने को। रूक तू अभी, तुझे अच्छा मज्जा चखाता हूं।'' असे म्हणत शाहीद सिलेंडरजवळ गेला आणि त्याने सिलेंडर बंद करून तो बाहेरच्या बाजूला ओढत नेऊ लागला. ते बघताक्षणी शाहीद काय करणार हे बरकतला कळून चुकले. वाट अडवण्याच्या हेतूने त्याच्या पुढ्यात ती जाऊन उभी राहिली.

''ये क्या कर रहा है तू? दिमाग खराब हो गया तेरा? अगर इसे भी बेच डाला तो पकाऊंगी किस



त्याने हात पकडून तिला घराच्या बाहेरच्या दिशेला ओढले आणि फरफटत नेऊन तिच्या घरापासून जवळच राहणाऱ्या तिच्या अब्बूजानच्या घरासमोर आणले. तिने आदल्या दिवशीच आपल्या लहानग्या रुकसानाला, तिने हट्ट केला म्हणून त्यांच्याकडे सोडले होते.

पे? और वैसे भी ये तू बिक नही सकता। अब्बूजान के नाम पे है ये सिलेंडर।''

''चल तू, उन से बात करते है चल।''

त्याने हात पकडून तिला घराच्या बाहेरच्या दिशेला ओढले आणि फरफटत नेऊन तिच्या घरापासून जवळच राहणाऱ्या तिच्या अब्बूजानच्या घरासमोर आणले. तिने आदल्या दिवशीच आपल्या लहानग्या रुकसानाला, तिने हट्ट केला म्हणून त्यांच्याकडे सोडले होते. ती तिथेच आतमध्ये खेळत होती. आपल्या आईवडिलांना बघताच ती त्यांच्याकडे झेपावली. रुकसानाला बघताच शाहीद रागाने लाल झाला. त्याच्या नाकपुड्या फुरफुरायला लागल्या. आपले अब्बू आपल्याकडे असे का बघत आहेत हे रुकसानाला लक्षात आले नाही. तिने वडिलांना मिठी मारण्यासाठी त्याच्याजवळ जाताच शाहीदने 'ये आ गयी आफत' म्हणत तिला स्वतःपासून लांब केले.

''क्या हुआ अब्बू?'' बोबड्या गोड आवाजात तिने शाहीदला विचारले, पण शाहीद मात्र तिला उत्तर देण्याऐवजी गप्प होता. त्याचा तो थंड प्रतिसाद पाहून नबाब– बरकतचे वडील– अधिकच अस्वस्थ झाले.

''क्या हुआ? कम से कम रुकसाना के साथ तो ऐसा मत कर। देख उस की आँखे अपने अब्बू की प्यारभरी नजर के लिये तरस रही है।''

''आप तो कुछ ना बोलोगे तो ही बेहतर है। बेटी का नाम बरकत, लेकिन मेरी जेब हमेशा खाली, इस के हाथ खाली। आज मै पैसों के लिये ये सिलेंडर बेच रहा था, तब मेरे सामने खडे होके बोली... ये सिलेंडर मे नहीं बेच सकता। क्योंकी ये तुम्हारे नाम पे है बुड्ढे।''

''क्या बोल रहे हो? कुछ तो

लियाज करो! जबान संभाल के बात करो शाहीद। तुम अभी उन्ही के घर पे हो और उन्ही को खरी खोटी सुना रहे हो।''

ही सगळी वादावादी रुक्साना भेदरलेल्या अवस्थेत लांबून बघत होती. थोड्या वेळाने शाहीदचे लक्ष तिच्याकडे गेले.

''ये जब तक है तब तक मुझे जो चाहिये वो कभी नही मिल सकता और मै वो पाने के लिये कुछ भी कर सकता हूं।'' असे म्हणत त्याने रुक्सानाला कडेवर उचलले आणि घराच्या बाहेर पडला.

''रूको! उसे कुछ मत करो।'' बरकत आणि घरातले बाकीचे शाहीदच्या पाठीमागे गेले. ते थोडे अंतर गेले आणि...

त्यांनी समोर बघितलेले दृश्य इतके भयंकर होते की त्या सर्वांची पावले जागीच थबकली. ते सर्व करताना शाहीद आनंदाने हसत होता. शेवटी ज्याची भीती होती तेच घडले. बघणाऱ्या कोणाच्याही अंगावर शहारा येईल असे दृश्य होते ते. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे करताना शाहीद मात्र हसत होता. थोड्या वेळाने तो भानावर आला तेव्हा मात्र तो तेथून पळाला. पुढे बरकतने तिच्या लहानग्या रुक्सानाला उचलून कडेवर घेतले आणि तातडीने रुग्णालयाच्या दिशेने धाव घेतली. तिला डॉक्टरांनी अतिदक्षता विभागात दाखल करून तिच्यावर तातडीने उपचार सुरू केले.

''डाक्टर साब, मेरी रुक्साना को बचाईये।'' बरकत हात जोडून डॉक्टरांना विनवत होती.

''देखिये, जितना भी हमसे बनता है वो हम करेंगे। ये पोलीस केस है, तो पोलीस को बताना पडेगा।''

रुग्णालयातून पोलिसांना सदर घटना समजली. सेवाग्राम पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेल्या पोलीस उपनिरीक्षक गणेश सायकर यांना घडलेला प्रकार समजला आणि ते पोलीस अंमलदार रामेश्वर



बघणाऱ्या कोणाच्याही अंगावर शहारा येईल असे दृश्य होते ते. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे करताना शाहीद मात्र हसत होता. थोड्या वेळाने तो भानावर आला तेव्हा मात्र तो तेथून पळाला. पुढे बरकतने तिच्या लहानग्या रुक्सानाला उचलून कडेवर घेतले.

नागरे यांच्यासह रुग्णालयात दाखल झाले. त्यांनी प्रथम डॉक्टरांशी संपर्क साधला.

''डॉक्टर हाऊ इज शी?''

''वेल, ऑफिसर, आमचे प्रयत्न सुरू आहेत पण मार जबरदस्त बसला आहे त्यामुळे आत रक्त साकळल्यासारखं झालं आहे. निदान आत्तातरी बेशुद्ध आहे ती.''

''ओके.''

साहेबांनी आपला होरा आता रुक्सानाच्या परिजनांकडे वळवला.

''तुम्हीच बरकत ना?''

''जी साब।''

''देखिये मुझे मालूम है आप के दिल पे अभी क्या बीती होगी। लेकीन जिसने आपकी बेटी के बारे मे ये किया है उसे पकडने के लिये आप को कुछ सवाल के जबाब देने पडेंगे।''

सहेबांच्या या बोलण्यावर आत्तापर्यंत नुसती बसलेली बरकत आता मात्र धाय मोकलून रडू लागली. मोठ्या मुश्किलीने बरकतला तिच्या आईवडिलांनी सावरले.

''साब, शाहीद मेरा शोहर हररोज पीकर मुझे मारता था। वो मुझसे छुटकारा चाहता था। आज तो उसने सारी सीमाए लांग दी।''

''मतलब? असल मे क्या हुआँ?''

''उसने मेरी फूल जैसी रुक्साना को घुमाके जमीनपर....'' एवढे बोलून बरकतने परत एकदा आपले तोंड हाताच्या ओंजळीत धरले. पोलिसांनी बरकतने सांगितलेल्या माहितीनुसार गुन्हा नोंदवला. दरम्यानच्या काळात साहेबांनी घटनास्थळ सील करण्याची सूचना केली होती. पोलीस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचानामा केला. घटनास्थळाचे छायाचित्रण

करण्यात आले. सीआरपीसी १६४ नुसार प्रत्यक्षदर्शी साक्षादारांचे जबाब नोंदवण्यात आले. पोलिसांचा तपास सुरू असताना दुसरीकडे रुक्सानाच्या तब्येतीत हळूहळू सुधारणा होत होती. डॉक्टरांशी संपर्क साधून पोलिसांनी रुक्सानाच्या जखमांची वैद्यकीय तपासणी झाली. तिच्या जखमांबद्दलचा वैद्यकीय अहवाल पोलिसांनी हस्तगत केला. साहेबांनी शाहीदविषयी अधिक माहिती हस्तगत करण्यासाठी परत एकदा बरकतशी संवाद साधला.

''एक बात पूछनी थी आप से।''

''पूछिये साब, मेरी रुक्साना के लिए मै कुछ भी बताने को तैयार हूं।''

''एक बात बताइये शाहीद जा कहाँ सकता है? कुछ रिश्तेदार या फिर किसी दुसरी जगह जहाँ वो छिप सकता है और जो आपको पता हो?''

''हाँ साब, वो उसके गाव हो सकता है, वहाँ शाहीद के कई रिश्तेदार है।''

''उन सबके पते होगे ना आप के पास?''

''है ना अभी देती हूं।''

पोलिसांनी आता बरकतकडून शाहीदच्या नातेवाईकांचे पत्ते व अन्य माहिती घेतली. तिच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलीस शाहीदच्या नातेवाईकांकडे त्याच्याविषयी त्याच्या ठावठिकाण्याविषयी माहिती घेण्याचा प्रयत्न करू लागले.

पोलिसांचा ताफा शाहीदच्या गावातील एका घरासमोर येऊन थांबला. साहेबांनी दारावर थाप मारली. थोड्या वेळाने दरवाजा उघडला गेला.

''रफिक कौन है यहाँ पे?''

''मै ही हू साब। क्यों क्या हुआँ?''

''शाहीद तुम्हारा ही चचेरा भाई है ना?''

''जी।''



पोलीस एकट्या रफिकवर विसंबून नव्हते. तो कोणाच्या संपर्कात असू शकतो अशा सगळ्यांची बारकाईने चौकशी करण्याचे काम पोलीस निरंतर करत होते. दरम्यानच्या काळात रुक्सानाच्या वैद्यकीय चाचणीचा अहवाल आला. त्यातून शाहीदने केलेल्या कृत्याला पुष्टी मिळाली होती.

''वो आया था यहाँ? या अभी आया है?''

''लेकीन हुवा क्या है?''

''देखो, उसने रुक्साना की जान लेने की कोशिश की है।''

''या परवरदिगार! क्या बोल रहे हो साब आप?''

''हाँ, वो ॲडमिट है अस्पताल मे।''

''हुआ कब ये सारा?''

''अभी थोडे दिन पहले। अगर तुझे शाहीद के बारे मे जानकारी मिलती है या वो खुद यहाँ आता है, तो तुम हमे बताओगे। समझे?''

''हा साब।''

''और अगर कुछ भी छुपाया, तो उसके साथ तुम भी उसको मदत करने के लिये नही बक्षोगे।''

''मै ऐसा क्यो करूंगा साब? मुझे उस के बारे मे जैसे भी खबर मिलती है, मै आपको इत्तिला, मतलब खबर कर दूंगा।''

त्याला सूचना देऊन पोलीस पुढच्या तपासाला लागले. पोलीस एकट्या रफिकवर विसंबून नव्हते. तो कोणाच्या संपर्कात असू शकतो अशा सगळ्यांची बारकाईने चौकशी करण्याचे काम पोलीस निरंतर करत होते. दरम्यानच्या काळात रुक्सानाच्या वैद्यकीय चाचणीचा अहवाल आला. त्यातून शाहीदने केलेल्या कृत्याला पुष्टी मिळाली होती.

''साब सलाम, मै रफिक।'' साहेबांनी फोन उचलताच त्यांनी लगेच हा आवाज आणि फोनवर त्या व्यक्तीने दिलेली ओळख ऐकताच त्यांचा चेहरा आनंदून गेला. पोलिसांचा सततच्या मेहनतीला आता अपेक्षित फळ मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती.

''तुम खाली ठिकाना बताओ।''

रफिकने सांगितलेल्या पत्त्यावर पोलिसांचा ताफा पोहोचला आणि शिताफीने शाहीदला त्यांनी सुमारे २-३ महिन्यांच्या अथक परिश्रमांनंतर पकडले. त्याला घेऊन पोलिसांचा ताफा सेवाग्राम पोलीस ठाण्याच्या दिशेने निघाला. संपूर्ण रस्ताभर शाहीद तोंडातल्या तोंडात काहीतरी बरळत होता. थोड्याच वेळात पोलीस सेवाग्राम पोलीस ठाण्याच्या आवारात आल्यावर पोलिसांच्या पाठोपाठ शाहीदही उतरला. त्याचे कपडे धुळीने अतिशय मळकट झाले होते. मंद पावलांनी तो आत चालत गेला.

''शाहीद,'' ते पुढे म्हणाले, ''हमारे साथ बहोत आँखमिचोली खेली तूने... अब बस... सीधे तरिके से बता दे रुक्साना को मारने की कोशीश क्यों की?''

साहेबांच्या या बोलण्याकडे शाहीदचे लक्षच नव्हते. तो आपल्या स्वत:च्याच विचारात गढलेला होता. साहेबांकडे त्याने बघितलेही नव्हते.

''बोल, अभी ये शानपत्ती हमारे सामने नही चलेगी। तेरा भेद खुल चुका है।''

''कौन सा भेद साब? क्या बोल रहे हो आप?''

''अच्छा.. ये नया नाटक! देख सीधे सीधे बोल दे, रुक्साना के पैर को पकड के गोल घुमा के जमीन पे क्यों पटका? उस नन्ही सी जान से इतनी दुश्मनी क्यों?''

''मारता नही तो और क्या करता? वो बरकत रोज घर आने के बाद खालीपिली किचकिच करती रहती थी उस रुक्साना की वजह से। आदमी घर पे क्यों आता है? ताकी उसे जरा सुकून मिले। लेकीन नही। बरकत को तो बस बहाना चाहिये था रुक्साना की आड मे, बेटे की आड मे मुझसे झगडा करने के लिये। उस दिन भी ऐसा ही हुआ... मेरी एक रात पहले थोडी जादा हो गयी तो सिस फट रहा था। इसिलिये बरकत को नींबू पानी देने को बोला... तो वो फिर से जबान चलाने लगी। पैसे की



रुक्साना को देख के मुझे बहोत गुस्सा आया। वो मुझे बोली, ''अब्बू आप ऐसा क्यों कर रहे हो?'' जैसी माँ वैसीच बेटी! और उसी के वजह से मै बरकत से तलाक नही ले सकता था। और मुझे बरकत से हर हाल मे छुटकारा चाहिये था।इसिलिये मैने उसके पैर को पकड के उसे गोल घुमाके रोड पे पटक दिया।

तंगी के कारण मै गॅस सिलेंडर बिकने जा रहा था तब मुझे रोका। कहने लगी ये सिलेंडर मेरे अब्बू का है, तू बिक नही सकता। अब आप ही बोलो साब, गुस्सा नही आयेगा क्या?''

''लेकीन इस में रुक्साना कहाँ से आयी बीच मे?''

''वही तो बोल रहा हूं। वो मेरे पास आने लगी, उस समय हम लोग बरकत के मायके मे थे झगडा सुलझाने के लिये। पर वहाँ भी हमारा झगडा चालू था। रुक्साना को देख के मुझे बहोत गुस्सा आया। वो मुझे बोली, ''अब्बू आप ऐसा क्यों कर रहे हो?'' जैसी माँ वैसीच बेटी! और उसी के वजह से मै बरकत से तलाक नही ले सकता था। और मुझे बरकत से हर हाल मे छुटकारा चाहिये था। इसिलिये मैने उसके पैर को पकड के उसे गोल घुमाके रोड पे पटक दिया। लेकीन बाद मे, बच्ची नही बचेगी तो.. इस डर से मै वहाँ से रफू चक्कर हो गया।''

पोलिसांनी शाहीद विरोधात न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. समोर आलेले सर्व साक्षी पुरावे आणि दोन्ही बाजू ऐकून घेत मा. न्यायालयाने शाहीद याला भा.दं.वि कलम ३०७ दोषी ठरवत त्याला १० वर्षे सश्रम कारावास आणि ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास सेवाग्राम पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गणेश सायकर, पोलीस अंमलदार रामेश्वर नागरे व जयेश डांगे(कोर्ट पैरवी) यांनी अतिशय मेहनतीने आणि चिकाटीने पूर्ण केला आहे. ■

***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

# सोशल मुशाफिरी

महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांतील पोलीस दलांच्या अधिकृत ट्विटर (आता एक्स) हॅन्डलवर त्या त्या भागातील महत्त्वाच्या घडामोडी, गुन्हे तपास, उपक्रम यांची माहिती देणाऱ्या काही पोस्ट्स.

## रायगड पोलीस, २५ मे

रायगड पोलीस दलातील पोलिस अंमलदारां करिता यशवंती हायकर्स व रायगड पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोली येथे प्रस्तरोत्तालन (रॅपलिंग) शिबिर आयोजित करण्यात आले.



## वर्धा पोलीस, ६ मे

वर्धा पोलीस स्पर्धा परीक्षा केन्द्र यांचे विद्यमाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर नियोजन भवन, वर्धा येथे आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरामध्ये कु. आदिबा अनम, महिला आयएएस अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले



## यवतमाळ पोलीस, १५ मे

दि.१४ मे २०२५, दुपारी माहूर फाट्यावर एका व्यक्तीचा अपघात होतो. शरद लोहकरे व ड्रायव्हर राजेश जाधव (यवतमाळ), शुभम टेंबरे, राम कांबळे, पवन गायकवाड आणि विक्रांत खंदारे या सगळ्यांनी एकत्र येऊन त्या जखमी व्यक्तीला उचललं, वेळ न दवडता सरकारी रुग्णालयात दाखल केलं.



## सिंधुदुर्ग पोलीस, ४ मे

### अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान



## रत्नागिरी पोलीस, ९ मे

### सायबर सुरक्षा खबरदारी



**रत्नागिरी जिल्हा पोलीस दल**

भारतीय सशस्त्र दलांनी त्यांच्या लक्ष्यांवर अचूक आणि धैर्याने यशस्वीरित्या मुकाबला केला आहे तसेच पुढील टप्प्यासाठी सर्व भारतीय सज्ज असताना, पाकिस्तान आणि त्यांची गुप्तचर संस्था आय.एस.आय, आता आंतरराष्ट्रीय सहानुभूती मिळवण्यासाठी आणि भारतीय जनतेची दिशाभूल करण्यासाठी सोशल मीडिया च्या माध्यमाद्वारे एक मोठे प्रचार युद्ध सुरू करण्याची शक्यता आहे व याचसाठी प्रत्येक नागरिकाने सतर्क आणि जबाबदार राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

तरी सर्व भारतीयांनी कृपया खालील महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष द्यावे.

❑ **आक्षेपार्ह प्रचाराबाबत सावधानता**
सोशल मिडिया आणि मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर फिरणारी कोणतीही असत्यापित सामग्री जसे त्रासदायक फोटो, भावनिक व्हिडिओ आणि बनावट माहितीपट फॉरवर्ड करू नका, शेअर करू नका किंवा त्यावर विश्वास ठेवू नका.

❑ **अधिकृत माहिती स्त्रोत**
केवळ अधिकृत माध्यमांद्वारेच अपडेट राहावे. जसे -संरक्षण मंत्रालय, पीआयबी आणि प्रतिष्ठित राष्ट्रीय माध्यमे.

❑ **राष्ट्रीय एकतेच्या भूमिके सोबत ठाम**
हा राष्ट्रीय एकतेचा क्षण आहे. भारतीय सैन्य, सरकार आणि राष्ट्रीय सुरक्षा संस्थांना अटळ पाठिंबा द्यावा व अंतर्गत दोषारोप आणि फूट पाडणाऱ्या चर्चा टाळण्यात याव्या.

❑ **अंतर्गत अशांततेपासून सावध रहा**
शत्रू अंतर्गत अराजकता निर्माण करणे, दंगली भडकवण्याचा किंवा सांप्रदायिक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करू शकतो. हिंदू-मुस्लिम वादविवादात सहभागी होऊ नका किंवा फूट पाडणाऱ्या कथांना चिघळू देऊ नका. स्थानिक अशांतता निर्माण झाल्यास, सुरक्षिततेला प्राधान्य द्या आणि ताबडतोब पोलीस यंत्रणेला किंवा संबंधित अधिकाऱ्यांना कळवावे.

❑ **संशयास्पद हालचालींची माहिती द्या**
कोणत्याही संशयास्पद हालचाली, अज्ञात वस्तू किंवा संभाव्य धोक्यांबाबत त्वरित स्थानिक पोलीस ठाणे किंवा सुरक्षा एजन्सींना तक्रार करावी. तुमची वेळेवर केलेली कारवाई जीव वाचवू शकते.
आम्ही पुन्हा एकदा तुमच्या देश भक्तीला आवाहन करतो - कृपया हा संदेश शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात शेअर करा.

❑ **घाबरू नका - राष्ट्रीय व्यवस्थांवर विश्वास ठेवा**
शांत राहा आणि अन्न, औषधे किंवा इतर आवश्यक वस्तूंची अनावश्यक घाबरून खरेदी किंवा साठेबाजी करू नका. पाकिस्तान किंवा त्याच्या सहानुभूतीदारांकडून आवश्यक वस्तू किंवा रोख रकमेच्या कमतरतेबद्दल खोटे संदेश निर्माण होऊ शकतात. अतिरेकी प्रतिक्रिया देऊ नका.
आपल्या देशात मजबूत व्यवस्था आहेत आणि अशा घटनांमुळे आवश्यक वस्तूंचा पुरवठा खंडित होत नाही. त्याच प्रमाणे, अनावश्यकपणे मोठ्या प्रमाणात रोख रक्कम काढणे टाळा. बँका आणि एटीएम सामान्यपणे कार्यरत राहतील. आपल्या राष्ट्रीय पायाभूत सुविधांच्या लवचिकतेवर विश्वास ठेवा.

❑ **मनोवैज्ञानिक भूमिका**
लक्षात ठेवा, प्रत्येक भारतीय नागरिक मानसिक युद्धात आघाडीचा सैनिक आहे. शांत रहा, आणि तुमचे मनोबल उंच ठेवा. भीती निर्माण करणाऱ्या किंवा बनावट बातम्यांना बळी पडू नका. तुमची मानसिक ताकद आपल्या सैनिकांच्या शौर्या इतकीच महत्त्वाची आहे.

❑ **सायबर सुरक्षा खबरदारी**
फिशिंग लिंक्स, बनावट वेबसाइट्स आणि विशेष फुटेज किंवा बातम्या दाखवल्याचा दावा करणाऱ्या संशयास्पद ई-मेल/संदेशांपासून सावध रहा. अशा युक्त्या शत्रू सायबर सेलकडून अनेकदा गुप्तचर माहिती गोळा करण्यासाठी किंवा मालवेअर पसरवण्यासाठी वापरल्या जातात.

रत्नागिरी पोलीस |

## नागपूर ग्रामीण पोलीस, १९ मे

**मा. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कृती आराखडा उपक्रम दुसरा टप्प्यामध्ये नागपूर विभागातुन उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग आणि पोलीस निरीक्षक, उमरेड पोलीस स्टेशन यांची प्रथम क्रमांकावर निवड.**





**उमरेड पोलिस स्टेशन नागपूर विभागात प्रथम**

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान : राज्य शासनाचे 100 दिवस कृती अभियान**

उमरेड, प्रतिनिधी. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यभरात 7 जानेवारी ते 16 एप्रिल 2025 या कालावधीत राबविण्यात आलेल्या '100 दिवस कृती अभियान'मध्ये नागपूर विभागातून उमरेड पोलिस स्टेशनने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नागपूर ग्रामीण जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

उमरेड पोलिस स्टेशनने विविध सामाजिक, प्रशासकीय आणि पोलिस जनसंपर्काशी निगडित उपक्रम राबविले. यामध्ये शासकीय कार्यालयांतील माहितीचे अद्ययावतीकरण, स्वच्छता व सौंदर्यीकरण, तक्रार निवारण, पोलिस स्टेशन हद्दीतील विभागीय कार्यालयांना भेट, गुंतवणूक प्रोत्साहन, कामगार समस्यांचे निराकरण, अधिकारी-कर्मचाऱ्यांना कायदेविषयक प्रशिक्षण, रस्ता सुरक्षा अभियान, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' मोहीम, 'गुड टच-बॅड टच' जनजागृती, ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवणे, सोशल मीडियावरील फसवणूकविरोधात शाळांमध्ये मार्गदर्शन, विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण, कार्यालयीन पारदर्शकता वाढवणे, आदी उपक्रम यशस्वीरित्या राबविले. उमरेड शहरातील नागरिकांनी या सन्मानबद्दल पोलिस स्टेशनचे ठाणेदार धनाजी जलक यांचे कौतुक केले.

**हा उत्कृष्ट कार्याचा सन्मान : जळक**

पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, उपविभागीय पोलिस अधिकारी वृष्टी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली उमरेड पोलिस स्टेशनच्या सर्व अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचा सन्मान असल्याची प्रतिक्रिया ठाणेदार धनाजी जळक यांनी दिली.

## हिंगोली पोलीस, २३ मे

**मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली शहरातील सर्व बँक अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सायबर सुरक्षा व बँक सुरक्षा बाबत केले मार्गदर्शन....**



## परभणी पोलीस, ९ मे



सकाळ

# उड्डाणपुलावरील अपघात रोखण्यासाठी प्रशासन सरसावले

## अल्पकालीन आणि कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर

**परभणी, ता. ८ :** शहरातील उड्डाणपुलावर वारंवार होणारे अपघात व जीवितहानी रोखण्यासाठी आता प्रशासन सरसावले असून, बैठकांचे सत्र सुरू आहे. शुक्रवारी (ता. आठ) पोलिस अधीक्षक, आयुक्तांनी प्रत्यक्ष पुलावर जाऊन तत्कालीन व कायमस्वरूपी उपाययोजनांवर चर्चा करून तत्काळ त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला.

शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ६१ वर शहरात टी आकाराचा उड्डाणपूल असून जिंतूर, पाथरी, गंगाखेड व वसमत, हिंगोली या व त्यापुढील शहराला तो जोडला जातो. सद्यःस्थितीत वाहनांची संख्या पाहता पूल अरुंद असल्याने सातत्याने पुलावर वाहतुकीची कोंडी होताना दिसून येते. त्यातच पुलाच्या माथ्यावर तिन्ही बाजूंनी येणारी वाहने अनेकवेळा समोरासमोर येतात. नुकताच या पुलावर एक मोठा अपघात झाला व त्यामध्ये दोन युवकांचा बळी गेला. या पार्श्वभूमीवर आता जिल्हा प्रशासन सरसावले आहे.

### पोलिस अधीक्षक, आयुक्तांनी केली पाहणी

■ जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालयात उड्डाणपुलावरील अपघात रोखण्यासाठी बैठकांचे सत्र सुरू आहे. गुरुवार (ता. सात) च्या बैठकीनंतर शुक्रवारी (ता. आठ) जिल्हा पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, आयुक्त धैर्यशील जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संजय पाटील, उपअभियंता बालाजी शिंदे यांच्यासह शहर अभियंता वसीमखान पठाण, बांधकाम विभागाचे शाखा अभियंता विश्वास लव्हेकर, अभियंता पंकज देशमुख, पवन देशमुख, करण गायकवाड यांच्यासह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती होती. या अधिकाऱ्यांनी पुलाच्या तिन्ही मार्गांवर फिरून वाहतुकीस येत असलेल्या अडचणी व समस्यांची पाहणी केली. शनिवारी (ता. नऊ) राष्ट्रीय महामार्ग विभाग व रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक होणार असून, त्यावर अंतिम तोडगा काढण्यात येणार आहे.

**परभणी :** शहरातील उड्डाणपुलावर वारंवार होणाऱ्या अपघातांवर उपाययोजना करण्यासाठी शुक्रवारी जिल्हा पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, आयुक्त धैर्यशील जाधव व कार्यकारी अभियंता संजय पाटील यांनी पुलावर फिरून पाहणी केली.

“ शहरातील वाहतुकीच्या समस्येसंदर्भात चर्चा सुरू आहे, बैठकादेखील घेतल्या. आज फिल्ड व्हिजिट करण्याचे ठरविले होते. त्यानुसार शुक्रवारी पाहणी करण्यात आली, अनेक प्रश्न आहेत. त्यादृष्टीने आता दीर्घकालीन व अल्पकालीन उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले आहे. शनिवारी (ता. नऊ) रेल्वेच्या व राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक आहे. - **रवींद्रसिंह परदेशी,** जिल्हा पोलिस अधीक्षक, परभणी

“ शहरात वाहतुकीसंदर्भात अनेक समस्या आहेत. त्यादृष्टीने चर्चा होत आहे. उड्डाणपुलावरील वाहतूक सुरळीत कशी करता येईल, यासाठी प्रयत्न होत आहेत. उड्डाणपुलावरील जड वाहतूक कमी करण्यासाठी सर्व्हिस रोड वाढविता येईल का? याचीदेखील तपासणी केली जाणार आहे. पुलावरील वाहतूक व ब्लॅक स्पॉट कमी करण्याचा प्रयत्न आहे. शहरातील पाच रस्त्यांवरील अतिक्रमणांच्या समस्या सोडविण्यात येणार आहेत. शहरातील सिग्नल यंत्रणेबाबत पालकमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शविली आहे. लवकरच त्याबाबत निर्णय होईल. राष्ट्रीय महामार्गावर खानापूर फाटा ते विसावा फाटा या मार्गावर गतिरोधक लावण्यासाठी पत्र देणार आहोत.
- धैर्यशील जाधव, आयुक्त, महानगरपालिका, परभणी

Nanded, Parbhani-Today1
09/05/2025 Page No. 1

# पाककृती

## सूप्स



## शेवग्याच्या शेंगांचे सूप

### शेवग्याच्या शेंगांचे सूप

**साहित्य:**

६-७ शेवग्याच्या शेंगा

१ मोठा कांदा

१ बटाटा

१०-१२ लसुण पाकळ्या

१ इंच आले

१० काळी मिरी

६ लवंगा

२ टिस्पून जिरे

टिस्पून बडिशोप

१ टेबलस्पून साजूक तूप

१ टिस्पून मिरपूड

चवीनुसार मीठ

**कृती:**

१ कांदा वगळता शेवग्याच्या शेंगा, बटाटा, आले या सगळ्यांचे तुकडे करून घ्यावे. कांद्याचे मोठे तुकडे करून घ्यावे. लसुण पाकळ्या तसेच लागणारे खडे मसाले काढून ठेवावे. कुकरमध्ये साजूक तूप गरम झाल्यावर त्यात जिरे, बडिशोप, मिरी, लवंगा परतून घ्याव्या.

२ नंतर त्यात सर्व चिरलेल्या भाज्या चांगल्या परतून घ्याव्या. पाणी मिक्स करून कुकरचे झाकण बंद करून ५-६ शिट्ट्या कराव्या

३ नंतर भाज्या थंड करून पाणी व भाज्या वेगळ्या करून त्या स्मॅश कराव्या. तसेच शेंगांचा गर व बिया दोन्ही वेगळे करून स्मॅश करून घ्याव्या. सर्व मिश्रणाची पेस्ट करावी.

४ नंतर त्यात भाज्यांचे पाणी



# लेमन कोरिॲन्डर सूप

मिक्स करावे. पातेल्यात साजूक तूप गरम झाल्यावर जिरे टाकून फोडणी करावी.

५ त्यावर तयार पेस्ट ओतून उकळी काढावी. चवीनुसार मीठ, साखर टाकावी आपले शेवग्याच्या शेंगाचे सूप तयार

६ बाऊलमध्ये गरमागरम तयार सूप वरून मिरपुड भुरभुरवून डिश सर्व्ह करावी.

## लेमन कोरिॲन्डर सूप

### साहित्य:

१ टेबलस्पून लिंबाचा रस

१/४ कप कोथिंबीर

१ टेबलस्पून कॉर्न फ्लोअर

१/२ टेबलस्पून मीठ

२ टेबलस्पून किसलेले गाजर

२ टेबल बारीक चिरलेली फरसबी

२ टेबलस्पून बारीक चिरलेला कोबी

१ टेबलस्पून बारीक चिरलेले आले

१ टेबलस्पून बारीक चिरलेला लसूण

१/२ टेबलस्पून काळी मिरी पूड

१ टेबलस्पून तेल /बटर

### कृती:

१ सर्व भाज्या स्वच्छ धुऊन बारीक चिरून घ्याव्यात.

२ कॉर्न फ्लोअर मध्ये पाणी घालून त्याची पेस्ट तयार करून घ्यावी.

३ गॅसवर एका पॅन मध्ये तेल घालून त्यात लसूण गुलाबी रंगावर परतून घ्यावा.

४ त्यात आले घालून परतून बारीक चिरलेल्या भाज्या एक एक करून घालाव्यात.

५. परतून झाल्यावर त्यात आवश्यक तेवढे पाणी घालावे.

६ पाणी चांगले खळखळून उकळले, की त्यात लिंबाचा रस, मीठ घालावे.

७. नंतर त्यात तयार करून ठेवलेली कॉर्नफ्लोअरची पेस्ट घालून ढवळत रहावे. वरून काळी मीरपूड घालावी.

८. लेमन कोरिअन्डर सूप सर्व्ह करायला तयार आहे.

# शब्दकोडे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ■ | ४ | | ५ | ६ |
| | ■ | ७ | | ■ | ८ | | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | १२ | | ■ | १३ | | |
| ■ | ■ | १४ | | | | १५ | ■ | १६ | |
| १७ | ■ | | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| ■ | १८ | | १९ | | ■ | ■ | २० | ■ | २१ |
| २२ | | ■ | २३ | | | ■ | २४ | २५ | |
| ■ | | ■ | | ■ | ■ | २६ | | | ■ |
| २७ | | २८ | ■ | २९ | ३० | | | ■ | ३१ |
| | ■ | ३२ | | ■ | ३३ | | ■ | ३४ | |

**आडवे शब्द**

१. अत्यंत काळा ४. तळवा ७. एक किमती लाकूड ८. वाहवा, सकारात्मक प्रतिसाद ९. जिन्नस १०. सरस्वतीच्या हातातील वाद्य ११. वस्त्र १३. कमी वजनाचा १४. लढण्यास उत्सुक १६. दुसरा १७. जमीन १८. अकरावी तिथी २२. बगळा २३. झीज २४. मीठ २६. योग्य मान देणे २७. अव्याहत २९. वणवा ३२. अपकर्ष ३३. गर्दन ३४. तात्पर्य

**उभे शब्द :**

१. उसाच्या रसापासून तयार होणारा पदार्थ २. अनेक कप्पे असलेली पिशवी ३. पुणे सोलापूर रस्त्यावरील एक गाव ४. रेशमी वस्त्र ५. एक मसाल्याचा पदार्थ ६. आरोळी ८. राक्षस १२. वैध मार्गाने १४. रवाळ पदार्थाचा तुकडा १५. गवंडी १८. गणपतीचे एक नाव १९. जागरूकता २०. चिखल २१. शर २५. आशीर्वाद २६. मुख २७. मैत्र २८. रीत ३१. पाणी

# दक्षताच्या वाचकांसाठी खुशखबर...

दक्षता मासिकाशी वाचकांचा स्नेहबंध असाच टिकून राहावा व जास्तीत जास्त वाचक दक्षता परिवाराशी जोडले जावेत या हेतूने आम्ही काही उपक्रम हाती घेतले आहेत. यापैकीच एक म्हणजे अचूक शब्दकोडे सोडवणाऱ्या तीन स्पर्धकांना विजेते म्हणून घोषित केले जाणार आहे आणि त्यांना रोख पारितोषिकही दिले जाणार आहे. त्यासाठी स्पर्धकांनी मूळ शब्दकोडे अचूक सोडवून त्याचे कात्रण, आपले नाव, अचूक पत्ता, पिन कोड, संपर्क क्रमांक तसेच बँकेचा अकाऊंट नंबर व आयएफएससी कोड या माहितीसह आमच्या दक्षताच्या पत्त्यावर त्या महिन्याच्या पंचवीस तारखेपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. दर महिन्याला विजेत्यांची निवड केली जाईल व पुढील महिन्यामध्ये विजेत्यांची नावे जाहीर केली जाऊन त्यांचे बँक खात्यात ऑनलाईन बक्षिसाची रक्कम वर्ग करण्यात येईल. यासाठी आपला भरघोस प्रतिसाद अपेक्षित आहे.

**बक्षिसे : पहिले ₹५००/-, दुसरे ₹३००/-, तिसरे ₹२००/-**

# मे २०२५ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या शब्दकोड्याचे उत्तर व स्पर्धेतील विजेत्यांची नावे

नाव : ______________________________

पत्ता : ______________________________

______________________________ मोबाईल : ______________________________

अकाऊंट नं : ______________________________ आयएफएससी कोड ______________________________

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द | र | वा | जा | | नि | पु | त्रि | क | |
| श | व | | न | व | रा | त्र | | न | ख |
| र | | शि | | ड | क | | के | व | ळ |
| थ | र | का | प | | र | ट | र | ट | |
| | व | र | द | | ण | | ळ | | अ |
| ना | ळ | | र | जा | | भू | | | न |
| मी | ना | | मो | र | | | त | द | र्थ |
| | थ | | ड | | प | रि | वा | र | |
| क | | स | | | ह्म | | य | व | न |
| ल | क्ष | वे | धी | | जा | य | फ | ळ | |



शब्दकोड्याचे अचूक उत्तर प्राप्त न झाल्याने या महिन्यात कुणीही विजेता ठरलेले नाही.

# लाखो वाचक

## ज्याची आतुरतेने वाट पाहतात!

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

नागरिक आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातील महत्त्वाचा दुवा असलेले, सर्वोच्च खपाचे, ५० वर्षांची दर्जेदार परंपरा असलेले मराठी मासिक

- रोमांचकारी सत्यकथा,
- विविध उत्कंठावर्धक सदरे,
- जनता व पोलीस यांच्यातील जिव्हाळा जपणारे वाङ्मय
- रसिक वाचकांच्या पसंतीस उतरेल असे दर्जेदार साहित्य...



आपली प्रत आजच राखून ठेवा!

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पत्रव्यवहारासाठी पत्ताः

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय

शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

दूरध्वनीः ०२२-२२८३४५११/२२०४९७०१

mpd.dakshata@mahapolice.gov.in

वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२८३४५११

DAKSHATA Marathi Magazine June 2025. RNI Registration No. 21352/1974. Postal Reg.No. MCS/131/2024-26 Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office GPO, Mumbai - 400 001 on 5th and 6th of every month. Date of Publication is 1st of every month.

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय




**प्रेषक :**

**सरसंपादक, दक्षता**

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,

शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,

मुंबई - ४०० ००१

**प्रति,**